# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार २४ जून २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ ८








## ‘नीट’मध्ये 60 लाखांत डील

## तुकाराम मुंढे यांची अखेर उचलबांगडी

**मुंबई-** गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून काम करताना राज्यभरात भेसळी विरोधात कठोर मोहिम राबवून अनेकांना धडकी भरविणारे तुकाराम मुंडे यांची राज्य सरकारने महत्वाच्या पदावरु न उचलबांगडी केली आहे. मुंढे यांना महत्वाच्या पदावरु न हटविण्यात आले असून त्यांच्या जागी डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



राज्य सरकारने काही दिवसांपूर्वीच तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्तम्हणून नियुक्ती केली आहे. सुरुवातीस आयुक्तपद हे कमी दर्जाचे असून सरकारने आपला अवमान केल्याचे सांगत या पदावर रु जू होण्यास मुंढे ना खूश होते. मात्र राज्य सरकारने त्यांची अन्य पदावर नियुक्तीची विनंती फेटाळल्यानंतर मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारताच धडक कारवाई सुरु केली आहे. मुंढे यांनी गेल्या पंधरा- वीस दिवसात भेसळीविरोधात धडक मोहिम राबविली असून अन्न, औषधे, दूध, खवा भेसळ करणा-यांवर कठोर कावाईचा बडगा उगारत अनेकांना जेलमध्ये पाठविले आहे. एवढेच नव्हे तर काही मोठ्या कंपन्या, उद्योग, हॉटेलवरही मुंढे यांनी कारवाई करीत आपल्या कामाची चूनूक दाखविली आहे.मुंढे यांच्यावर मनमानी कारभाराचा आरोप करीत त्यांची बदली करण्यासाठी काही नाराज मंडळी प्रयत्नशील असतानाच राज्य सरकारने मंगळवारी मुंढे यांना आणखी एक धक्का दिला. राज्य सरकारने प्रत्येक जिल्हयात प्रशासकीय सोयीसाठी पालक सचिवांची नियुक्ती केली आहे. जिल्हयात राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून पालकमंर्त्याच्या साह्यासाठी तसेच जिल्हयातील प्रश्नांची शासन दरबारी सोडवणूक करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात एका सचिवाची पालक सचिव (पान २ वर)

**पटणा/वृत्तसंस्था-**लखीसराय : नीट पुर्नपरीक्षेत मोठा घोटाळा झाल्याचे समोर आले. बिहारमधील लखीसराय येथील परीक्षा केंद्रावर बायोमेट्रिक पडताळणी प्रक्रियेत छेडछाड करून मूळ उमेदवारांऐवजी बनावट विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. एका उमेदवाराला उत्तीर्ण करण्यासाठी तब्बल ६० लाख रुपयांचा व्यवहार ठरला होता, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली. या संपूर्ण प्रकरणामुळे नीट परीक्षेच्या पारदर्शकतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नॅशनल टेस्टिंग एजन्सी म्हणजेच एनटीएने नीट पुर्नपरीक्षेसाठी बायोमेट्रिक पडताळणीचे काम ईडीसीआयएल या संस्थेला दिले. या संस्थेने पुढे हे काम इनोव्हेटिव्ह व्यू नावाच्या एका खासगी कंपनीला सोपवले. धक्कादायक बाब म्हणजे, या कंपनीला २०२५ मध्ये झारखंड आणि तामिळनाडू सरकारने, तर २०२२ मध्ये उत्तर प्रदेश सरकारने बायोमेट्रिक कामांमधील गैरव्यवहारामुळे आधीच ब्लॅकलिस्टमध्ये टाकले होते. आता तपास यंत्रणा या कंपनीच्या नेटवर्कची चौकशी करत आहेत.

**नेमका प्रकार काय?-**१४ जून रोजी परीक्षेची प्रवेशपत्रे जारी झाल्यानंतर, परीक्षा माफियांच्या टोळीने




या बायोमेट्रिक कंपनीच्या काही पर्यवेक्षकांना पैशांचे आमिष दाखवून आपल्या बाजूने करून घेतले. परीक्षा केंद्रापासून १०० ते १५० मीटर अंतरावर उभ्या असलेल्या गाड्यांमध्ये मूळ उमेदवारांचे बायोमेट्रिक नमुने घेण्यात आले. दुसरीकडे, परीक्षा केंद्राच्या आत प्रवेश करणा-या बनावट विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक नोंदवण्यात आले. संशय येउ नये म्हणून, बायोमेट्रिक घेतल्यानंतर उमेदवाराच्या अंगठ्याचे ठसे बदलल्याची नोंद सिस्टीममध्ये करण्यात आली.

**एका गुप्त ई-मेलमुळे बिंग फुटले-**२१ जून रोजी दुपारी बिहार पोलिस मुख्यालय आणि एनटीएला एक गुप्त ई-मेल मिळाला. या ई-मेलमध्ये माहिती दिली होती की, केंद्रीय विद्यालय परीक्षा केंद्रावर मधु प्रिया नावाच्या मूळ उमेदवाराऐवजी पूनम कुमारी नावाची मुलगी परीक्षा देत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने कारवाई करत या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला. परीक्षा देणारी पूनम कुमारी ही झारखंडमधील गिरिडीहची रहिवासी असून ती २०२१ मध्ये झारखंड बोर्डाच्या विज्ञान शाखेत राज्यात पहिली आली होती. सध्या ती बीएचयूमधून बीएससी नर्सिंगचे शिक्षण घेत आहे.

**मुख्य सूत्रधार कोण?**

या संपूर्ण सॉल्वर गँगचा मुख्य सूत्रधार पटना मेडिकल कॉलेज अँड हास्पिटलचा तृतीय वर्षाचा एमबीबीएस विद्यार्थी आहे. अटकेच्या वेळी त्याने आपले नाव मयंक कश्यप सांगितले होते, मात्र सखोल चौकशीत त्याचे खरे नाव अश्विनी कुमार असल्याचे उघड झाले. अश्विनी कुमार हा बायोमेट्रिक कर्मचारी असल्याचे भासवून परीक्षा केंद्रात प्रवेश करायचा आणि आतून बनावट विद्यार्थ्यांना मदत करायचा. या ६० लाखांच्या डीलमध्ये अश्विनी कुमारला २५ लाख रुपये मिळणार होते. विशेष म्हणजे, परीक्षेच्या दिवशी तो लखीसरायच्या परीक्षा केंद्रात हजर असताना, पीएमसीएचच्या हजेरी कार्डवर त्याची उपस्थिती नोंदवण्यात आली. त्यामुळे त्याची ही बनावट हजेरी कोणी लावली, याचा तपास आता कॉलेज प्रशासनाकडून केला जात आहे. तपास यंत्रणा आता या टोळीच्या संपर्कात असलेल्या इतर लोकांचा आणि आरोपींचा शोध घेत आहेत.

## राज्यात ‘समान नागरी कायदा’ लागू होणार!

**मुंबई/प्रतिनिधी-**केंद्र सरकारपाठोपाठ आता महाराष्ट्र सरकारनेही समान नागरी कायद्याच्या दिशेने मोठी पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. उत्तराखंड आणि इतर भाजपशासित राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही समान नागरी कायदा लागू करण्यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.यापूर्वी शिवसेना नेत्या नीलम गो-हे यांनी देखील महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीचे संकेत दिले होते. त्यानंतर आता गृहराज्यमंर्त्यांनी दिलेल्या या अधिकृत माहितीमुळे राज्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात



चर्चांना उधाण आले आहे.गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट आणि महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. या कायद्याचा अंतिम मसुदा तयार करण्याची जबाबदारी निवृत्त न्यायाधीशांच्या एका विशेष समितीकडे सोपवण्यात आली आहे. समान नागरी कायदा लागू झाल्यानंतर समाजातील बहु लग्न पद्धती पूर्णपणे संपुष्टात येईल. या मुद्द्याचा मुख्य मसुद्यात प्राधान्याने समावेश केला जाणार आहे, जेणेकरून विवाह आणि कौटुंबिक कायद्यांमध्ये सर्वांना समान न्याय मिळेल.

*फोन किंवा ईमेलवर तलाक देण्याचे दिवस संपले-* (पान २ वर)

## महाराष्ट्रात मान्सूनची जोरदार आगेकूच



**मुंबई/प्रतिनिधी-**राज्यात चातकासारखी वाट पाहायला लावणा-या मोसमी पावसानेअखेर मुंबईसह महाराष्ट्राच्या अनेक भागांत जोरदार आगेकूच केली आहे. नैऋत्य मान्सून मुंबईत अधिकृतपणे दाखल झाल्याचे भारतीय हवामान विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत डहाणू, वर्धा, रायपूर आणि मोतिहारीपर्यंत मान्सूनची रेषा विस्तारली आहे. येत्या २ ते ३ दिवसांत हा मान्सून गुजरातच्या काही भागांत दाखल होण्याची दाट शक्यता असून, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये त्याची आणखी प्रगती होण्याचा अंदाज आहे. तसेच, मध्य प्रदेशातील काही भागांमध्येही मान्सून लवकरच पोहोचणार आहे. सकाळपासूनच मुंबईत पावसाने चांगलाच जोर धरला असून मुंबईच्या बहुतांश भागात दमदार पाउस झाला आहे. सायन परिसरात पावसाची संततधार कायम असून ऐन गडबडीच्या वेळी रस्त्यामध्ये बेस्ट बस बंद पडल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. मुंबईत आजही ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाउस कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून पुढील २४ ते ४८ तासांसाठी मुंबईत 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. दरम्यान, राज्यात मोसमी पाउस सक्रिय होण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली असून २४ ते २७ जून दरम्यान कोकण किनारपट्टीसह राज्यातील अंतर्गत भागात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. मोसमी पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या पुण्यातही तुफानी पाउस बरसला. (पान २ वर)

## शिवभोजन केंद्रांना गॅस पुरवठ्याबाबत शासन सकारात्मक

**मुंबई :** शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅसचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी शासन सकारात्मक असून, काही कारणांमुळे बंद पडलेली शिवभोजन केंद्रे लवकरच पुन्हा सुरू करण्यात येतील, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानपरिषदेत दिली.राज्यातील विशेषतः पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील शिवभोजन



केंद्रांना व्यावसायिक गॅस पुरवठा करण्याबाबत विधानपरिषद सदस्या उमा खापरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री भुजबळ यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. शिवभोजन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. काही ठिकाणी व्यावसायिक गॅस पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, अशा परिस्थितीतही संबंधित केंद्रांनी पर्यायी व्यवस्था करून लाभार्थ्यांना भोजन उपलब्ध करून दिले असून राज्यातील ४२ पैकी ४१ शिवभोजन केंद्रे नियमितपणे कार्यरत असल्याची माहितीही त्यांनी दिली. ज्या शिवभोजन केंद्रांमध्ये काही काळ गॅस पुरवठ्यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या, ती केंद्रे पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे; तसेच ज्या भागांमध्ये सिटी गॅस वितरण व्यवस्था उपलब्ध आहे, तेथील शिवभोजन केंद्रांनी अर्ज केल्यास त्यांना पाइपलाइनद्वारे गॅस पुरवठा उपलब्ध करून देता येईल, असेही त्यांनी नमूद केले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरगुती गॅस पुरवठ्यास प्राधान्य दिले जात आहे. त्यानंतर व्यावसायिक ग्राहकांना पुरवठा केला जात आहे. राज्यातील सर्व शिवभोजन केंद्रांचा कारभार सुरळीत सुरू राहावा यासाठी शासन आवश्यक त्या उपाययोजना करीत आहे; तसेच लाभार्थ्यांना कोणतीही अडचण येउ दिली जाणार नाही, असेही मंत्री भुजबळ यांनी स्पष्ट केले.

## विधानपरिषदेत नवनिर्वाचित 16 आमदारांचा शपथविधी

### महायुतीचे वर्चस्व, अपक्ष गोकुळ गीते शिंदेंच्या शिवसेनेत

**मुंबई:** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकांचा निकाल २२ जून रोजी जाहीर झाल्यानंतर, आज विधानपरिषद सभागृहात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी सोहळा दिमाखात संपन्न झाला. गेल्या दोन महिन्यांत पार पडलेल्या वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या एकूण १६ सदस्यांनी आज आमदारकीची शपथ घेतली. यामध्ये पुण्याचे विक्रम काकडे, सोलापूरचे राजेंद्र राउत, रत्नागिरीचे अनिकेत तटकरे आणि साता-याचे धैर्यशील कदम यांच्यासह इतर आमदारांचा समावेश आहे. या निवडणुकीत महायुतीने ११ पैकी १० जागांवर दणदणीत विजय मिळवला, मात्र नाशिकमध्ये शिवसेना महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. या पराभवानंतर महायुतीत राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असतानाच, नाशिकमधून विजयी झालेले अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी निकालाच्या संध्याकाळीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. गीते यांनी शिवसेनेचे सहयोगी सदस्यपद स्वीकारल्याने तेही आता महायुतीचा भाग झाले आहेत आणि आज त्यांनी आमदार म्हणून शपथ घेतली. आजच्या शपथविधी सोहळ्यात खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही अरुण लखानी यांनीही विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ घेतली, ज्यासाठी रेवती सुळे यांनीही विधिमंडळ सभागृहात उपस्थिती लावली होती.



प्रवीण पोटे पाटील

शपथविधी दरम्यान सभागृहात लोकप्रतिनिधींचा उत्साह पाहायला मिळाला. भाजपचे अमर राजूरकर यांनी शपथ घेतल्यानंतर जय श्रीराम, जय भाजपा अशी घोषणा दिली, तर बार्शीचे आमदार राजेंद्र राउत यांनी जय शिवराय अशी घोषणा देत सभागृहाचे लक्ष वेधून घेतले.गेल्या दोन (पान २ वर)

**विधानपरिषदेत आज शपथ पार पडलेले १६ सदस्य**

- विक्रम काकडे
- अनिकेत तटकरे
- धैर्यशील कदम
- गोकुळ गिते
- राजीव पोतदार
- बसवराज पाटील
- अरुण लखाणी
- अमर राजूरकर
- अविनाश ब्राह्मणकर
- दुष्यंत चतुर्वेदी
- नंदकिशोर महाजन
- प्रवीण पोटे
- सुहास शिरसाठ
- रवींद्र फाटक
- राजेंद्र राउत
- प्राजक्त तनपुरे

## मंत्र्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा पेटला; विरोधक-सत्ताधा-यांमध्ये खडाजंगी



**मुंबई/प्रतिनिधी-**राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुस-या दिवसाच्या कामकाजाला आज मंगळवारी (२३ जून) सुरुवात झाली आहे. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून आजच्या कामकाजाला सुरुवात झाली. मात्र, विविध मुद्द्यांवरून विधानसभेत गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. परंतु, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत मंत्र्यांच्या अनुपस्थिती आणि त्यांच्याऐवजी इतर मंर्त्यांना किंवा राज्यमंत्र्यांना उत्तरे देण्याचे अधिकार देण्याबाबतचा मुद्दा मांडल्यानंतर या मुद्द्यावरून विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला. विधानसभा अध्यक्षांनी मांडलेल्या मुद्द्यावर विरोधकांमधून जयंत पाटील, विजय वडेट्टीवार आणि नाना पटोले (पान २ वर)

## विश्वास नांगरे पाटील नागपूरचे नवे पोलीस आयुक्त

**नागपूर :** महाराष्ट्र पोलीस दलातून एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी राज्याचे डॅशिंग आयपीएस अधिकारी



विश्वास नांगरे पाटील ांची नागपूरचे नवे पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गृह विभागाने या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केले असून, या मोठ्या फेरबदलामुळे पोलीस दलासह राजकीय वर्तुळातही चर्चांना उधाण आलं आहे.या बदली प्रक्रियेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही वरिष्ठ अधिका-यांच्या पदांची परस्परांमध्ये अदलाबदल करण्यात आली आहे, नांगरे पाटील : हे आतापर्यंत राज्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत होते. आता ते नागपूर शहराची कायदा व सुव्यवस्था सांभाळणार आहेत. रवींद्र सिंघल : नागपूरचे मावळते पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल आता विश्वास नांगरे पाटील यांच्या जागेवर, म्हणजेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अपर पोलीस महासंचालक पदाची धुरा सांभाळतील.विश्वास नांगरे पाटील हे आपल्या शिस्तबद्ध आणि धडक कार्यपद्धतीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जातात. मुंबई, पुणे, नाशिक यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये त्यांनी यापूर्वी आपल्या कामाचा धडाका दाखवला आहे.उपराजधानी नागपूरमधील गुन्हेगारीवर वचक निर्माण करणे आणि कायदा-सुव्यवस्था अधिक मजबूत करणे, हे त्यांच्यासमोरील मुख्य आव्हान असणार आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे नागपूर पोलीस दलाला एक नवे आणि गतिमान नेतृत्व लाभले आहे.

## एसटी कर्मचा-यांच्या पगारात मोठी वाढ

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या लाखो कर्मचा-यांना राज्य सरकारने आनंदाची बातमी दिली आहे. एसटी कर्मचा-यांसाठी परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी कर्मचा-यांचा महागाई भत्ता थेट ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची घोषणा आज विधानसभेत केली. याशिवाय, कर्मचा-यांच्या घरभाडे भत्त्यातही लक्षणीय वाढ करण्यात आली आहे.



एसटी कर्मचा-यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलनाची हाक दिली होती. मात्र, हे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच सरनाईक यांनी महागाई भत्ता आण घरभाडे भत्ता वाढवण्याची घोषणा केली आहे.प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत निवेदन जारी करत ही घोषणा केली. एसटी कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांचा विचार करत महायुती सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरकारने कर्मचा-यांना मोठी वेतनवाढ जाहीर करून मोठा दिलासा दिला आहे. या निर्णयाची घोषणा करताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, कालच मी एसटी महामंडळाच्या सर्व युनियनची बैठक घेतली होती. महाराष्ट्राच्या कानाकोप-यात सेवा देणा-या ८६ हजार कर्मचा-यांच्या (पान २ वर)

## स्मार्ट मीटरचा ग्राहकांना जोरदार ‘शॉक’

### *अचानक वीज बिल दुप्पट-तिप्पट*

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यात स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना वाढीव बिलांचा जोरदार शॉक बसत आहे. त्याविरोधात सामान्य नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आणि पालघरमध्ये वीज बिल दुप्पट-तिप्पट आल्याने नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. विशेष म्हणजे, या सक्तीला सर्वसामान्यांसह सत्ताधारी भाजप आणि शिंदेसेनेनेही विरोध केला आहे. महावितरणच्या हुकूमशाही कारभाराविरोधात राजकीय पक्षांनी विविध ठिकाणी मोर्चे काढून आंदोलनंही सुरू केली आहेत. अचानक वीज बिल दुप्पट-तिप्पट आल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून अनेक ठिकाणी लोक रस्त्यावर उतरले आहेत. विशेष म्हणजे, महावितरणच्या या सक्तीच्या कारभाराला केवळ विरोधकांनीच नव्हे, तर सत्ताधारी भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) या दोन्ही पक्षांनीही जोरदार विरोध दर्शवला आहे स्मार्ट मीटर बसवल्यापासून नेहमीपेक्षा



दुप्पट ते तिप्पट वीज बिल येत असल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे.ग्राहकांची कोणतीही परवानगी न घेता किंवा त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देताच महावितरणकडून मीटर बदलण्यात आले आहेत. मीटर बसवण्यासाठी महावितरणच्या अधिका-यांकडून नागरिकांना सक्तीचे अल्टिमेटम दिले जात आहे, ज्यामुळे ग्राहकांमध्ये भीती आणि असंतोषाचे वातावरण आहे.कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आणि पालघर या परिसरामध्ये स्मार्ट मीटरविरोधात सर्वात जास्त तीव्र असंतोष पाहायला मिळत आहे. महावितरणच्या (पान २ वर)

## देशात नक्षलवाद अखेरच्या घटका मोजतेय-पंतप्रधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**पंतप्रधान मोदींनी देशात अनेक दशकांपासून सुरू असलेल्या नक्षलवादी हिंसेवरून काँग्रेसवर हल्ला चढवला. त्यांनी राहुल गांधींचे नाव न घेता म्हटले की, जे लोक आता संविधान दाखवत आहेत, त्यांचे हात तेव्हा थरथरत होते, जेव्हा



नक्षलवादी हिंसाचार शिगेला पोहोचला होता.एका खासगी कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधानांनी सांगितले की, मागील काँग्रेस सरकारांनी नक्षलग्रस्त भागांना मागासलेला प्रदेश घोषित केले होते. परंतु, एनडीए सरकारने त्या भागांना बदलण्याचे आव्हान स्वीकारले, तेथील लोकांना निराशेमधून बाहेर पडण्यास मदत केली आणि त्यांच्यात प्रगतीच्या आशा जागवल्या. पंतप्रधानांनी पुढे म्हटले की, सरकारे आली आणि गेली, पिढ्या आल्या आणि गेल्या आणि असे वाटले की, हिंसेचे हे दुर्दैव असेच कायम राहील. परंतु, आम्ही परिस्थिती बदलण्यासाठी राष्ट्र प्रथम या संकल्पासह पाउले पुढे टाकली. आज, देशात माओवादी-नक्षलवाद आपल्या शेवटच्या घटका मोजत आहे. हे यासाठी शक्य झाले कारण यासाठी पूर्ण समर्पणाची आवश्यकता होती असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

## रोहित शर्मा, आर. माधवन यांच्यासह महाराष्ट्रातील 7 मान्यवरांना ‘पद्म’ पुरस्कार प्रदान; राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**: देशातील सर्वोच्च नागरी सन्मान समजल्या जाणा-या 'पद्म पुरस्कारांचे'राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनातील ऐतिहासिक गणतंत्र मंडप येथे अत्यंत दिमाखदार सोहळ्यात वितरण करण्यात आलं. या राष्ट्रीय सोहळ्यात महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील अतुलनीय आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल 'पद्म' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.




रोहित शर्मा, पद्म श्री

महाराष्ट्रातील मान्यवरांपैकी प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांना पद्मश्री प्रदान करण्यात आला. वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे ८९ वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या भव्य समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांसह अनेक केंद्रीय मंत्री आणि दिग्गज व्यक्ती उपस्थित होत्या. पद्म पुरस्कार वितरणाच्या या दुस-या टप्प्यात देशभरातील एकूण ६५ मान्यवरांना (२ पद्मविभूषण, ७ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री) पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना 'पद्मभूषण'-** महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या पुरस्कारांमध्ये प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील त्यांच्या अद्भूत योगदानाबद्दल 'पद्मभूषण'पुरस्काराने गौरविण्यात आलं. त्यांनी १६ हून अधिक भाषांमध्ये २ हजारांपेक्षा जास्त गाणी गाउन भारतीय संगीतसृष्टीवर अधिराज्य गाजवलं आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आ.संजय खोडके यांनी तालिका सभापती म्हणून सांभाळले कामकाज

## सभागृह चालवितांना संसदीय अनुभव, शिस्त, संयमाचा दिला प्रत्यय



**मुंबई/प्रतिनिधीः-** राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधान परिषदेतील कामकाजा दरम्यान पीठासीन सभापती राम शिंदे यांच्या अनुपस्थितीत तालिका सभापती म्हणून आ.संजय खोडके यांनी सभागृह चालविले. यावेळी सत्ताधारी पक्षाच्या वतीने आणलेल्या महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० च्या प्रस्तावावर चर्चा सुरु असतांना पीठासीन तालिका सभापती संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन तब्बल दोन तास चांगल्या तऱ्हेने विधान परिषदेतील कामकाज चालविले.

महाराष्ट्र विधान परिषदेत सत्ताधारी पक्षाने नियम २६० नुसार महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चेचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सभागृहातील सदस्यांनी शेतकरी विकासाबरोबरच दुष्काळजन्य परिस्थिती, कर्जमाफी, विविध कृषी योजना, जलसंधारण अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

हि चर्चा अत्यंत महत्वपूर्ण असतांना तालिका सभाध्यक्ष म्हणून विराजमान आमदार संजय खोडके यांनी तब्बल दोन तास चांगल्या तऱ्हेने सभागृह चालविले. त्यांनी नियोजित वेळेत प्रत्येक सदस्यांना बोलण्याची संधी दिली. तसेच सत्ताधारी सदस्यांबरोबरच विरोधी बाकावर बसलेल्या आमदारांचे सुद्धा म्हणणे ऐकून घेतले.

सभागृहाचे कामकाज चालवीत असतांना तालिका सभाध्यक्ष आ. संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन अनुभव, शिस्त, संयम व सद्विवेक बुद्धीचा देखील प्रत्यय घडवून दिला. आ.संजय खोडके यांना विधान परिषदेमध्ये पीठासीन तालिका सभापती म्हणून पाहतांना अमरावतीकरांचे हृदय अभिमानाने भारावले होते.

# विधान परिषदेत काँग्रेसच्या पराभवासाठी जबाबदार नेत्यांवर कारवाई करा

### पत्रकार परिषदेत माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाला आहे. काँग्रेसची प्रतिमा मलीन झाली आहे. या संपूर्ण प्रक्रियेसाठी जबाबदार नेत्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आज मंगळवार २३ जून रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांनी केली आहे.

त्यांनी सांगितले की, विधान परिषद तिकीट वाटप प्रक्रियेची जिल्ह्यातील काँग्रेसच्या जबाबदार नेत्यांनी जबाबदारी घेतली होती. इतर नेत्यांना व पदाधिकाऱ्यांना यामध्ये विश्वासात घेण्यात नाही आले. मुन्ना राठोड यांनी आरोप केला की त्यांनी स्वतः विधानपरिषद निवडणुकीच्या उमेदवारीसाठी अर्ज केला होता परंतु अर्ज केल्यानंतरही त्यांना उमेदवारी नाही देण्यात आली. त्यांनी वारंवार या संदर्भात विचारपूस केली पण त्यांना काहीही सांगण्यात आले नाही.

जिल्ह्यातील कोणत्याही नेत्यांना व कार्यकर्त्यांना विश्वासा न घेता नागपूरचे उद्योजक हर्षजीत देशमुख यांना उमेदवारी देण्यात आले. अर्ज मागे घेण्याच्या तारखेपासून निवडणुकीच्या रिंगणातून देशमुख गायब झाले व लगेच रुग्णालयात भरती होऊन उपचार घेण्याबाबत माहिती मिळाली. माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी हर्षजीत देशमुखांवर पंधरा ते वीस कोटी रुपये भाजपाकडून घेऊन मॅनेज केल्याचा आरोप केला. अधिकृत उमेदवार रिंगणातून अचानक गायब झाल्याने काँग्रेसमध्ये धावपळ सुरू झाली आणि इतर पक्षाला पाठिंबा देण्याबाबत बैठकी घेण्यात आल्या परंतु काहीही निर्णय न झाल्याने शेवटी तटस्थ राहण्याची भूमिका घेतली. तरीपण मनपाच्या ११ आणि तिवसाच्या तेरा नगरसेवकाना सोडून ९७ काँग्रेसच्या नगरसेवकांनी व्हिप चे उल्लंघन करून मतदान केले. विधान परिषदेचे निकाल घोषित झाल्यानंतर काँग्रेसला एकही मत न मिळाल्याने नामुष्की झालीं. मुन्ना राठोड यांनी माजी मंत्री सुनील देशमुख यांच्यावरही खोटे बोलण्याचा आरोप लावला. त्यांनी म्हटले की, सुनील देशमुख यांनी मीडियासमोर म्हटले होते की पक्षाच्या कोणत्याही कार्यकर्त्याने उमेदवारी मागितली नसताना आम्हाला नागपूरचे उद्योगपती हर्षजीत देशमुख यांना उमेदवारी द्यावी लागली. डॉक्टर देशमुख खोटे बोलत असून मी स्वतः उमेदवारी मागितली असल्याचे मुन्ना राठोड म्हणाले. जिल्ह्यातील प्रत्येक निवडणुकीमध्ये काँग्रेसचा दारूण पराभव झालेला आहे. पक्ष नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



**स्लीपर सेल नेत्यांमुळे माघारला पक्ष -**
मुन्ना राठोड यांनी आरोप केला की जिल्ह्यात शेतकऱ्यांचे, बेरोजगारांचे ,विद्यार्थ्यांचे ,वाढती गुन्हेगारी असे अनेक प्रश्न आहे. दैनंदिन साफसफाई व्यवस्था व भूखंडमध्ये भ्रष्टाचार असे अनेक प्रश्नांवर विरोधी पक्ष असल्यामुळे काँग्रेस नेत्यांना आक्रमक भूमिका घ्यायची गरज आहे, परंतु काँग्रेस पक्षामधील काही स्लीपर सेल नेते यांचे भाजपा नेत्यांसोबत मधुर संबंध असल्यामुळे जिल्ह्यात काँग्रेस पक्ष माघारला आहे.

**९५ नगरसेवकांनी भाजपाला केले मतदान-**
मुन्ना राठोड म्हणाले की, शिवसेना उबाठा पक्षाच्या सहा खासदारांनी ८५-८५ कोटी घेऊन शिंदे शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे. त्याच प्रमाणे अमरावती विधानपरिषदेमध्ये काँग्रेसच्या ९५ नगरसेवकांनी भाजप उमेदवारांना खुलेआम मतदान केले. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचेही ते म्हणाले.

**पक्षाला खाजगी संपत्ती समजून निर्णय -**
ग्रामीण भागामध्ये काँग्रेसला खिंडार पडले आहे. सुधाकर भारसाकळे सह एकोणवीस नगरसेवकांनी शिंदे सेनेमध्ये प्रवेश केला आहे. युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रकाश साबळे युवा स्वाभिमान पार्टीमध्ये गेले आहे. मागील काही वर्षापासून जिल्ह्यामध्ये पक्षाला खाजगी संपत्ती समजून काही नेते निर्णय घेत आहे. त्यामुळे पक्ष मोठ्या प्रमाणात बॅकफूटवर गेला आहे. काँग्रेस पक्षाला पराभूत करणाऱ्या स्लीपर सेल नेत्यांवर कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# राजर्षी शाहू महाराज वाचनालयातर्फे लेफ्टनंट 'शाहू' चा सत्कार

**तिवसा/प्रतिनिधीः-** भारतीय सैन्यात नव्याने रुजू झालेले लेफ्टनंट शाहु संजय देशमुख व त्यांच्या आई-वडिलांचे राजर्षी शाहु महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसाच्या वतीने ग्राम मोझरी येथे त्यांच्या निवासस्थानी शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी सुनील बहादरपुरे,गणेश डोळस,अजय आमले,अंकुश देशमुख,तेजस जोशी,राजाभाऊ देशमुख,बाळा देशमुख,गोपाल फरकाळे,राहुल धडांगे,रोशन खोब्रागडे,साहिल कांबळे, संकेत माहोरे,भाग्येश गौरखेडे, प्रदिप हूड,सुरज इंगोले, प्रवीण डहाके व इतर सदस्य उपस्थित होते.

# दर्यापूर तालुक्यात पावसाची हजेरी, शेतकऱ्यांना दिलासा

**खल्लार/प्रतिनिधीः-** गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना आज (दि.२३) सायंकाळी झालेल्या पावसाने काहीसा दिलासा मिळाला. दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन काळ्या ढगांनी दर्यापूर शहरासह तालुक्यात पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतजमिनींमध्ये ओलावा निर्माण झाल्याने आगामी खरीप हंगामासाठी हा पाऊस उपयुक्त ठरणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

पावसामुळे वातावरणात काही प्रमाणात गारवा निर्माण झाला असला तरी उष्णता व दमटपणा अद्याप कायम असल्याने नागरिकांना पूर्ण दिलासा मिळालेला नाही. आगामी काही दिवसांत आणखी पाऊस झाल्यास शेतीकामांना मोठा फायदा होणार असल्याची आशा शेतकरी व्यक्त करीत आहेत. यामुळे खरीप हंगामाच्या आशा पल्लवित झाल्या अशी भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या २२ गोवंशांची सुटका

### ५.०३ लाखांचा मुद्देमाल जप्त, एक आरोपी अटकेत

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलिसांनी कत्तलीच्या उद्देशाने अमानुषपणे बांधून ठेवलेल्या २२ गोवंश जनावरांची सुटका करत मोठी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून इरशाद खान युसूफ खान (वय २९, रा. हैदरपुरा, अमरावती) याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाटीपुरा-छायानगर परिसरातील एका टिनशेड गोदामात काही गोवंश जनावरे कत्तलीसाठी ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती नागपुरी गेट पोलिसांना मिळाली होती. या जनावरांना चारा-पाणी न देता अत्यंत दयनीय अवस्थेत डांबून ठेवण्यात आल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने तातडीने छापा टाकला. छाप्यामध्ये गोदामात २२ गोवंश जनावरे लहान दोऱ्यांनी अमानुषपणे बांधलेल्या अवस्थेत आढळून आली. ही जनावरे भूक आणि तहानेने व्याकूळ झाल्याचे निदर्शनास आले. पंचांसमक्ष पोलिसांनी सर्व जनावरे ताब्यात घेतली. जप्त करण्यात आलेल्या जनावरांची एकूण किंमत ५ लाख ३ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. सुटका करण्यात आलेल्या जनावरांची योग्य देखभाल व संरक्षण व्हावे यासाठी त्यांना दस्तुरनगर येथील गोरक्षण संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले आहे. या प्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी इरशाद खान युसूफ खान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस उपनिरीक्षक विकास मनपिया, किशोर आगले, वसंत धोटे तसेच डीबी स्क्वॉडचे इरफान रायलीवाले, प्रवीण ढेंगेकर, इमरान खान, मोहन चव्हाण, मनीष यादव, शेखर गायकवाड आणि वाहनचालक संतोष सरोदे यांनी केली.

## १ व १० वरील उर्वरित

### तुकाराम मुंढे यांची

म्हणून नियुक्ती करण्यात येते. या प्रथेनुसारच सरकारने तुकाराम मुंढे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव असताना त्यांची परभणीचे पालक सचिव म्हणून नियुक्ती केली होती. मात्र मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागातून बदली करण्यात आल्यानंतर मुंढे यांची आता परभणीच्या पालक सचिव पदावरु नही उचलबांगडी करण्यात आली आहे. तर मुंढे यांच्या जागी परभणीचे पालक सचिव म्हणून ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत फुलकुंडवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर अकोला जिल्हा पालक सचिवपदी कृषी सचिव परिमल सिंह यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### विधानपरिषदेत नवनिर्वाचित १६

महिन्यांत राज्यात विधानपरिषदेच्या दोन टप्प्यांत निवडणुका झाल्या आहेत. पहिल्या टप्प्यात १० जागांसाठी निवडणूक झाली, ज्यामध्ये सर्वच उमेदवार बिनविरोध निवडून आले. यात महायुतीने ९ तर महाविकास आघाडीत ठाकरेंच्या शिवसेनेकडून एका जागेवर सदस्य निवडून गेले. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत ६ जागा बिनविरोध झाल्या होत्या, तर उर्वरित ११ पैकी १० जागांवर महायुतीने विजय मिळवला. महाविकास आघाडीला या निवडणुकीत एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. या १७ जागांपैकी महायुतीने १६ जागा जिंकल्या असून एका जागेवर अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी विजय मिळवला होता, मात्र ते आता शिंदेंच्या शिवसेनेचे सहयोगी सदस्य बनले आहेत. आज विधानपरिषदेत शपथ घेतलेल्या १६ सदस्यांमध्ये विक्रम काकडे, अनिकेत तटकरे, धैर्यशील कदम, गोकुळ गिते, राजीव पोतदार, बसवराज पाटील, अरुण लखाणी, अमर राजूरकर, अविनाश ब्राह्मणकर, दुष्यंत चतुर्वेदी, नंदकिशोर महाजन, प्रवीण पोटे, सुहास शिरसाठ, रवींद्र फाटक, राजेंद्र राउत आणि प्राजक्त तनपुरे यांचा समावेश आहे.

### मंत्र्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा

यांनी आक्षेप घेतला. ज्या राज्य मंत्र्यांकडे किंवा अन्य मंत्र्यांकडे मंत्री जबाबदारी सोपवत आहेत, ते तरी नीट उत्तर देतात का? असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी सभागृहात सूचना वाचताना कोणत्या मंत्र्यांचा कारभार कोणाकडे देण्यात आला आहे, याची माहिती दिली. यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी आक्षेप घेत म्हटले की, आपण आता जाहीर केले. मात्र, ज्या मंत्र्यांकडे जे खाते आहे, ते मंत्री त्या चर्चा ऐकायला किंवा उत्तर द्यायला नसतील आणि दुसरेच मंत्री त्याची चर्चा ऐकून उत्तर देणार असतील तर खात्याला आणि त्या प्रश्नाला सदस्य जे प्रश्न मांडतात, त्याला ते न्याय देउ शकत नाही. त्या विषयाचे मंत्री सभागृहात बसले नाही तर कसे होणार? असा सवाल जयंत पाटील यांनी उपस्थित केला. त्यामुळे जी नावे जाहीर करण्यात आली आहेत, ते मंत्री स्वतःची जबाबदारी टाळत आहेत, असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे आपण केलेली घोषणा मागे घ्यावी, अशी विनंती जयंत पाटलांनी केली.

### एसटी कर्मचा-यांच्या पगारात

न्यायहक्काला दाद देणे हे आमचे कर्तव्य आहे. महाविकास आघाडीच्या काळात एसटीचा संप भरकटला होता, मात्र आमच्या सरकारने कर्मचा-यांच्या भावना समजून घेतल्या आहेत. राज्य सरकारी कर्मचा-यांच्या धर्तीवर आता एसटी कर्मचा-यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून वाढवून ५८ टक्के करण्यात आला आहे. तर, यापूर्वी मिळणारा ८, १६ आणि २४ टक्के घरभाडे भत्ता वाढवून आता अनुक्रमे १०, २० आणि ३० टक्के करण्यात आला आहे. कर्मचा-यांचा वार्षिक वेतन वाढीचा दर आता २ टक्क्यांवरून ३ टक्के करण्यात आला आहे.

### अचानक वीज बिल

या हुकूमशाही कारभाराविरोधात महाविकास आघाडी (मविआ) आणि सत्ताधारी पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी विविध ठिकाणी मोर्चे काढून आंदोलने सुरू केली आहेत. वाढीव बिलांच्या त्रासातून सामान्य जनतेला त्वरित दिलासा न मिळाल्यास हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.महावितरण ज्या स्मार्ट मीटरचे अफाट फायदे सांगत थकताना दिसत नाही, त्याच स्मार्ट मीटर योजनेला शेजारील गोवा राज्यात स्वतः मुख्यमंर्त्यांनी जनतेचा रोष पाहून स्थगिती दिली. जर हा प्रकल्प एवढाच ग्राहकधार्जिणी आहे, तर गोव्यासारख्या राज्याला यात काय त्रुटी दिसल्या? गोव्याने घेतलेल्या निर्णयामुळे महाराष्ट्र सरकार आणि महावितरण या प्रकल्पाचे पुनर्विलोकन करणार का?सर्वसामान्य ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येणार नाही, असे याआधीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट केले होते. सुरुवातीला सर्व ग्राहकांसाठी प्रीपेड स्मार्ट मीटरचा प्रस्ताव होता, मात्र नागरिकांच्या आक्षेपानंतर सरकारने तो निर्णय बदलला.

### राज्यात 'समान नागरी कायदा'

नाशिकमध्ये नुकत्याच घडलेल्या एका धक्कादायक गुन्ह्याचा हवाला देत गृहराज्यमंर्त्यांनी या कायद्याची गरज अधोरेखित केली. नाशिकमध्ये मलिक अस्लम समशेर नावाच्या एका व्यक्तीने आपल्या पत्नीला फोन/ईमेलवरून तलाक दिल्याचे जाहीर केले आणि अवघ्या ८ दिवसांत त्या महिलेवर जीवघेणा हल्ला केला. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

### महाराष्ट्रात मान्सूनची जोरदार

जुन्नर तालुक्यातील कुमशेत परिसरात ढगफुटीसदृश पाउस झाला. या मुसळधार पावसामुळे रस्ते, ओढे आणि नाल्यांना थेट नद्यांचे स्वरूप आले होते. अचानक आलेल्या या पुरामुळे स्थानिक नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, या पावसामुळे शेतीचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रायगडमध्ये रिमझिम, ढगाळ वातावरण रायगड जिल्ह्यातही सकाळपासून आकाशात ढगाळ वातावरण दिसून येत असून पावसाची रिमझिम सुरू आहे. जिल्ह्यातील दक्षिण भागातील माणगाव, म्हसळा, महाड आणि पोलादपूर तालुक्यात पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. हवामान विभागाने रायगड जिल्ह्याला आज हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा इशारा दिला आहे. सिंधुदुर्गात कालपासून पाउस पूर्णपणे सक्रिय झाला असून जिल्ह्यात मुसळधार पाउस झाला आहे. गेल्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ८०.८७ मिमी पावसाची नोंद झाली असून, सर्वाधिक पाउस देवगड तालुक्यात (१२६ मिमी) झाला. पाउस परतल्यामुळे शेतीच्या कामांना आता वेग येणार आहे. पुढील पाच दिवस जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार पाउस कोसळणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला असून येथे 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात अखेर पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले होते. भात रोपवाटिका करपण्याच्या मार्गावर पोहोचल्या होत्या, तर अनेक गावांमध्ये भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. मात्र, कालपासून सुरू झालेल्या पावसामुळे शेतक-यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या असून भातशेतीला नवसंजीवनी मिळाली आहे. विहिरी, ओढे आणि स्थानिक जलस्रोतांची पातळी वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत असून तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे.

### मध्यरात्री पार्किंगमधील तीन

गंभीर नुकसान झाले. आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी प्राथमिक तपासात हा प्रकार घातपाताचा असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी भेट देउन पंचनामा केला. तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची तपासणी सुरू आहे. तसेच संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत. दरम्यान, निवासी भागात घडलेल्या या घटनेमुळे वाहनधारकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, रात्रीच्या वेळी वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### अंजनगाव सुर्जी बँक ऑफ

काढून ग्राहकांना हाकलून दिले जाते. तांत्रिक कारणाने एटीएम कार्ड बंद पडल्यास आठ-आठ दिवस कार्ड सक्रिय केले जात नाही. मात्र ग्राहकाला बँकेत बोलावून पुन्हा तासन्तास तिष्ठत ठेवले जाते. ग्राहकांशी होणारा दुजाभाव स्पष्ट दीसत असताना कॅशियरच्या केबिनपर्यंत काही धनदांडग्या लोकांना थेट प्रवेश दिला जातो. बँकेच्या गोपनीयतेचे नियमांचे पायमल्ली करुन त्यांचे व्यवहार केले जातात ,कर्मचा-यांच्या टेबलवर ओळखीच्या लोकांची कामे तात्काळ होतात. सामान्य माणूस मात्र तासन्तास रांगेत उभा राहतो.या सर्वावर कळस म्हणजे संपूर्ण बँकेत फक्त सहा खुर्च्यांची बैठक व्यवस्था असुन सध्याच्या उन्हातान्हाचे गरम तापमानात वृद्ध, महिला ग्राहकांना बँकेबाहेर टिनाच्या पत्र्याखाली, पाय-यांवर उभे राहावे लागते. तसेच बँकेमध्ये पिण्याच्या पाण्याची साधी व्यवस्थाही नसल्याने ग्राहकाप्रती अनास्था निदर्शनास येत आहे.

बचत गट, शेतकरी कर्ज वाटप, निराधार पेंशन, लाडकी बहीण योजना यामुळे बँकेत खातेदार वाढले. मात्र यामुळे 'आमच्यावर कामाचा बोजा वाढला' असा गैरसमज कर्मचा-यांनी करून घेतला आहे. त्याचा राग ते गोरगरीब ग्राहकांवर काढत आहेत. ही मंडळी बँकेत येउच नयेत अशा अविर्भावात त्यांना हीन वागणूक दिली जात असल्याचे अनेक ग्राहकांनी स्पष्ट केलेले आहे.

### मोटारसायकल चोरटा

येणार आहे. या माहितीच्या आधारे डीबी पथकाने तेथे सापळा रचला. संशयित युवक घटनास्थळी येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव जय शिवानंद लोखंडे (वय १९, रा. शेमलाई, पोस्ट झोडगा, ता. कारंजा, जि. वाशीम, सध्या रा. सावळे गल्ली, भीमनगर, अमरावती) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे असलेल्या मोटारसायकलीबाबत कसून चौकशी केली असता, त्याने भीमनगर येथील सार्वजनिक शौचालयाजवळून मोटारसायकल आणि मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी आरोपीकडून ५० हजार रुपये किमतीची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटारसायकल आणि १५ हजार रुपये किमतीचा व्हिवो मोबाईल फोन असा एकूण ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गारेखनाथ जाधव, पोलीस निरीक्षक विजया पंधरे आणि पोलीस निरीक्षक पाचकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत डीबी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सागर ठाकरे, सफौ प्रकाश मेश्राम, पोलीस हवालदार निलेश जुनघरे, अमोल यादव, नापोका विनोद मालवे, आशिष ठाकरे तसेच पोलीस शिपाई सिद्धार्थ शृंगारे आणि सचिन गौरखेडे यांनी सहभाग घेतला.

### लाल बावटा शेतमजूर युनियनचे

जाती धर्मातील भूमीहीनांना जमिनीचे वाटप करण्यात यावे. घरकुलासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत किमान पाच लाख रुपये अनुदान देण्यात यावे. श्रावण बाळ,निराधारांना, शेतमजुरांना,दिव्यांगांना पाच हजार रुपये दरमहा पेन्शन देण्यात यावे. श्रावण बाळ योजनेची वयोमर्यादा ६५ वर्षे एवजी ६० वर्षे करण्यात यावी. महिलांना मायक्रो फायनान्सच्या जाळ्यातून मुक्त करून बिनव्याजी कर्ज सरकारी संस्थांमार्फत बँका मार्फत देण्यात यावे. शेतक-यांप्रमाणे दिले जाणारे सन्मानधन शेतमजुरांना देखील देण्यात यावे व अपघात विषयक तसेच इतर योजना शेतमजुरांना लागू करण्यात यावे. अशा प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आलेले आहेत.यावेळी का. संजय मंडवधरे (जिल्हा सचिव/अमरावती विभागीय समन्वयक) का. चंद्रकांत वडस्कर (जिल्हा अध्यक्ष) का. सुनील घटाळे (कार्याध्यक्ष) का. नारायणराव भगवे (मा.जिल्हाध्यक्ष) का. ज्ञानेश्वर मेश्राम (जिल्हा संघटक राज्य कौन्सिल सदस्य) का. मालाताई वानखडे (दर्यापूर तालुका अध्यक्ष) का.प्रज्ञाताई बनसोड (वरुड तालुका अध्यक्ष) का.जयेंद्र भोगे, का. लक्ष्मण भगेवार,का. इस्त्राईल शहा, बापुराव बाळापूरे,का.किशोर काळे,का.बाबाराव इंगळे, का. वैशाली निस्वादे,का. सुरेश शंभरकर,का. करुणा धवणे,का. सौ. सवाई,का.डिगांबर नगेकर, का.अशोक सरदार,का. रामकृष्ण वाडकर, का.माणिक मानकर,का.गोविंदराव ढेंगे, का.राजूभाउ राउत,क?. मुरलीधर तेलंग,का.प्रमोद सोनवणे,का.प्रकाश सांगोळे,संदिप उक्के,निरंजना डोंगरे,अर्चना काळे, दिलीप कोंडेकर,मंगलाताई केलो, ममता जामनिक,शिलाबाई हिवराळे,सीमा हंबर्डे,पुष्पाताई तायडे,ममता तायडे,कविता ठोके, आशा इंगळे, जयश्री ढेंबरे,शीला ढेंबरे,सुनंदा भोगे पार्डी,संदीप नांदणे,मंगला नांदणे,नांदुरा लष्करपुर, शालिनीताई ठाकरे,संध्या काकडे धोत्रा,संगीत पखाले,मेघा लोणारे, ईत्तमगाव,शारदा कुरवाडे,मीना बोहरु पी,संजना झोडे,करजगाव गांधीघर, राजेश्वर वाघ,गमीबाई साबळे, शिला साबळे मोरचुंद, ललिता अनवाने,रेखा अनवाने,ढगा विमलबाई गाठे,वर्षा गाठे, वाहुरोळी शेतमजूर व कार्यकर्ते उपस्थित होते.

### ७२ कोटींचा निधी मंजूर

इमारतींचे आराखडे शासनास सादर करण्यात आलेली होते. शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून या इमारतींच्या पुनरुज्जीवनकरिता शासनाने कालच सुरू झालेल्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सभागृहा समक्ष सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये नियोजन विभाग अंतर्गत मोझरी विकास आराखड्याकरिता ५० कोटी , संत गाडगेबाबा निर्वाणभूमी वलगाव विकासआराखडा करिता ११ कोटी व श्री. क्षेत्र कौंडण्यपूर विकास आराखडा करिता १२ कोटी रुपयांचा निधीची तरतूद पहिल्या टप्प्यात करण्यात आलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार असल्याने आता या विकास आराखड्यांच्या दुरावस्थेचे शुक्लकाष्ट कायमस्वरूपी संपवण्याचे दृष्टिकोनातून आमदार राजेश वानखडे यांनी निर्णायक वाटलाचा सुरू केली आहे.

अमरावती जिल्ह्यातील या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा संतांच्या पावन भूमीत व धार्मिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण विदर्भ कन्या माता रुक्मिणी कौंडण्यपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांकरिता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा वित्त नियोजन मंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या टप्प्यात भरघोस निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार राजेश वानखडे यांनी त्यांचे आभार व्यक्त केलेले आहेत.या निधी उपलब्धतेमुळे समस्त गुरुदेव भक्त ,संत गाडगेबाबांचे अनुयायी व भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

### ओएलएक्सवर ट्रायलच्या बहाण्याने

दस्तुरनगर चौक परिसरात चोरीची मोटारसायकल घेउन उभ्या असलेल्या संशयिताला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीने आपले नाव सुरेश डोमा वाडीवा (वय २६, रा. केसिया, ता. शहापूर, जि. बैतूल, मध्यप्रदेश, सध्या दस्तुरनगर, अमरावती) असे सांगितले. त्याच्याकडे असलेल्या व्हेस्पा कंपनीच्या दुचाकीबाबत समाधानकारक माहिती व कागदपत्रे सादर करता आली नाहीत. अधिक चौकशी केली असता त्याने शेगाव नाका परिसरातून यामाहा मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान आरोपीकडून चार चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या.

या कारवाईमुळे गाडगेनगर, नागपुरी गेट तसेच चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यातील एकूण चार वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**ट्रायलच्या नावाखाली करायचा वाहनचोरीचा डाव-**पोलीस तपासात आरोपीचा गुन्हा करण्याचा अनोखा प्रकार समोर आला आहे. आरोपी ओएलएक्ससारख्या ऑनलाइन ॲपवर विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुचाकींची माहिती मिळवून वाहन मालकांशी संपर्क साधत असे. खोटे नाव व पत्ता सांगून वाहनाची ट्रायल घेण्याच्या बहाण्याने दुचाकी ताब्यात घेतल्यानंतर तो पसार होत असे. त्यानंतर मोबाईल क्रमांक बंद करून मालकांशी संपर्क तोडत असे. ऑनलाइन माध्यमातून वाहन खरेदी-विक्री करताना संबंधित व्यक्तीची संपूर्ण खातरजमा करूनच व्यवहार करावेत. वाहन ट्रायलसाठी देताना ओळखपत्र, मोबाईल क्रमांक आणि इतर आवश्यक माहितीची पडताळणी करावी, असे आवाहन अमरावती शहर पोलिसांनी केले आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, रमेश धुमाळ व सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर, दिनेश दहातोंडे व त्यांच्या पथकाने केली.

### पुसदमध्ये गोळीबार,

या दोघांमध्ये अनेक वर्षांपासून वाद आहे. दोन्ही गट एकमेकांवर हल्ला करण्याची संधी शोधत असतात. मंगळवारी सायंकाळी अंजूम उर्फ वजाहत अली खान (लाला) हा त्याचे साथीदार सुलतान शेख, समीर शेख व इतर तिघे यांना घेवून सार्वजनिक बांधकाम कार्यालया समोर शुभम जगदीश मिश्रा यांच्या टपरीवर उभा होता. दरम्यान तीन वाहनातून हल्लेखोर उतरले. त्यातील एकाने अंजूम लालाच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या. यामुळे एकच तारांबळ उडाली. तर काही हल्लेखोर धारदार चाकू घेवून धावून आले. या हल्ल्यात समीर शेख, सुलतान शेख आणि टपरी चालक शुभम मिश्रा हे तिघे जखमी झाले. अंजूम लाला हा तेथून पेट्रोल पंपाच्या दिशेने पळत सुटला. सुरक्षित ठिकाणी पोहोचल्यावर त्याने हल्लेखोराच्या दिशेने दगड भिरकावले. परिसरात गर्दी जमत असल्याने हल्लेखोरांनी तेथून पळ काढला. मात्र या घटनेने पुसद शहरातील टोळी युद्धाचा भडका उडाल्याचे पुन्हा उघड झाले आहे.घटनेची माहिती मिळताच वसंतनगर पोलिस, एलसीबी पथक व प्रभारी उपविभागीय अधिकारी हनुमंतराव गायकवाड तेथे दाखल झाले. जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. तर अंजूम लाला याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया वसंतनगर ठाण्यात सुरू होती. तक्रारीमध्ये अब्दूल राजिक अब्दूल रउफ, अब्दूल वाजीद अब्दूल रउफ, सरदार खान, अमजद खान, अब्दूल जावेद अब्दूल रउफ सर्व रा. पुसद यांची नावे संशयित म्हणून दिली आहे. जुन्या वैमनस्याची पार्श्वभूमी असल्याने पोलिसांनी ही त्याच दिशेने तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २४ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## मतदार याद्या अधिक अचूक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षणाला गती द्या - जिल्हाधिकारी

### वाशिम, कारंजा व रिसोड येथे एसआयआर कामकाजाची पाहणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत आणि दोषविरहित करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एस आय आर) मोहिमेत प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग सुनिश्चित करावा. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि पर्यवेक्षकांनी नागरिकांपर्यंत पोहोचून गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन प्रभावीपणे करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.*



विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी वाशिम, कारंजा आणि रिसोड येथे भेट देऊन सुरू असलेल्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी इन्युमरेशन फॉर्म (गणना प्रपत्र) डाउनलोड, छपाई, वितरण, संकलन तसेच मतदार नोंदींच्या पडताळणीच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी सांगितले की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील १० लाख २० हजार २०८ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार असून त्यासाठी १,१०० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. हे अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पडताळणार असून गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन करणार आहेत. दौरादरम्यान संबंधित अधिकारी, पर्यवेक्षक आणि निवडणूक कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कामकाजाच्या प्रगतीची माहिती घेण्यात आली. गृहभेटीदरम्यान मतदारांना पूर्वभरित गणना प्रपत्र उपलब्ध करून दिले जाणार असून त्यामध्ये मतदारांची विद्यमान माहिती नमूद असेल. त्यामुळे मतदारांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवून मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. मतदार यादीतील दुबार नावे कमी करणे, मृत मतदारांची नावे वगळणे तसेच नवीन पात्र मतदारांची अचूक नोंदणी करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, कैलास देवरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव, तहसीलदार निलेश पळसकर, प्रतिक्षा तेजणकर, रवी महाले आदींची उपस्थिती होती. विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधितांनी सक्रिय सहभाग नोंदवून सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी यावेळी केले. मुख्याधिकारी, निवडणूक नायब तहसीलदार, पर्यवेक्षक ,निवडणूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हास्तरीय बैठकीत मंथन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनामार्फत स्वतंत्र आणि व्यापक एकल महिला धोरण तयार करण्यात येत आहे. या धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेत स्थानिक स्तरावरील सूचना, अनुभव आणि अपेक्षांचा समावेश व्हावा या उद्देशाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद वाशिम येथील सभागृहात जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली.

आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित या बैठकीत एकल महिलांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. केवळ समस्या मांडण्यापुरते मर्यादित न राहता त्यावर ठोस उपाययोजना सुचविणे, नवीन योजनांची आवश्यकता अधोरेखित करणे, विद्यमान योजनांमध्ये आवश्यक बदल सुचविणे तसेच संबंधित कायदे व नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत अभ्यासपूर्ण मते मांडण्यात आली.



**व्यापक व लोकाभिमुख धोरण निर्मितीसाठी विविध घटकांचा सहभाग**

बैठकीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, जिव्हाळा फाउंडेशनच्या अश्विनी अवताडे, क्षितिज फाउंडेशन मंगरूळपीरचे अतुल राऊत, सामाजिक कार्यकर्त्या वनमाला पेंढारकर, शांतीनिकेतन महिला विकास संस्थेच्या अध्यक्षा वैशाली आरू, अपर्णा सेवाभावी संस्थेच्या अपर्णा जायभाये, जिल्हा उद्योग केंद्राचे उमेश पायघन, माविमच्या कार्यक्रम अधिकारी प्रांजली वसाखे, सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती पाठक यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, अभ्यासक, विषयतज्ज्ञ, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, पर्यवेक्षिका आणि जिल्ह्यातील विविध गावांतील एकल महिला उपस्थित होत्या.

## प्रकाशकांनी ३० जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र (Annual Statement) प्रेस सेवा पोर्टल (PSP) वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे.

यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब)व १४ (३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

## मालेगांवात महेश नवमी जल्लोषात साजरी



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा माहेश्वरी समाजाच्या वतीने मालेगांवात दि.२३ जून रोजी महेश नवमी जल्लोषात साजरी करण्यात आली. माहेश्वरी वंशोत्पत्ती दिवस म्हणजेच महेश नवमी मालेगांवात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी केल्या गेली. या निमित्ताने दि २१ जून पासुन २३ जून पर्यंत विविध सांस्कृतिक, रक्त तपासनी शिबीर असे सामाजिक उपक्रम राबविन्यात आलेत. त्यानंतर दि २३ जून वार मंगळवार ला महेश नवमी साजरी करुन कार्यक्रमांची सांगता करण्यात आली. सदर कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणुन सरोज गट्टानी हे लाभले, सोबतच मुख्य अतिथी मालेगांवचे नगरसेठ श्यामसुंदर मुंदडा तसेच राध्येश्याम मानधने ,डॉ माणिक धूत, डॉ सतीश बाहेती, नथमलजी काबरा, महेश नवमी संयोजक कमलकिशोर मानधने, पूजा यजमान डॉ राजेंद्र सोनी, माहेश्वरी महिला मंडळाच्या मनीषा लाहोटी , तहसील संघटन चे अध्यक्ष ॲड पवन गट्टानी उपस्थित होते.यानिमित्ताने पहाटे ९ च्या सुमारास स्थानिक शिवचौक स्थित श्री सत्यनारायण मंदीर येथुन शोभायात्रेला सुरवात झाली. शहरातुन शोभायात्रा भ्रमण करित असताना समाज बांधव यांचे करीता नगरसेठ श्यामसुंदर मुंदड़ा व महेश क्लब यांचे वतीने शितपेय ठेवन्यात आले. शोभायात्रा भ्रमण करीत माहेश्वरी भवनात डॉक्टर राजेंद्र सोनी यांचे हस्ते सपत्नीक पुजा अभिषेक करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन डॉ.दीपक गट्टानी व मेघा मानधने यानी केले तर आभार प्रदर्शन तालुका माहेश्वरी तहसिल संघटनेचे अध्यक्ष ॲड पवन गट्टानी यानी केले.त्यानंतर महाप्रसाद वितरण करण्यात आला. कार्यक्रमाला संपूर्ण माहेश्वरी समाजातुन अभुतपूर्व प्रतिसाद लाभला.

## डिजिटल चलन प्रणालीमुळे अनुदान वितरणात येणार अधिक पारदर्शकता

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) २.० अंतर्गत सूक्ष्म सिंचन घटकाच्या प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणीसाठी 'पी-सीबीडीसी (प्रोग्रामेबल केंद्रीय बँक डिजिटल चलन) प्रणाली' विषयक विशेष नोंदणी व मार्गदर्शन कार्यशाळा स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र, वाशिम येथे उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील सूक्ष्म सिंचन वितरकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रकल्प संचालक (आत्मा) अनिसा महाबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कडधान्य आत्मनिर्भरता अभियान

### मानोरा तालुक्यात शेतकऱ्यांना बियाणे मिनी किट वाटप



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुका कृषी कार्यालय मानोरा येथे शासनाच्या 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' अंतर्गत नोंदणी केलेल्या गटातील वैयक्तिक लाभार्थी शेतकऱ्यांना आज तूर बियाण्याचे मिनी किट वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी रोशन भागवत यांच्या हस्ते आणि मंडळ कृषी अधिकारी उमेश राठोड यांच्या उपस्थितीत कारखेडा येथील शेतकरी गजानन जयराम पाटील आणि भाऊराव रामलाल राठोड यांचे सह अन्य शेतकऱ्यांना हे किट प्रदान करण्यात आले.

कडधान्य आत्मनिर्भरते साठी शासनाकडून दिले जाणारे हे बियाणे शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. तुरीच्या बियाण्यासह मूग, उडीद या पिकाचे बियाणे सुद्धा कृषी विभागा द्वारे उपरोक्त योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वाटप केले जात आहेत. यामुळे तालुक्यात कडधान्य उत्पादनात वाढ होऊन उत्पन्नात वाढ होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## क्षयरोग तपासणी शिबिरास प्रतिसाद; ६५ संशयितांची तपासणी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र वनोजा येथे सोमवारी संशयित क्षयरुग्णांसाठी विशेष तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात फिरत्या क्ष-किरण वाहनातील अत्याधुनिक डिजिटल एक्स-रे मशिनद्वारे ६५ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. धनश्री जाधव तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक्षा महाले यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी संशयित रुग्णांचे एक्स-रे काढून तपासणी केली.

शिबिरादरम्यान ४२ संशयित रुग्णांचे थुंकी (स्पुटम) नमुने संकलित करण्यात आले. तसेच उपस्थित नागरिकांना क्षयरोग व डेंग्यू प्रतिबंध, लक्षणे आणि उपचारांविषयी सविस्तर आरोग्य शिक्षण देऊन जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमात फार्मसी अधिकारी अमोल राठोड, आरोग्य निरीक्षक सुभाष शेळके, विष्णू कराळे, गटप्रवर्तक रुपाली इंगोले, आरोग्य सेवक अमय पाध्ये, राजेश शेवाळे, उपचार पर्यवेक्षक संतोष बल्हाळ, परिचर प्रशांत तूरक, राजाराम ठाकरे, वाहनचालक गणेश राऊत, संतोष बनसोड तसेच आशा कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्र, वाशिमचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले.

## शासकीय आयटीआय मंगरूळपीर येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), मंगरूळपीर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला असून इच्छुक विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसायांमध्ये प्रवेश घेऊन उज्ज्वल भवितव्य घडवावे, असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय आयटीआय मंगरूळपीर एस. व्ही. नखाते यांनी केले आहे.

शासकीय आयटीआय ही अत्यंत कमी खर्चात दर्जेदार कौशल्य प्रशिक्षण देणारी आणि रोजगार तसेच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारी यशस्वी शासकीय योजना आहे. अनेक दशकांपासून हजारो युवक-युवतींना तांत्रिक कौशल्ये प्रदान करून त्यांना उद्योग, व्यवसाय आणि सेवाक्षेत्रात यशस्वीपणे स्थिर होण्यास मदत केली आहे. प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांनी आधार कार्डवरील माहितीनुसार admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरावा. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह आयटीआयमध्ये उपस्थित राहून अर्ज निश्चित (कन्फर्म) करावा, असे संस्थेचे प्रवेश प्रमुख आर. पी. सोनोने यांनी सांगितले. यावर्षी संस्थेमध्ये अभियांत्रिकी तसेच बिगर अभियांत्रिकी व्यवसायांसाठी एकूण २५६ जागांवर प्रवेश दिला जाणार आहे.

## माहिती अधिकार अधिनियम २०२६ रद्द करण्यासाठी वाशिमात निवेदन; कार्यकर्त्यांचे निवेदन सादर

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

माहिती अधिकार अधिनियम २०२६ रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी सोमवारी वाशिम येथे जिल्हाधिकारी व मालेगाव येथे तहसीलदार कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. माहिती अधिकाराच्या माध्यमातून नागरिकांना प्रशासनाकडून माहिती मिळविण्याचा अधिकार अधिक प्रभावी राहावा आणि जनहिताच्या दृष्टीने आवश्यक बाबींना बाधा येऊ नये, या उद्देशाने संबंधित मागणी करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

कार्यकर्त्यांनी शासनाचे लक्ष या विषयाकडे वेधत अधिनियम रद्द करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. नागरिकांच्या अधिकारांशी संबंधित प्रश्नांवर शासनाने व्यापक चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.



निवेदन सादर करताना मालेगाव तालुक्यातील माणिक डोंगरे जिल्हा संघटक माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ वाशिम, अतुल इंगोले, कवि राठोड, विशाल टाले, अनिल जाधव, मिलींद खरात महादेव वानखेडे, यशवंत जाधव, शरद सोनोने, विनोद वैद्य, सह तालुका प्रचार प्रमुख तथा माहिती अधिकार कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी माहिती अधिकाराशी संबंधित विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. निवेदनाची प्रत प्रशासनाला देण्यात आली असून मागणीबाबत शासन स्तरावर विचार व्हावा, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## खापरदरीतील जल जीवन मिशनचे काम बंद

### पाण्यासाठी ग्रामस्थ आक्रमक, मुख्यमंत्र्यांना निवेदन



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील खापरदरी गावातील 'जल जीवन मिशन' अंतर्गत सुरू असलेली पाणीपुरवठा नळ योजना मध्येच बंद पडली आहे. यामुळे गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

२३/०६/२०२६ रोजी खापरदरी येथील रहिवासी जगदीश शामराव राठोड यांनी मानोरा तहसिलदारांमार्फत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, 'सदर योजनेचे काम सध्या बंद असल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास येत आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित अत्यंत महत्वाचा व तातडीचा विषय आहे.'

ग्रामस्थांच्या अपेक्षित पाणीपुरवठा सुविधेचा लाभ मिळण्यास विलंब होत आहे. त्यामुळे योजनेची वस्तुस्थिती पडताळून काम लवकर पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागास निर्देश द्यावेत अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तहसिल कार्यालय, मानोरा येथे निवेदनाची पोहोच घेण्यात आली आहे.

## नशा मुक्त भारत अभियानांतर्गत वाशिममध्ये जनजागृती उपक्रमांची मालिकाच

### 'नशा मुक्त भारत अभियान : विकसित भारत की पहचान' संकल्पनेला बळकटी ; नागरिकांना सहभागाचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद वाशिम तसेच महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण, कला, क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम. ता. जि. वाशिमद्वारे संचालित नवी दिशा व्यसनमुक्ती प्रचार व प्रसार केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'नशा मुक्त भारत सप्ताह' निमित्त विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मादक द्रव्यांच्या दुरुपयोग व अवैध तस्करीविरोधी आंतरराष्ट्रीय दिनाच्या पार्श्वभूमीवर तसेच 'नशा मुक्त भारत अभियान : विकसित भारत की पहचान' या संकल्पनेला अधिक बळकटी देण्यासाठी दि. १७ जून ते २६ जून २०२६ या कालावधीत जिल्हाभर विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.



या अभियानांतर्गत व्यसनाचे दुष्परिणाम सांगणाऱ्या माहितीपत्रकांचे वितरण, ऑनलाईन व्यसनमुक्ती शपथ लिंक प्रसारण, लघुपटांद्वारे जनजागृती, १८ उदनैल्ैं लिंक प्रसारण, पोस्टर प्रदर्शन, घोषवाक्य वाचन, नशामुक्ती मित्र नोंदणी मोहीम तसेच कलापथकांच्या माध्यमातून जनजागृती असे विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

या उपक्रमांचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करणे, युवकांना व्यसनाच्या विळख्यात अडकण्यापासून परावृत्त करणे, निरोगी व सुदृढ समाजाची निर्मिती करणे आणि विकसित भारताच्या उभारणीत जनसहभाग वाढविणे हा आहे.व्यसनाच्या समस्येत अडकलेल्या व्यक्ती व त्यांच्या कुटुंबीयांसाठी केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय नशामुक्ती हेल्पलाईन क्रमांक १४४४६ उपलब्ध असून नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कार प्राप्त संस्थेचे अध्यक्ष शाहीर संतोष खडसे यांनी केले आहे.

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नागरिक, विद्यार्थी, युवक, महिला, सामाजिक संस्था व स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन 'नशामुक्त भारत' घडविण्याच्या चळवळीत योगदान द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०७ ■ बुधवार, २४ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## तुकाराम मुंडेंचा धाक कायम
# गोरस भंडारानंतर आता 'सुपारीवाल्या'वर धाड;
## १२.२९ लाखांचा प्रतिबंधित माल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरात अवैध व्यवसायांविरोधात सुरू असलेल्या धडक कारवायांमुळे प्रशासनाचा धाक पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. गोरस भंडारावरील कारवाईची चर्चा अद्याप सुरू असतानाच भामटीपुरा परिसरातील सोनू सुपारीवाला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यावसायिकाच्या साठ्यावर पोलिस व अन्न-औषध प्रशासनाने संयुक्त धाड टाकून तब्बल १२ लाख २९ हजार ८७२ रुपयांचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पानमसाला जप्त केला. या कारवाईमुळे गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध व्यापारात गुंतलेल्या मंडळींमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाला भामटीपुरा भागात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री व साठवणूक सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस विभागाच्या मदतीने ताज किराणा या व्यावसायिक प्रतिष्ठानावर छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात सुगंधित तंबाखू, पानमसाला व इतर





तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. अधिक चौकशी केली असता आरोपीने हा माल तीन वेगवेगळ्या ठिकाणी साठवून ठेवल्याचे उघड झाले.

पथकाने तत्काळ त्या ठिकाणी धाड टाकून संपूर्ण मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी शेख इम्राण शेख सुलतान उर्फ सोनू सुपारीवाला याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युवकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रेत्यांवर प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

शहरात काही महिन्यांपासून अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अनेकांनी या धडक कारवायांची तुलना आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या कठोर व नियमप्रिय कार्यशैलीशी केली आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड नाही, असा संदेश प्रशासनाकडून दिला जात असल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे उपायुक्त प्रफुल टोपले, पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशीव वाघमारे व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली शहर ठाण्याचे प्रभारी पो.नि. विलास पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी रविराज धाबर्डे व त्यांचे सहकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि आशिषसिंग ठाकुर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. शरद गायकवाड, पो. अंमलदार गजेंद्र धर्मे, विवेक बन्सोड, प्रशांत वंजारी, नितीन इटकरे, नरेंद्र कांबळे, श्रावण पवार, अमोल ढोबाले यांनी सहभाग घेतला. या धाडीनंतर गुटखा माफियांचे धाबे दणाणले असून आगामी काळात अशाच आणखी कारवायांची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शेतकऱ्यांच्या हक्कावर डाका; काट्यातून चालला लुटीचा उद्योग

### तपासणी अहवालात व्यापारी दोषी, आता मोठ्या माशांवर कारवाई कधी

**आष्टी जनमाध्यम :** आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीतील वजनकाट्याच्या कथित घोटाळ्याने अखेर गंभीर वळण घेतले असून शेतकऱ्यांच्या कष्टाच्या मालावर डल्ला मारणाऱ्या प्रकाराचा पर्दाफाश झाला आहे. व्यापारी मंगेश बालपांडे यांच्या वजनकाट्याची तपासणी केल्यानंतर प्राप्त झालेल्या अधिकृत अहवालात अनियमितता आढळून आल्याने बाजार समिती प्रशासन खडबडून जागे झाले आहे. या प्रकरणात दोषी आढळलेल्या व्यापाऱ्याविरुद्ध कठोर कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत.





बाजार समितीचे सचिव चोपडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वजनकाटा तपासणी निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालात व्यापारी मंगेश बालपांडे दोषी आढळले आहेत. विशेष म्हणजे, इतर दलालांकडून शेतमाल खरेदी करताना याच वजनकाट्याचा वापर होत असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे किती शेतकरी आणि व्यापाऱ्यांची फसवणूक झाली, याबाबत आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्राथमिक कारवाई म्हणून व्यापारी मंगेश बालपांडे आणि निमकरडे यांचे परवाने १५ दिवसांसाठी निलंबित करण्यात आले आहेत. मात्र, एवढ्यावरच समाधान न मानता या संपूर्ण प्रकरणाचा सूत्रधार कोण, घोटाळ्याचे जाळे किती मोठे आहे आणि यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याची सखोल चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

दरम्यान, बाजार समिती प्रशासनाने दोषींना पाठीशी घालणार नसल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. सचिव चोपडे यांनी नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे सांगितले असले तरी शेतकऱ्यांचा प्रश्न एकच आहे, घोटाळा सिद्ध झाला, आता फक्त निलंबन नव्हे तर कायमची दणक्यात कारवाई कधी बाजार समितीतील या प्रकरणामुळे शेतकरी हिताचे रक्षण करण्याच्या यंत्रणांवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# हरवलेली रक्कम परत मिळाल्याने चेहऱ्यावर फुलले हास्य

### सुरक्षारक्षकांच्या प्रामाणिकपणामुळे जपला प्रवाशाचा विश्वास

**वर्धा जनमाध्यम :** आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात प्रामाणिकपणाची जपणूक करणारी एक हृदयस्पर्शी घटना वर्धा विभागीय बस स्थानकावर घडली. बस स्थानकावर कर्तव्य बजावत असलेल्या दोन सुरक्षारक्षकांनी सापडलेली रोख रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे संबंधित मालकाला परत करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.



मंगळवारी (२३ जून) सकाळी ८.४५ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत सुरक्षारक्षक गणेश फरदे व शेख अनीस हे ड्युटीवर असताना प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर त्यांना एक पॅकेट आढळून आले. त्यांनी तत्काळ ते पॅकेट वरिष्ठ अधिकारी वरघणे यांच्या स्वाधीन केले. पॅकेटची पाहणी केली असता त्यामध्ये १ हजार ६४० रुपये रोख रक्कम तसेच काही महत्त्वाची कागदपत्रे असल्याचे दिसून आले.

कागदपत्रांच्या आधारे संबंधित व्यक्तीशी संपर्क साधण्यात आला. त्यांना बस स्थानकावर बोलावून आवश्यक शहानिशा केल्यानंतर रोख रक्कम व कागदपत्रे सुखरूप परत करण्यात आली. हरवलेली रक्कम आणि कागदपत्रे परत मिळाल्याने संबंधित व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले.

गणेश फरदे व शेख अनीस यांच्या प्रामाणिकपणाचे प्रवासी व एसटी कर्मचाऱ्यांनी कौतुक केले. त्यांच्या या कृतीमुळे समाजात अजूनही माणुसकी आणि प्रामाणिकपणा जिवंत असल्याचा सुखद संदेश मिळाला आहे.

# काळ बनून कोसळली वीज; गोठ्यासह खतांचा साठा जळून खाक

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील बाबापूर येथील काशीमपूर शिवारात सोमवारी (दि. २२) दुपारी वीज कोसळून शेतातील गोठ्याला भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत गोठ्यासह रासायनिक खतांच्या २२ बॅगा जळून खाक झाल्या असून शेतकरी शेषराव पाटील यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास परिसरात विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली होती. याचवेळी काशीमपूर शिवारातील शेतात असलेल्या गोठ्यावर अचानक वीज कोसळली. विजेच्या तडाख्यानंतर गोठ्याने पेट घेतला आणि काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. आग इतकी भीषण होती की गोठ्यात साठवून ठेवलेले खत व इतर साहित्य पूर्णपणे जळून गेले.

या आगीत २०-२०-०-१३ या खताच्या ८ बॅगा, युरियाच्या ६ बॅगा, पोटॅशच्या ४ बॅगा तसेच सल्फरच्या ४ बॅगा भस्मसात झाल्या. ऐन पेरणीच्या तोंडावरच खतांचा साठा नष्ट झाल्याने शेतकरी शेषराव पाटील यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. घटनेची माहिती मिळताच महसूल प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा सुरू केला. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या या नुकसानीची दखल घेऊन शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# आभाळाचा कहर : विजेच्या तडाख्यात दुधाळ गाय ठार

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील झडशी परिसरात सोमवारी सायंकाळी झालेल्या विजांच्या कडकडाटाने एका शेतकरी कुटुंबावर संकट कोसळले. वीज पडून दुधाळ गाय जागीच ठार झाल्याने शेतकरी संजय कुणघटकर यांचे सुमारे ७० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

### शेतकरी संजय कुणघटकर यांचे ७० हजारांचे नुकसान; तातडीच्या मदतीची मागणी

माहितीनुसार, २२ जून रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास झडशी परिसरात पावसासह जोरदार विजांचा कडकडाट सुरू होता. त्याचवेळी अचानक वीज पडल्याने संजय कुणघटकर यांच्या मालकीची दुधाळ गाय मृत्युमुखी पडली. ही गाय दुग्ध व्यवसायासाठी महत्त्वाची असून तिच्या माध्यमातून कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला हातभार लागत होता. या घटनेमुळे कुणघटकर कुटुंबासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. आधीच शेतीतील वाढता खर्च, अनियमित पाऊस आणि नैसर्गिक आपत्तींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्याला या घटनेने मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे पंचनामे करून शासनाकडून तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी.

# महाराष्ट्राचा महा एआय उपक्रम देशात ठरणार अभिनव - मुख्यमंत्री

### शासकीय कामकाजाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड; प्रशासनात गती, पारदर्शकता आणि सुरक्षिततेचा नवा अध्याय

**मुंबई जनमाध्यम :** राज्य शासनाच्या विविध विभागांतील कामकाज अधिक कार्यक्षम, वेगवान आणि लोकाभिमुख करण्यासाठी महा एआय (महाराष्ट्र हब फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स) हा देशातील पहिलाच अभिनव कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपक्रम विकसित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे शासकीय कार्यालयांमधील पत्रव्यवहार, अहवाल लेखन, भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तयार करणे आणि माहिती शोधण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

विधानभवन येथे झालेल्या बैठकीत महा एआय प्लॅटफॉर्मचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गिरीश महाजन तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या प्रशासनाला आधुनिक तंत्रज्ञानाची सक्षम साथ देण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने (एनआयसी) महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या



सुरक्षित अधोसंरचनेवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता आणि सुरक्षितता अबाधित राहणार आहे.

'महा एआय'च्या माध्यमातून अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या, अहवाल आणि विविध दस्तऐवज तयार करण्याचे काम अधिक वेगाने करता येणार आहे. तसेच शासन निर्णय, अधिनियम, नियम आणि परिपत्रकांशी संबंधित माहिती काही क्षणांत शोधता येणार आहे. नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण आणि भाषांतर यांसारख्या सुविधाही उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय, शासकीय योजनांमधील लाभार्थ्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने लाभार्थी पडताळणीची सुविधा विकसित करण्यात आली आहे. वापरकर्तानिहाय सुरक्षित लॉगिंग, एंड-टू-एंड एन्क्रिप्शन आणि पदानुसार प्रवेश नियंत्रण यांसारख्या अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणांमुळे संवेदनशील शासकीय माहिती पूर्णपणे सुरक्षित राहणार आहे.

भविष्यात 'महा एआय'ची जोड ई-ऑफिस, आरटीआय, ई-एचआरएमएस आणि 'आपले सरकार'सारख्या विविध ई-शासन प्रणालींशी दिली जाणार आहे. त्यामुळे प्रशासनातील निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान, अचूक आणि पारदर्शक होण्यास मदत मिळणार असून महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुशासनाच्या दिशेने मोठी झेप घेणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

# कारागृह की राजकीय प्रतिष्ठेचा प्रकल्प; १२० एकरांचा हट्ट, शहरातील मोकळी जागा मात्र दुर्लक्षित

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जिल्हा कारागृहासाठी तब्बल १२० एकर जमीन इंझापूर येथे मंजूर झाल्याची घोषणा मोठ्या थाटामाटात करण्यात आली. मात्र या निर्णयामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले असून, विद्यमान कारागृह परिसरात मोठ्या प्रमाणात मोकळी जागा उपलब्ध असताना कारागृह शहराबाहेर हलविण्याची गरज नेमकी काय, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

ब्रिटिशकालीन कारागृहाची क्षमता अपुरी पडत असल्याचा दावा केला जात असला, तरी त्याच जागेवर नवीन इमारती, बरॅक्स व आवश्यक सुविधा उभारण्याचा पर्याय का नाकारण्यात आला, याचे उत्तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी द्यावे, अशी मागणी होत आहे. कारागृह म्हणजे कचरा डेपो किंवा प्रदूषण निर्माण करणारा प्रकल्प नसताना ते शहराबाहेर नेण्यामागील उद्देश काय, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.

शहरातील शासकीय जागांचा योग्य वापर करण्याऐवजी नव्याने १२० एकर जमीन देण्याचा निर्णय हा विकासापेक्षा राजकीय श्रेयवादाचा भाग असल्याची चर्चा रंगू लागली आहे. एका बाजूला शेतकरी, उद्योग आणि सार्वजनिक प्रकल्पांसाठी जमीन उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, तर दुसऱ्या बाजूला कारागृहासाठी एवढ्या मोठ्या क्षेत्राची आवश्यकता नेमकी किती, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



नागरिकांच्या मते, कारागृह आधुनिक करायचे असेल तर विद्यमान जागेवरच विस्तार करून कोट्यवधी रुपयांचा अतिरिक्त खर्च वाचविता आला असता. त्यामुळे 'कारागृहाचा विकास' की जमिनीच्या राजकारणाचा खेळ, याचे उत्तर आता प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी जनतेसमोर ठेवावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# अल्पवयीन मुलाकडून दोन दुचाकी जप्त

### रामनगर पोलिसांची कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील दुचाकी चोरीच्या घटनांचा छडा लावत रामनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेत त्याच्याकडून चोरीच्या दोन दुचाकी जप्त केल्या. या कारवाईमुळे अलीकडील दुचाकी चोरीच्या दोन गुन्ह्यांची उकल झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जून रोजी बॅचलर रोड येथील स्टेट बँक ऑफ इंडिया परिसरातून एक दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार रामनगर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच जुनापाणी चौक परिसरातून आणखी एक दुचाकी चोरीला गेल्याची घटना समोर आली. त्यामुळे पोलिसांनी तपास अधिक गतीने सुरू केला.

गुन्हे शोध पथक चोरीच्या घटनांचा तपास करीत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. त्या आधारे एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्या ताब्यातून चोरीच्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिस निरीक्षक पौर्णिमा राखोंडे यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक दिनेश कांबळे, गजानन मस्के, कैलास वालदे आणि विशाल देवकाते यांनी कारवाईत सहभाग घेतला,

### डोळ्यादेखत गेले मुक्या जीवांचे प्राण
# आभाळ कोसळले अन् संसार उघड्यावर; बैलजोडीच्या मृत्यूने शेतकरी हादरला

**हिंगणघाट जनमाध्यम :** खरीप हंगामाच्या तोंडावरच एका शेतकऱ्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. हिंगणघाट तालुक्यातील नांदगाव-बोरगाव येथे मंगळवारी (दि. २३) दुपारी मुसळधार पावसादरम्यान वीज कोसळून शेतकरी बबन विठ्ठल बावणे यांच्या मालकीची बैलजोडी जागीच ठार झाली. या घटनेत त्यांचे सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

माहितीनुसार, बावणे यांची बैलजोडी शेतातील मशागतीच्या कामासाठी बांधून ठेवण्यात आली होती. दुपारी चार वाजताच्या सुमारास अचानक पावसासह विजांचा कडकडाट सुरू झाला. याचवेळी वीज थेट बैलजोडीवर कोसळली. विजेचा जोरदार तडाखा बसल्याने दोन्ही बैलांचा जागीच मृत्यू झाला. आपल्या डोळ्यादेखत मुक्या जनावरांचा मृत्यू झाल्याने शेतकरी बावणे यांना मोठा धक्का बसला.

घटनेची माहिती मिळताच ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच याबाबतचा अहवाल तहसीलदारांकडे पाठविण्यात आला आहे. शेतीच्या कामासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली बैलजोडी गमावल्याने बावणे कुटुंबासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.


**पाहिजेत**

क्र. उविअ/बां./आर्वी/आस्था-१/वशि २१६२६ दिनांक २३.०६.२०२६

**जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, आर्वी**

(बांधकाम विभाग)

**जाहीर लिलाव**

**जि.प.बांधकाम उपविभाग आर्वी अंतर्गत गुमगांव-तरोडा ग्रा.मा.३७ सा.क.०/५०० ते १/५०० रस्त्याच्या मधोमध व अडचणीचे होणारे सागवान जातीची झाडे कापणे, वाहतूक करणे व विकत घेण्याबाबत.**

जि.प.बांधकाम उपविभाग आर्वी अंतर्गत गुमगांव-तरोडा ग्रा.मा.३७ सा.क.०/५०० ते १/५०० रस्त्याच्या मधोमध्य व अडचणीचे होणारे सागवान जातीच्या लिलाव करणे आहे. तरी सदर लिलावात भाग घेऊ इच्छुकांनी सदर कार्यालयात खाली नमुद केलेल्या दिनांकास व वेळेस उपस्थित रहावे. उशिरा आल्यास किंवा कोणी हरकत घेतल्यास लिलाव मध्ये भाग घेण्यास या कार्यालयामार्फत मनाई करण्यात येईल.

जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, आर्वी येथे जाहीर लिलावाबाबत अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या सुचना फलकावर पाहण्यास उपलब्ध आहे.

**लिलावाचे स्थळ** - जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, आर्वी जि.वर्धा

**लिलावाची दिनांक** - ३०.०६.२०२६ वेळ - सकाळी ११.०० वाजता

**टिप** - सागवान जातीची झाडे लिलावात भाग घेऊ इच्छुकांनी खाली लिलावाच्या दिवशी जि.प.(बांधकाम) उपविभाग, आर्वी येथे लिलावाच्या दिवशी अटी व शतीनुसार (क.१८) मध्ये दिल्याप्रमाणे ओळखपत्राची मूळ प्रत व दोन स्व-साक्षांकित प्रत आपणे बंधनकारक राहील.

**उपविभागीय अभियंता,**
**जि.प.बांधकाम उपविभाग,आर्वी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात

# काँग्रेसचा वीज वितरण कंपनीवर धडक मोर्चा

## तीन दिवसांत समस्या सोडवण्याचे अधिकाऱ्यांचे आश्वासन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

छत्रपती शिवाजी नगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून विजेच्या लपंडावामुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले असून, विशेषतः महिलांना अंधाराचा आणि घरगुती कामांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. छत्रपती शिवाजी नगरमधील याच गंभीर समस्येमुळे त्रस्त झालेल्या शेकडो महिलांना सोबत घेऊन येथील नगरसेविका कल्पना लांजेवार यांनी आक्रमक पवित्रा घेतला. आज काँग्रेसच्या वतीने वीज वितरण कंपनी येथे धडक मोर्चा काढण्यात आला.



पुढील तीन दिवसांत चांदूर रेल्वे शहरासह छत्रपती शिवाजी नगरमधील वीज समस्या सुटली नाही, तर यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल आणि याची संपूर्ण जबाबदारी वीज महामंडळाची असेल. यावेळी अमोल होले, अनिस भाई सौदागर, श्रीनिवास सूर्यवंशी, राजीव लांजेवार, प्रफुल कोकाटे, रुपेश पुडकेसागर, गरुड, सतपाल वरठे, रितेश शेळके, रोहित बाबर, राजश्री माने,आशा गरुड, पुजा यादव, सारिका हटवार, पद्मा हटवार, मेघा जाधव, अश्विनी कवळकर, ज्योती राऊत, संजीवनी राऊत, वंदना माने, मंगला गिरकुंज, पूजा मेहरे, संगीता आगाशे,माया लाजेवार, अनिकेत धुर्वे, सविता लाजवर, दिपाली राठोड, उषा बाबर, सुजाता राऊत, अलका उईके, रेखा छकुले,रोहिणी देशमुख, सुनिता राऊत, किरण गिरकुजे, वैशाली गजबे, अलका उईके, सविता लाजेवार, वेदांत श्रीखंडे, शरद घासले आदी उपस्थीत होते.

**अधिकाऱ्यांचे लेखी आश्वासन**

आंदोलनाचा आक्रमक पवित्रा, छत्रपती शिवाजी नगरमधील महिलांचा वाढता रोष आणि वीरेंद्रभाऊ जगताप यांचा कडक इशारा पाहून वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अखेर नमते घेतले. शहरात वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याची कारणे शोधून, येत्या तीन दिवसांच्या आत सर्व तांत्रिक समस्या निकाली काढण्यात येतील आणि वीज पुरवठा सुरळीत केला जाईल, असे स्पष्ट आश्वासन अधिकाऱ्यांनी आंदोलकांना दिले.

**वीरेंद्र जगताप यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर**

शहरात आणि विशेषतः छत्रपती शिवाजी नगर भागात दिवस असो वा रात्र, कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय तासनतास वीज गुल होत असल्याने सामान्य जनता, व्यापारी आणि विद्यार्थी कमालीचे त्रस्त झाले आहेत. या आंदोलनादरम्यान माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी मोर्चातील महिलांच्या आणि त्रस्त जनतेच्या वतीने वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. 'शहरातील आणि प्रभागातील वीज पुरवठा सुरळीत का ठेवला जात नाही? मेंटेनन्सच्या नावाखाली फक्त कागदोपत्री घोडे नाचवले जात आहेत का?' असा संतप्त सवाल करत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. तसेच वीज कंपनीच्या मेंटेनन्स (देखभाल) कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा थेट आरोपही त्यांनी यावेळी केला.

---

## विना हेल्मेट दुचाकी चालकांचे हार घालून स्वागत

### खल्लार पोलिसांची मोहीम

**खल्लार/वार्ताहर**

रस्ते अपघातात होणारी जिवीतहानी कमी करण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक (ग्रामिण )यांच्या आदेशान्वये जिल्ह्यात सर्वत्र हेल्मेट सक्तीची प्रभावी अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत असून खल्लार पोलिसांनी विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या वाहन चालकांचा हार घालून सत्कार करीत त्यांना सुरक्षिततेचा संदेश देऊन हेल्मेटचे महत्व सांगून दुचाकी वाहनचालकांना भविष्यात नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले.

---

## रक्तदाता संघ मोर्शीच्या वतीने शिबिरात १०१ दात्यांचे रक्तदान

**मोर्शी/वार्ताहर**

जागतिक योगा दिनाचे औचित्य साधून डॉ.श्रीराव मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मोर्शी,उपजिल्हा रुग्णालय मोर्शी तथा रक्तदाता संघ मोर्शीच्या वतीने पार पडलेल्या रक्तदान शिबिरात एकूण १०१ रक्तदात्यांनी रेकॉर्ड ब्रेक रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले.



सर्वप्रथम तहसीलदार सागर ढवळे,दिव्यांग विजय कोकरे रा.अंबाडा,संदीप पोतदार,ऋषिकेश प्रकाश विघे यांनी रक्तदान करून रक्तदान शिबिराची सुरुवात करण्यात आली.शिबिरात विभा चौबे वय ४६, मेहक हरवानी वय २१, भाग्यश्री यावुल वय ३६, उज्वला पाथरे वय ५२, कांचन दंडाळे वय २९ या महिलांनी रक्तदान करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला.दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा डॉ.सागर श्रीराव व डॉ. ऋतुजा श्रीराव यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.रक्त संकलनासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉ.प्रफुल्ल पेदाम,मिलिंद तायडे, जयवंत गावंडे,रश्मी मुळे प्रवीण कळस्कर सुजित वानखेडे,कांचन राऊत,अक्रम सौदागर,नागोराव खडसे,योगेश महाजन,कविता इंगोले,निलेश शेंद्रे उपस्थित होते.शिबिराला डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,कोषाध्यक्ष डॉ.प्रमोद पोतदार, मिलिंद ढोले,सचिव गजानन हिरुळकर, अजय पाटील, बंटी नागले उपस्थित होते.नगरसेविका सुनिता कोहळे,सुनील कोहळे,निखिल ओझा, नवीनकुमार पेठे,प्रणित यावलीकर,अक्षयकुमार राऊत,नितीन ढोले.अजिस पठाण,प्रा.संदीप राऊत,काँग्रेसचे मोर्शी वरुड विधानसभा अध्यक्ष श्रणित राऊत,मनोज लोहकरे,पवन जांभोळे,डॉ.योगेश पोके,नरेंद्र गोहाड,पत्रकार शरद कनेर,संजय उल्हे,संजय गारपवार,नरेंद्र निकम,दिनेश मिश्रा,विजय शिरभाते,शुभांगी शिरभाते,तेजल आकाश शिरभाते,डॉक्टर मंडळी इत्यादींनी सदिच्छा भेट दिली.

---

## स्मार्ट मीटर विरोधात महावितरणवर शेतकरी व शेतमजूरांची धडक

**कुऱ्हा/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य किसान सभा व महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (लालबावटा) तिवसा तालुका यांचे वतीने काही कारण नसतांना जुने मीटर काढुन त्या जागी स्मार्ट मीटर बसविण्याचे धडकसत्र सुरू आहे.ते बसविताच वीज बिलाचे १०० ते२०० टक्के चे वर वाढीव बिल येवून मुळातच डबघाईला आलेला शेतकरी शेतमजूराची सरकार व वीज वितरण कंपनी लुट करीत आहे.याविरोधात कंपनीचे सहाय्यक अभियंता यांचे तिवसा येथील कार्यालयात भेटून त्याच व्दारे मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्रराज्य व मा.जिल्हाधिकारी अमरावती यांना दिले आहे.

यात महाराष्ट्र राज्य सरकारने पंजाब व तामीळनाडू सरकार प्रमाणे स्मार्ट मीटर न बसविण्याचा निर्णय घेण्यात यावा.सन २०१४ पासुन ची विज दरवाढ मागे घ्यावी,कृषी पंपा साठी सोलर ची सक्ती मागे घ्या,२४तास विज पुरवठा करा,निवडणूकीत एन डी ये ने घोषणा केल्याप्रमाण २००युनिट वीज मोफत देण्याचे घोषनेची अंमलबजावणी करा आदी मागण्या करण्यात आल्या. आंदोलनात प्रकाश सोनोने, चंद्रकांत वडस्कर, राजाभाऊ बाभुळकर, मनोहर वाढोणकर, जितेंद्र कोरडे,सलीम खॉ, देवेंद्र बावणे, अंबादास जुवारे, दिलीप गोहत्रे, संजय गोरडे,सुरेश राउत, श्रीकृष्ण लांजेवार,निरंजन बेले,विलास हांडे,सुरेश ढोरे,राहुल भैय्याजी ढोरे,सचिन बारवाल, अशोक भेलकर,प्राविण घुरडे,नथ्युजी फरकाळे,दिलीपसींह नाहटा, तस्लीमा बेग,अरून सुने आनिकेत खुळे,दिनेश लिलव्हे,सय्यद आशिक, सयरा परविन, गुलखॉ,सरफोदीन काजी,शेख आरीफ वंचित बहुजन आघाडी चे युवा जिल्हा महासचिव सागर भवते,प्रशांत काबळे, मनिष खरे,मीलींद यावले यांचे सह शेकडो विज ग्राहक उपस्थीत होते.

---

## 'एकलव्य' मध्ये आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त प्रात्यक्षिक

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक पतंजली योग समिती नांदगाव खंडेश्वर व युवा विकास केंद्र संचालित एकलव्य क्रीडा अकादमी व एकलव्य गुरुकुल स्कूलच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय योग दिनी विविध कार्यक्रम पार पडले.



योग दिनाला प्रमुख अतिथी म्हणून आ. प्रताप अडसड व नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांची उपस्थिती होती. गावामधून योग रॅली काढण्यात आली. यावेळी २०० मुले, मुली, तरुण युवक, युवती, प्रौढ व्यक्ती व महिला मंडळी उपस्थित होते. योग शिक्षक सदानंद जाधव यांनी योग दिनाचे महत्व सांगितले. यावेळी योग दिनाला नगरसेवक योगेश चावाळे, प्रकाश मारोटकर, कांता लोमटे (नगरसेविका), डॉ. प्रांजल सव्वालाखे, डॉ. सुयश मोरे, सीमा जाधव, किशोर चकूले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनुप काकडे (योगशिक्षक), डॉ. महेंद्र मेटकर, विशाल ढवळे, योगसाधक मोनाली शिंदे, रेवती परसनकर, दिनकर गोरले, नितीन देऊळकर, संतोष सुपारे, प्रदीप नांद्रिकर,राजेंद्र लवगे, दिगंबर चौधरी, वामन गुल्हाने, उत्तम मुरादे, सुरेश गंजीवाले, दामू रूमने, मनोज मानतकर, प्रतीक पोफळे, ऋषिकेश चांदुरकर, सुमित गुरमुळे, श्रेया खंडार, ज्ञानेश्वरी कडू, स्कूलचे शिक्षक प्रा. गजानन काकडे, ईश्वर जाधव, प्रमोद सुरजुसे, जनार्धन शेलारे, नीलिमा देवघरे, सविता सुने, रेखा पंचगडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास मारोटकर यांनी केले. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे आवाहन आ. प्रताप अडसड यांनी केले.

---

## उमेश मोर्शे यांची गळफास घेऊन आत्महत्या



**अमरावती-**नांदगाव पेठ येथील प्रसिद्ध साई इलेक्ट्रॉनिकचे संचालक तथा सध्या अर्जुन नगर, अमरावती येथे वास्तव्यास असलेले उमेश शंकर मोर्शे (४८) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी सकाळी घडली.मूळचे नांदगाव पेठ येथील रहिवासी असलेले उमेश मोर्शे मागील सुमारे ३० वर्षांपासून इलेक्ट्रॉनिक व्यवसायात सक्रिय होते. अलीकडच्या काळात ते आर्थिक अडचणीत व कर्जबाजारी असल्याची माहिती समोर येत असून, त्यातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक चर्चा आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला व मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे.

---

## रमेश निचत यांचे निधन



**अंजनगाव बारी-**येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, प्रगतीशील शेतकरी तथा श्रीकृष्ण लीला उत्सव मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते रमेशराव बळीरामजी निचत (वय ८०) यांचे मंगळवार, दि. २३ जून रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले.त्यांच्या निधनाने अंजनगाव बारी परिसरात हळहळ व्यक्त होत असून सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील एक सेवाभावी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

## आसेगाव पूर्णा येथे महावितरणची स्मार्ट मीटर जनजागृती

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

अचलपूर सिटी-१ महावितरण विभागाच्या वतीने आसेगाव पूर्णा येथे स्मार्ट मीटर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांना स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटरचे फायदे, वीज बचत तसेच अचूक बिलिंगबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.



कार्यक्रमास अचलपूर शहर-१ उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता उमेश राठोड, सहाय्यक अभियंता गौरव निस्ताने तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन करत स्मार्ट मीटरमुळे होणाऱ्या विविध लाभांची माहिती दिली. स्मार्ट टीओडी मीटरद्वारे सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या वीज वापरावर प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपयांपर्यंत सवलत मिळू शकते. त्यामुळे ग्राहकांच्या वीज बिलात लक्षणीय बचत होण्याची शक्यता आहे.स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वीज वापराची अचूक व स्वयंचलित नोंद घेतली जाणार असून, चुकीच्या बिलिंगच्या तक्रारींमध्ये घट होईल. तसेच ग्राहकांना दर अर्ध्या तासाने मोबाईलवर वीज वापराची माहिती मिळणार असल्याने वीज वापरावर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवता येणार आहे.महावितरणने स्पष्ट केले की स्मार्ट टीओडी मीटर मोफत बसविण्यात येणार आहेत. आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार करून ग्राहकांनी स्मार्ट मीटरचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान 'नवीन स्मार्ट तंत्रज्ञानाचा स्वीकार करा, स्वस्त वीजेसाठी टीओडी मीटर बसवा' तसेच 'आपल्या घरात स्मार्ट मीटर बसवा, अचूक बिल आणि वीज दरात आकर्षक बचत मिळवा' असे संदेश देण्यात आले.

---

# मराठी विषयात पदव्युत्तर शिक्षणाची सुवर्णसंधी

## विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषा, साहित्य, भाषाविज्ञान, लोकसंस्कृती आणि संशोधन क्षेत्रातील व्यासंगी अभ्यासक घडविणाऱ्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागात शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. गेल्या तीन दशकांपासून विविध भाषा आणि साहित्याच्या अभ्यासाला चालना देत हा विभाग आज एक सशक्त वैचारिक आणि संशोधनाचे केंद्र म्हणून कार्यरत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार तयार करण्यात आलेला पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांच्या केवळ परीक्षाभिमुख विकासावर भर न देता त्यांच्या वैचारिक, सर्जनशील, सामाजिक जाणीव आणि कौशल्याधारित सर्वांगीण विकास घडविणारा आहे. या अभ्यासक्रमामध्ये संशोधनाला विशेष महत्त्व देण्यात आले असून अनुभवी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती, चिकित्सक दृष्टी आणि अभ्यासाची शिस्त विकसित केली जाते. भविष्यातील विविध कार्यक्षेत्रांसाठी ही जडणघडण अत्यंत उपयुक्त ठरते. शिवाय अभ्यासक्रमात उपलब्ध असलेलेवैविध्यपूर्ण पर्याय हे स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीनेही लाभदायक आहेत.

या विभागातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक, शिक्षक, संपादक, अनुवादक, पत्रकार, प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शिवाय काही विद्यार्थ्यांनी निवेदक, समीक्षक आणि अभ्यासक म्हणूनही आपला ठसा उमटविला आहे. विभागातविद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शनाबरोबरच चर्चासत्रे, सादरीकरणे, समूहचर्चा, परिसंवाद, साहित्य अभिवाचन, कवी संमेलने आणि साहित्यिक कार्यशाळांच्या माध्यमातून सर्वांगीण विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

**सर्व विद्याशाखांतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची संधी**

विभागप्रमुख प्रा. डॉ. मोना चिमोटे यांच्या नेतृत्वाखाली विभागामार्फत संशोधनवृत्तीला चालना देणारे परिसंवाद, राष्ट्रीय कार्यशाळा, विशेष व्याख्याने आणि विविध शैक्षणिक उपक्रम सातत्याने आयोजित केले जातात. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य आणि सर्जनशीलतेचा विकास होण्यास मदत होते. या विभागातील विद्यार्थ्यांनी विभागातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय पात्रता परीक्षा आणि राज्य पात्रता परीक्षा उत्तीर्ण करून विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अध्यापन क्षेत्रात यशस्वी वाटचाल केली आहे.पदव्युत्तर मराठी विभागातील एम. ए. प्रवेशासाठी कोणत्याही विद्याशाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना अर्ज करतायेणार आहे.प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी https://sgbau.mastersofterp.in/index.php/site/login या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावा. अर्जासोबत दहावी व बारावीच्या गुणपत्रिका, बोर्ड प्रमाणपत्र, पदवीची गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्स), पासपोर्ट आकाराचा फोटो, जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. माधव पुटवाड (९४२३७५०७०२) आणि प्रा. डॉ. प्रणव कोलते (९८५०४८८२२२) यांच्याशी संपर्क साधावा.विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन अधिष्ठाता तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे आणि कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.



---

## संक्षिप्त

### आ.प्रवीण पोटे यांचा सत्कार



**अमरावती-**जनकल्याण सेवा संस्था विश्वस्त आणि संस्थाद्वारा संचालित डॉ. हेडगेवार हॉस्पीटलच्या वतीने विधान परिषदेचे नवनिर्वाचित आ. प्रवीण पोटे यांचा हृदय सत्कार करण्यात आला. विश्वस्त आनंद दशपुते, सचिव गोविंद जोग, हॉस्पीटलचे प्रकल्प संचालक डॉ.यशोधन बोधनकर,डॉ.श्यामसुंदर गिरी आणि डॉ.मानसी कविमंडन यांच्या वतीने पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. स्थानिक स्वराज्य मतदार संघातून विक्रमी मतांनी विधान परिषद सदस्य म्हणून प्रविण पोटे तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.अमरावतीकरांसाठी त्यांचा हा विजयमहत्वाचा आहे. यासाठी आ.प्रवीण पोटे यांचा जनकल्याण सेवा संस्था विश्वस्त दशपुते, सचिव जोग,हॉस्पीटलचे प्रकल्प संचालक डॉ.बोधनकर,डॉ. गिरी आणि डॉ.मानसी कविमंडन यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आ.पोटे यांनी या सत्कार आणि शुभेच्छांसाठी आभार मानले.

### जिजाऊ प्रतिष्ठानने केले पालखीचे स्वागत



**अमरावती-**गणोरी येथील धर्वसमन्वय महर्षी श्री संत परमहंस महंमदखान महाराज यांची पायदळ पालखी दरवर्षी श्री क्षेत्र गणोरी ते श्री क्षेत्र पंढरपूर असा प्रवास करते. यंदा या पालखी सोहळ्याचे २० वे वर्ष असून गणोरी येथील महाराजांच्या मंदिरात श्रींचा व पादुकांचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पंढरपूरकडे प्रस्थान झाले.पालखीचे आगमन झाल्यानिमित्त अंबा टेलिकॉम कॉलनी, अकोली रोड येथे जिजाऊ प्रतिष्ठानच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.यावेळी जिजाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल पाटील भारसाकळे व प्रतिक्षा भारसाकळे यांनी सहपरिवार पालखीचे पूजन करून स्वागत केले. तसेच उन्ह व पावसापासून संरक्षण व्हावे या उद्देशाने पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना दुपट्ट्यांचे वाटप करण्यात आले.ही पालखी पुढील तीन दिवस अमरावती शहरातून मार्गक्रमण करणार असून त्यानंतर बडनेरा मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.दिंडी व पालखी रविवार, दि. २० जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता पंढरपूर येथील श्री संत गाडगे महाराज मराठा धर्मशाळेत पोहोचणार आहे.पालखी स्वागत सोहळ्यावेळी शेकडो भाविक, वारकरी तसेच गणोरी व अमरावती येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**धामणगाव रेल्वे -** भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी नेते आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त नगरपरिषद कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी नगरपरिषदेतील नगरपरिषदेचे उपाध्यक्ष गिरीश मुंदडा तसेच गटनेता नरेंद्र चौधरी तसेच नगरसेवक तथा भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष दर्शन राठी यांनी हरार पण करून पूजा अर्चना केली अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमादरम्यान नगर परिषदेचे उपाध्यक्ष बंडू मुंदडा यांनी त्यांच्या राष्ट्रसेवा, शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि देशाच्या एकात्मतेसाठी केलेल्या कार्याचे स्मरण केले.आपल्या मनोगतातून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या विचारांचा आजच्या पिढीने आदर्श घ्यावा, असे मत बंडू मुंदडा यांनी व्यक्त केले. देशाच्या अखंडतेसाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील, असेही यावेळी सांगण्यात आले.कार्यक्रमास नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### ज्येष्ठ साहित्यिक,कलावंतांनी मानधन सन्मान योजनेसाठी अर्ज करा

**अमरावती-**ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांसाठी राजर्षि शाहु महाराज ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंत मानधन सन्मान योजना आहे. यासाठी कलाकारांनी १ ते ३१ जुलै दरम्यान अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.या योजनेसाठी सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यानुसार या योजनेचे अध्यक्ष जिल्हाधिकारी, तर सदस्य सचिव उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग राहणार आहेत. तसेच कलावंताची मानधन योजनेसाठी निवड करताना त्यांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जाणार आहे. त्यामुळे पात्र कलावंतांनी aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस यांनी केले आहे.

---

## कठोरा बु. येथे आरोग्य सेवा कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**



आयुष्मान आरोग्य मंदिर, कठोरा बुद्रुक येथे 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या अभियानांतर्गत श्री गुलाबराव महाराज यांच्या पालखी निमित्त विशेष आरोग्य सेवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान पालखीतील वारकरी तसेच गावातील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभाग नोंदवून आरोग्य सेवांचा लाभ घेतला. नागरिकांना आवश्यक आरोग्य सल्ला व विविध आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या.या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा कठोरा बु येथील मुख्याध्यापिका अपर्णा सोनटक्के, सहाय्यक शिक्षक राजेंद्र दिक्षित, साहेब शिक्षिका गौरी नानवटकर, विषय शिक्षक रामचंद्र चव्हाण व डॉ. पूनम इंगळे (समुदाय आरोग्य अधिकारी),अर्चना नांदने (आरोग्य सेविका), प्रवीण रमेशपंत निंभोरकर (आरोग्य सेवक),सुवर्णा मेश्राम (आशा स्वयंसेविका), रिना मेश्राम, देवांगना उमाळे, रिना खडसे तसेच सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'एल निनो'चा परिणाम

जून महिना संपत आला असून देखील देशात अद्याप समाधानकारक पावसाची सुरुवात झालेली नाही. 'नेमेचि येतो पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा' ही कविता आता जणू पुस्तकांपुरतीच मर्यादित राहिली आहे. भारताची शेती आणि अर्थव्यवस्था या दोन्ही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे पाऊस कमी झाला तर त्याचा फटका या दोन्ही क्षेत्रांना बसतो. परिणामी शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या अडचणी वाढतात. देशपातळीवर विचार केला तर आतापर्यंत सरासरीपेक्षा सुमारे ३५ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. तर मध्य भारतात पावसाची तूट तब्बल ६३ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. हे आकडे निश्चितच चिंताजनक आहेत. कारण पावसाची सुरुवातच इतकी संथ आणि कमकुवत झाली असेल, तर पुढील काळात परिस्थिती काय स्वरूप धारण करेल, याची चिंता शेतकरी आणि अर्थतज्ज्ञ या दोघांनाही सतावत आहे. महाराष्ट्रातही पावसाची वाटचाल जवळपास ठप्प झाली आहे. मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांतील जलसाठा इतका खालावला आहे की उपलब्ध पाणी केवळ पुढील ४५ दिवस पुरेल, अशी स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, हवामान विभागाने (आयएमडी) काही भागांमध्ये ६० टक्क्यांपर्यंत कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. हा अंदाज केवळ शेतकऱ्यांचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची चिंता वाढवणारा आहे. पावसाच्या या अनिश्चिततेमुळे शेती, अर्थव्यवस्था आणि जनजीवन यांच्यासमोर एक मोठी परीक्षा उभी ठाकली आहे. कमी पावसाचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणून एल निनो इफेक्टचा उल्लेख केला जातो. एल निनोमुळे पॅसिफिक महासागरातील पाण्याचे तापमान वाढते आणि जागतिक वाऱ्यांच्या प्रवाहात बदल होऊन मान्सूनवर प्रतिकूल परिणाम होतो. परिणामी पाऊस कमी होतो किंवा उशिरा दाखल होतो. कमी आणि विलंबाने झालेल्या पावसाचा थेट परिणाम खरीप पिकांवर होतो. खरीप हंगाम हातातून जाण्याचा धोका निर्माण होतो, ज्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. देशासमोरील मोठे आव्हान केवळ आंतरराष्ट्रीय घडामोडी किंवा इतर भू-राजकीय संकटे नसून, एल निनोचा भारतीय शेती आणि शेतकऱ्यांवर होणारा परिणाम हे आहे. भारतासमोर सध्या दुहेरी आव्हान आहे. एकीकडे कमी पावसाचा धोका आणि दुसरीकडे त्यातून निर्माण होणारी महागाई व अन्नधान्य टंचाईची शक्यता. ही चिंता अधिक वाढली जेव्हा हवामान विभागाने २०२६ साठी एलपीए पावसाचा अंदाज सामान्य पावसाच्या तुलनेत कमी राहण्याची शक्यता दर्शवली. पाऊस सरासरीपेक्षा कमी राहिल्यास त्याचे परिणाम शेतीपुरते मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतात. भारतीय अर्थव्यवस्था अजूनही शेतीवर अवलंबून आहे. शेती क्षेत्रावर परिणाम झाल्यास ग्रामीण भागातील उत्पन्न कमी होते, मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. कृषी क्षेत्र आजही भारताच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. देशातील सुमारे ४५ टक्के लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीचे उत्पन्न, उत्पादन आणि हवामानातील बदल यांचा परिणाम घरगुती उत्पन्न, महागाई तसेच एकूण उपभोगाच्या पातळीवर होत असतो. अशा परिस्थितीत कमी पाऊस किंवा अवर्षणाचा परिणाम व्यापक स्वरूपात जाणवणे साहजिक आहे. या परिस्थितीवर दीर्घकालीन उपाय म्हणून पीक पद्धतीत बदल करणे आणि जास्त पाणी लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र कमी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशासारख्या राज्यांमध्ये उसासारख्या पाणीखाऊ पिकांना मोठे महत्त्व दिले जाते. मात्र, अनेक भागांमध्ये धरणे, तलाव आणि इतर जलस्त्रोतांवर ताण वाढत असून काही ठिकाणी पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही वेळा राजकीय कारणांमुळे आवश्यक निर्णय घेण्यास विलंब होतो, पण बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर आता या विषयावर ठोस पावले उचलण्याची गरज आहे. दुष्काळाचा सामना करू शकणाऱ्या पिकांकडे शेतकऱ्यांनी हळूहळू वळणे हा भविष्यासाठी महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. सध्याच्या पावसाचे प्रमाण आणि हवामानाचे अंदाज पाहता देशातील काही भागांमध्ये अवर्षणाची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, शेतकऱ्यांनी लगेच घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. सरकारच्या मते एल निनोचा परिणाम यावेळी फार व्यापक स्वरूपाचा नसेल आणि पिकांची उत्पादकता तसेच पावसाच्या प्रमाणावरत्याचा मोठा परिणाम होणार नाही, अशी अपेक्षा आहे. तरीही बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत शेती पद्धतीत सुधारणा, पाण्याचा योग्य वापर, पीक विविधीकरण आणि कमी संसाधनांमध्ये उत्पादन देणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. जूनच्या मध्यापर्यंत अपेक्षेइतका पाऊस झाला नाही आणि सुमारे ३२ टक्के तूट नोंदवली गेली. तरीही शेतकरी खरीप पेरण्यांमध्ये व्यस्त असून, विशेषतः तांदळाच्या लागवडीवर भर देत आहेत. युद्धजन्य परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीमुळे उत्पादकतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे, त्यामुळे शेतकरी आणि कृषी व्यवस्थेसमोर आव्हाने निर्माण झाली आहेत. अर्थतज्ज्ञांच्या मते, भारतीय शेतकरी कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यास सक्षम आहेत. कृषी मंत्रालयाच्या माहितीनुसार, खरीप लागवडीचे क्षेत्र अद्याप घटलेले नाही आणि ते ८४.६ लाख हेक्टर आहे. एल निनोच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास सरकारकडून सुरू आहे, मात्र सध्या परिस्थिती चिंताजनक पातळीवर नसल्याचे सांगितले जात आहे. तरीही शेतकऱ्यांना सावध राहण्याची गरज आहे. जून संपत आला असताना पाऊस अपेक्षेप्रमाणे झालेला नाही. कमी मॉन्सूनमुळे उत्पादन घटणे, जलाशयांची पातळी कमी होणे आणि भूजल उपशावर दबाव वाढणे अशी आव्हाने निर्माण होऊ शकतात. यावर रेनवॉटर हार्वेस्टिंगसारखे उपाय महत्त्वाचे ठरू शकतात. कमी पावसाचे दोन मोठे परिणाम होऊ शकतात. एक म्हणजे अन्नधान्य उपलब्धतेवर परिणाम आणि दुसरे म्हणजे ग्रामीण मागणी कमी होऊन अर्थव्यवस्थेवर दबाव येणे. सरकारने क्रायसिस मॅनेजमेंट ग्रुपसह विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे आगामी काळ हा सरकार आणि कृषी क्षेत्रासाठी निश्चितच एक महत्त्वाची परीक्षा ठरणार आहे.

# इथेनॉल : नुकसान भरपाई कोण करणार?



केंद्रातील मोदी सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या वक्तव्यामुळे देशाच्या इंधन धोरणाबाबत काही अत्यंत गंभीर आणि मूलभूत प्रश्न उपस्थित होत आहेत, ज्यांची उत्तरे मिळणे गरजेचे आहे.

नितीन गडकरी यांचे अधिकृत खाते 'केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय' हे आहे. मात्र, गेल्या काही वर्षांतील त्यांचा एकूण कार्यकाळ पाहिला तर ते रस्ते बांधणीपेक्षा पेट्रोल, डिझेल, इथेनॉल आणि इंधन धोरणांवरच अधिक भाष्य करताना आणि निर्णय घेताना दिसतात. या सरकारला १२ वर्षे झाली तरी देशातील रस्त्यांची अवस्था आपल्या सर्वांना माहिती आहेच, तो आणखी वेगळा मुद्दा. नुकतीच त्यांनी वाहनांमध्ये १०० टक्के इथेनॉल वापरासंदर्भातील फाईलवर स्वाक्षरी केल्याची माहिती दिली. येथे प्रश्न असा पडतो की, इंधन क्षेत्रातील सर्व मोठे निर्णय रस्ते वाहतूक मंत्र्यांकडूनच घेतले जाणार असतील, तर देशात स्वतंत्र पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय असण्याचे कारण काय? सध्या हे पद सांभाळणारे मंत्री (हरदीपसिंग पुरी) नेमके काय भूमिका बजावत आहेत? इंधन धोरणातील हा सततचा हस्तक्षेप प्रशासकीय समन्वयाचा भाग आहे की एकाधिकारशाहीचा, यावर चर्चा होणे गरजेचे आहे.

### इथेनॉल निर्मिती आणि पाण्याचे संकट

इथेनॉलच्या आंधळ्या समर्थनावर गेल्या काही काळापासून वैज्ञानिक आणि पर्यावरणीय पातळीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र, तथ्यांची पडताळणी न करता केवळ राजकीय भूमिकेतून या विषयाचे अंधपणे समर्थन करणाऱ्या ट्रोल्सनी नेहमीच या गंभीर इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले. 'इथेनॉलसाठी जास्त पाणी लागत नाही,' हा दावा पूर्णपणे शेती आणि भूजल वास्तवाशी विसंगत आहे. भारतातील इथेनॉल उत्पादनाचा सिंहाचा वाटा हा ऊस आणि साखर उद्योगाचा आहे. ऊस हे देशातील सर्वाधिक पाणी पिणाऱ्या पिकांपैकी एक. महाराष्ट्रासारख्या दुष्काळप्रवण आणि पाणीटंचाईग्रस्त प्रदेशात उसाच्या अतिरिक्त लागवडीमुळे भूजल पातळी चिंताजनक पातळीवर खालावली आहे. याच कारणामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि अजित पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांनीही शेतकऱ्यांना उसाचे क्षेत्र कमी करून सोयाबीन किंवा कापसासारख्या हंगामी पिकांकडे वळण्याचा सल्ला दिला होता. तसेच, प्रसिद्ध जलतज्ज्ञ राजेंद्र सिंह यांनीही दुष्काळी पट्ट्यात ऊस लागवडीवर निर्बंध आणण्याची स्पष्ट शिफारस केली होती. दुर्दैवाने, अशा वैज्ञानिक आणि पर्यावरणपूरक भूमिकेलाही टीकेचे लक्ष्य बनवले गेले. केवळ 'आयात कमी होईल' या एकाच मुद्यावर लक्ष केंद्रित करून पाण्याचा अतिवापर, पीकपद्धतीतील बिघाड आणि अन्नसुरक्षेचा प्रश्न याकडे डोळेझाक



करता येणार नाही.

### वाहनांचे अतोनात नुकसान

गेल्या दोन-तीन वर्षांत इंधनात इथेनॉलचे मिश्रण सक्तीचे केल्यानंतर आता त्याचे अत्यंत घातक परिणाम जमिनीवर दिसू लागले आहेत. सोशल मीडियात ऑटोमोबाईल मेकॅनिक्स आणि वाहनधारकांचे अनेक व्हिडिओ आणि अहवाल आता उघडपणे समोर येत आहेत. इथेनॉल मिश्रित इंधनामुळे वाहनांच्या पेट्रोल टाकीत रासायनिक प्रक्रिया होऊन राळ आणि ग्रीससारखा चिकट पदार्थ जमा होत आहे, असे व्हिडिओमध्ये दिसून येते. शिवाय लोखंडी आणि धातूचे भाग गंजून इतके जीर्ण होत आहेत की ते बोटाने खरवडले तरी निखळतात. मायलेज आणि परफॉर्मन्स वर होणार परिणाम आणखी वेगळा.

गाड्यांचे सरासरी मायलेज कमालीचे घटले असून धावत्या गाड्या अचानक रस्त्यात बंद पडण्याच्या घटना वाढल्या आहेत. हा परिणाम तात्काळ दिसत नसल्याने सुरुवातीला जेव्हा इथेनॉलचा निर्णय झाला तेव्हा ग्राहकांना याचा अंदाज आला नाही, मात्र आता दोन-तीन वर्षांचा कालावधी उलटल्यानंतर गाड्यांची झालेली ही दुरावस्था उघड झाली आहे. याला जबाबदार कोण?

### सक्तीचा प्रयोग

नितीन गडकरींचा पर्यावरणपूरक विचार आणि कच्च्या तेलाची आयात कमी करण्याचा उद्देश योग्यच आहे, त्याला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. आपण आत्मनिर्भर बनले पाहिजे, आहे. परंतु, पर्यायी सुरक्षित व्यवस्था निर्माण न करताच हा अघोरी प्रयोग जनतेवर का लादला गेला? आधी आपल्याकडे १०० टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने उपलब्ध नव्हती, हे गडकरी यांच्या आताच्या निर्णयाने स्पष्ट झालेले आहे. असे असताना सामान्य वाहनांच्या इंधनात इथेनॉलचे मिश्रण सक्तीचे करून ग्राहकांना आर्थिक विवंचनेत टाकण्यात आले.

जनता शांत आहे, विरोध करत नाही म्हणून त्यांच्या हक्कांवर गदा आणली जात आहे का, मऊ लागले म्हणून कोपराने खणले जाते आहे अशी भावना निर्माण झाली आहे.

या संपूर्ण प्रकरणात देशातील न्यायालयेही जनहिताचे रक्षण करताना दिसत नाहीत, ही सर्वात मोठी चिंतेची बाब आहे. सरकारने जनतेला आधी सक्षम पर्याय उपलब्ध करून द्यावा, सक्तीचे निर्णय लादू नयेत. शिवाय ज्याना शुद्ध पेट्रोल भरायचे असेल त्यांना भरण्यासाठी पर्याय उपलब्ध करून द्यावा आणि एकाधिकारशाही गाजवू नये, अशी रोखठोक भूमिका न्यायालयाने घेणे अपेक्षित होते. मात्र, न्यायालयही सत्ताधारी आणि बड्या उद्योगपतींच्या हिताकडे झुकले आहे की काय, अशी भीती वाटू लागली आहे.

कोणत्याही धोरणात्मक बदलाची किंमत सामान्य नागरिकाने आपल्या कष्टाच्या पैशातून का मोजावी? तांत्रिक आणि पर्यावरणीय बाजूंचा सखोल अभ्यास न करता घेतलेल्या या घाईघाईच्या निर्णयांमुळे आज लाखो वाहनांचे नुकसान झाले आहे.

त्यामुळे आज देशातील प्रत्येक वाहनधारक आणि सामान्य नागरिक सरकारला हाच सवाल विचारत आहेः 'आमच्या झालेल्या या आर्थिक आणि मानसिक नुकसानीची भरपाई अखेर कोण करणार?'(इथेनॉल बनविणाऱ्या गेल्या काही वर्षात अती मोठ्या झालेल्या कारखानदारांची नावे यात सौजन्य म्हणून घेतली नाही आहेत, कृपया याची योग्य नोंद घेण्यात यावी.)

(साभार -वॉट्स ॲप)

# बी.टीं.च्या सहवासात

✍किशोर देशपांडे

२००९ साली मला एकदा प्रभाकरराव वैद्य यांचा फोन आला. नांदगाव पेठ मधील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रातील जागेत सोफिया नावाची कंपनी औष्णिक विद्युत प्रकल्प सुरु करणार आहे आणि त्यासाठी महाराष्ट्र शासनाने त्या कंपनीला अप्पर वर्धा धरणातून पाणी द्यावयाचे ठरविले आहे; त्यामुळे हजारो एकर शेतजमीन सिंचनापासून वंचित राहील. त्याकरिता विदर्भ अनुशेष निर्मुलन समितीच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करता येईल का, याबाबत मी बी.टी.देशमुख व सोमेश्वर पुसतकर यांचेसोबत नागपुरला जाऊन कृष्णरावांशी चर्चा करावी, असे प्रभाकररावांनी मला सुचविले. कृष्णराव देशपांडे हे माझे ज्येष्ठ बंधू उच्च न्यायालयातील सिनियर ॲडव्होकेट होते. लगेच सोमेश्वर पुसतकर मला येऊन भेटले व कृष्णरावांना फोन करून आम्ही त्यांची वेळ घेतली आणि बी. टी. देशमुख सरांसोबत नागपूरला गेलो. तोपावेतो माझी बी.टी. सरांशी नुसती तोंडओळख होती. सोमेश्वर पुसतकर यांचे मी फक्त नाव ऐकले वाचले होते. राजकारणी मंडळींपासून मी जरा दूरच राहत असे. बी.टी. सरांचे कार्य आणि विद्वत्ता तरुणपणापासून माझ्या ऐकण्यात होती. पण प्रत्यक्ष भेट व प्रवास एकत्र होईल असे कधीही वाटले नव्हते. नागपूरच्या त्या प्रवासातही मी त्यांच्यासोबत थोडा संकोचानेच व जुजबी बोलत होतो. कृष्णरावांकडे एकूण चर्चा झाल्यानंतर हायकोर्टात पीआयएल करावी असे ठरले. निघता निघता कृष्णरावांनी मला याचिकेचा मसुदा करायला सांगितले. मसुदा तयार करताना बी.टी. सरांसोबत अनेकदा बसावे लागले. त्यांच्या तोंडून फाजल अली कमिशन, नागपूर करार, घटना दुरुस्ती, कलम ३७१(२) नुसार राष्ट्रपती व राज्यपालांना महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या मागास भागांसाठी विकास मंडळे स्थापन करण्याचे मिळालेले अधिकार, सिंचन अधिनियम, केंद्र व राज्ये यांची जलनीती, अप्परवर्धा धरणाचा इतिहास इत्यादी भरपूर माहिती मिळत गेली. ही सर्व माहिती थोडक्यात आपल्या याचिकेत यावी, असा त्यांचा आग्रह होता.

बी. टी. सर हे शालेय जीवनापासूनच संयुक्त महाराष्ट्राचे कट्टर समर्थक होते. वेगळ्या विदर्भाची मागणी त्यांना मान्य नव्हती. सर्व मराठी भाषिकांचे एकच राज्य असावे ही संयुक्त महाराष्ट्र समितीची मागणी त्यांना योग्य वाटायची. शिवाय महाराष्ट्रात राहिल्यानेच विदर्भाचा विकास होईल असेही त्यांचे मत कायम होते. आमच्या गप्पांमध्ये त्यांनी असे कारण सांगितले की मुंबई सह महाराष्ट्र झाला तर मुंबई शहरातून व आसपासच्या परिसरातून मिळणारा महसूल हा राज्याच्या इतर भागांच्या तुलनेत खूप जास्त असल्यामुळे राज्याच्या महसुलाचे न्याय्य व संतुलित वाटप करताना शासनाला विदर्भ मराठवाड्याकडे तो वळविणे भाग पडेल. परंतु वेगळा विदर्भ झाल्यास महसूल निर्मिती विशेष होणार नाही आणि त्यामुळे विदर्भाचा विकासही खुंटून राहील. संविधानाच्या ३७१(२) कलमातील तरतुदींवर विदर्भातील नेत्यांनी अधिक भर द्यावा आणि वेगळे विकास मंडळ पदरात पाडून घेऊन विकासाचा असमतोल दूर करण्यासाठी संघर्ष करावा, ही त्यांची भूमिका होती. या भूमिकेला धरूनच त्यांचा विधीमंडळात आणि न्यायपालिकेत देखील संघर्ष सुरु होता. सोफिया (नंतरचे बदललेले नाव 'इंडिया बुल') प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने विकलेल्या अप्पर वर्धा धरणातील पाण्यामुळे विदर्भातील सिंचनाचा अनुशेष आणखी वाढणार, ही बाब लक्षात घेऊनच त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करायचे ठरविले होते.

सोफिया प्रकरणापूर्वी बी. टी सरांशी माझा प्रत्यक्ष संपर्क नव्हता. नुटाच्या व विद्यापीठाच्या काही प्रकरणांमध्ये मी त्यापूर्वी अभिप्राय दिले होते आणि एखादा दावा देखील चालविला होता. पण बी टी सर मला तेव्हा म्हणाले की तुमचे ड्राफ्टिंग मी वाचले आहे आणि आपली वेव्हलेंग्थ जुळू शकते. त्यांनी ती हिम्मत दिल्यामुळे मी त्यांनी सुचविलेले मुद्दे घेऊन याचिका तयार केली. ती त्यांना आवडली. पुढे हाय कोर्टात सुनावणीच्या वेळी सोमेश्वर आणि बी.टी. सर मला प्रत्येक तारखेला नागपूरला नेऊ लागले. त्या जाण्या-येण्याच्या प्रवासात आमच्या खूप गप्पा व्हायच्या. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, शिक्षण, बाळासाहेब मराठे यांच्या सोबत आलेला संबंध, दैनिक हिंदुस्थानमध्ये त्यांनी केलेले काम, नंतरची प्राध्यापकी, नुटा या प्राध्यापकांच्या संघटनेची स्थापना आणि विधानपरिषदेची पहिली निवडणूक- असा सर्व इतिहास मी आणि सोमेश्वर त्यांना युक्तीने प्रश्न विचारून हळू हळू समजून घेत गेलो. पुढे आमची याचिका एकाएकी व आम्हाला पूर्वसूचना न देता मुंबई उच्च न्यायालयाच्या तत्कालीन मुख्य न्यायमूर्तींनी नागपूरहून मुंबईला मागवून घेतली आणि पुढे ती अनेक महिने रखडत राहिली. त्यामुळे आम्हा तिघांच्या मुंबईला देखील अनेक चकरा झाल्या. कधी कधी आमच्या सोबत मुंबई हायकोर्टात आमदार वीरेंद्र जगताप व बच्चूभाऊ कडू हे देखील असायचे. सोमेश्वर पुसतकर हे एक कुशल आयोजक होते. प्रत्येक प्रवासात बी.टी. भाऊंना, कृष्णरावांना व मला काय आवडते याची नोंद मनात ठेऊन सोमेश्वर तशी योजना करायचे. बी.टी. सरांना जुन्या काळातील मराठी संगीत नाटकांची खूप आवड होती. तसे त्यांनी आमच्या गप्पांमध्ये एक-दोन वेळा सांगितले होते. संगीत सौभद्र या नाटकाचा ते विशेष उल्लेख करायचे. एकदा मी त्याच नाटकातील 'लग्नाला जातो मी' या पदावरून पु. लं. नी लिहिलेला एक किस्सा सरांना ऐकवला. हे पद गाणारा नट इतके वेळा ही एकच ओळ वेगवेगळ्या प्रकारे गात राहिला की, पिटातल्या एका प्रेक्षकाने ओरडून सांगितले,'अरे बाबा, आतापर्यंत त्या सुभद्रेचं लग्न होऊन तिला मुलबाळही झाले असेल'. हे ऐकून बी.टी. खळखळून हसले आणि त्यांनी पु.लं. ना दाद दिली. मुंबईच्या मुक्कामात एकदा पेपर वाचताना सोमेश्वरला त्याच नाटकाची जाहिरात दिसली. परंतु तो प्रयोग कोणत्यातरी उपनगरात होणार होता आणि आम्ही मुंबईच्या दक्षिण टोकाजवळ आमदार निवासात होतो. तरीही कोर्टाचे काम आटोपल्यावर सोमेश्वर जिद्दीने बी.टी. सरांना संगीत सौभद्रचा तो प्रयोग दाखवायला घेऊन गेले आणि सर त्यामुळे आनंदीत झाले.

अश्याच गप्पांमध्ये एकदा मी आणि सोमेश्वरने सरांना त्यांच्याविषयीची अनेकांची एक तक्रार ऐकविली. साधारणतः मुंबईतल्या आमदार निवासांचा उपयोग हा संबंधित आमदारांच्या मतदार संघातील परिचित लोकांना उतरण्यासाठी सर्रास होत असतो. परंतु बी.टी. सर कोणत्याही कार्यकर्त्याला अथवा मतदाराला आमदार निवासातील त्यांच्या खोलीत उतरू देत नसत, अशी ती तक्रार होती. ते ऐकून सर आम्हाला हुतात्मा चौकाजवळील आमदार निवासातील त्यांच्या खोलीत घेऊन गेले. तो दोन खोल्यांचा एक ब्लॉक होता. पैकी एका खोलीत कागदपत्रांचे ढिगारे आणि पुस्तके होती. दुसरी खोली सर स्वतः वापरत होते. त्यांनी आम्हाला सांगितले की विधी मंडळाचे अधिवेशन सुरु झाल्यानंतर दर आठवड्याच्या कामकाजाची विषयपत्रिका, तारांकित प्रश्न व त्यांची उत्तरे आणि इतर संबंधित दस्तऐवजांचा गठ्ठा प्रत्येक आमदाराला पुरविण्यात येतो. ते सर्व कागदपत्र बारकाईने वाचणे, टिपणे काढणे, पूरक प्रश्नांची तयारी करणे इत्यादी कामे त्यांना अधिवेशन काळात करावी लागतात. त्यामुळे त्यांना खोलीत शांतता व एकांताची गरज असते. आमदारांच्या अभ्यासासाठी एवढी मोठी साधनसामुग्री पुरविली जाते, हे आम्हाला माहितच नव्हते.



बी.टी. सरांना चांगले-चुंगले (अर्थात फक्त शाकाहारी) खाण्याची आवड होती. याचे भान राखून मुंबईच्या प्रत्येक प्रवासात सोमेश्वर मूर्तिजापूर स्टेशनवर कुठूनतरी आम्हा तिघांसाठी डबा मागवत असे. त्यातील जेवण उत्कृष्ट असायचे. एकदा मुंबईला हायकोर्टातील काम आटोपल्यावर सोमेश्वर याच भागातील ओळखीच्या दोन-तीन लोकांशी गप्पा मारत रेंगाळले होते. आम्हाला जेवायला जायचे होते. परंतु त्यांच्या गप्पा लगेच थांबतील अशी लक्षणे दिसत नव्हती. बी.टी. सरांनी माझा हात दाबून इशारा केला आणि आम्ही दोघेच झप झप चालत त्या मंडळींपासून दूर झालो. सर मला जवळच्या एका प्रसिद्ध उपहारगृहात घेऊन गेले. तिथे बसल्यावर त्यांच्या सांगण्यावरून मी सोमेश्वर यांना फोन करून आम्ही दोघे काही कामाने बाहेर गेलो आहोत आणि सोबतच्या मंडळींसोबत सोमेश्वरने जेवून घ्यावे असा निरोप कळविला. जेवण झाल्यावर सरांनी डेबिट कार्डने पेमेंट केले आणि मग खुलासा केला की त्यांचे हे डेबिट कार्ड नवीन असून त्यांना ते टेस्ट करायचे होते.

अपेक्षेप्रमाणेच सोफिया प्रकरणाचा निकाल मुंबईला आमच्या विरुद्ध लागला. दिल्लीला सुप्रीम कोर्टात केलेले अपील देखील पहिल्या सुनावणीतच फेटाळण्यात आले. परंतु एक फायदा या संघर्षाचा झाला. केंद्र शासनाची तसेच राज्यशासनाचीही पाणी वाटपासंबंधी जलनीती (ॅ ज्दत्ग्म्ब) ठरलेली असते. त्यात प्राधान्यक्रम दिले आहेत. केंद्र शासनाच्या जलनीतीनुसार पहिली प्राथमिकता पिण्याचे पाणी, नंतर सिंचन व तिसरा क्रमांक उद्योगक्षेत्र असा आहे. मात्र महाराष्ट्राच्या जलनीतीनुसार पिण्याच्या पाण्यानंतर उद्योग व तिसऱ्या क्रमांकावर सिंचन असा प्राधान्यक्रम होता. ही बाब आमच्या वकिलांनी (अर्थात बी.टी.सरांनी सुचविल्यानुसार) हायकोर्टाच्या निदर्शनास आणून दिली होती. नंतर या मुद्द्यावर विधी मंडळात देखील तत्कालीन विरोधी पक्षांनी आवाज उठविला आणि महाराष्ट्र शासनाला केंद्र शासनाप्रमाणेच पिण्याच्या पाण्यानंतर प्रथम सिंचन व तिसऱ्या क्रमांकावर उद्योग असा बदल राज्य जलनीतीमध्ये करणे भाग पडले.

बी. टी. सरांवर गाडगे बाबांचा खूप प्रभाव होता. त्यांनी एका नागपूरच्या प्रवासात आम्हाला गाडगे बाबांच्या संपूर्ण कीर्तनाची हुबेहूब नक्कल करून दाखविली. त्यांच्या लहानपणी आसपासच्या पंचक्रोशीत गाडगे बाबांचे कीर्तन कोण्या गावात होणार अशी बातमी मिळाली की सर तिथे जाऊन ते कीर्तन ऐकून घेत. त्यांचे धाकटे बंधू एम.टी. नानासाहेब देखील गाडगे बाबांची भूमिका सुंदर लक्षात आले आहेत. मुलांना लहानपणापासून मातृभाषेत शिक्षण द्यावे की इंग्रजीत, या मुद्द्यावर माझे सरांशी मतभेद होते. मातृभाषेतील शिक्षणामुळे कोणत्याही भाषेचे व्याकरण समजणे सोपे जाते आणि विषयाचे आकलन देखील चांगले होते असे माझे मत आहे. परंतु बी.टी. सरांच्या मते इंग्रजी हीच ज्ञानभाषा असल्यामुळे त्या भाषेतून अगदी बालपणापासून शिक्षण मिळणे योग्य ठरते. वास्तविक सरांचे शालेय शिक्षण मराठीतच झाले होते. परंतु पुढे इंग्रजीवर देखील त्यांनी प्रभुत्व मिळविले. पण तरीही अस्खलित इंग्रजीत सहजपणे संभाषण करणे मराठी मध्यमवाल्यांना जड जाते, असे त्यांना वाटत असे. खरं म्हणजे मराठी भाषेवर संस्कृतचा जो पगडा आधी होता, त्यामुळे त्या भाषेतील शिक्षण हे मातृभाषेतील असल्याची भावना बहुजन व दलित समाजातील विद्यार्थ्यांमध्ये रुजणे कठीण होते. त्यामुळे देखील या दोन्ही वर्गातील पालकांची ओढ इंग्रजी माध्यमाकडे असणे स्वाभाविक वाटते. उदा. र्थ्ह्ंनहल ण्द्ा ला मराठीत पूर्वी भू राजस्व संहिता असे म्हणायचे. परंतु पुढे बहुदा बहुजन समाजातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे नामकरण बदलून जमीन महसूल अधिनियम असे सुटसुटीत नाव दिले. बहुसंख्य मुलांना समजेल अशी मराठी विकसित होणे आवश्यक वाटते.

विधान परिषदेची निवडणूक आणि सोफिया प्रकरणाचा विपरीत निकाल या घटनांनी बी.टी सरांना फारसे विचलित केले नाही. ते नुटा बुलेटीनच्या कामात पूर्वी प्रमाणेच सक्रीय राहिले. रोज पहाटे पोहणे हा छंद त्यांनी अखेरच्या दिवसापर्यंत जपला. त्यांची एक प्रदीर्घ मुलाखत घेऊन ज्दर्ङ् करावा अशी अविनाश दुधे आणि प्रदीप देशपांडे या अनुभवी पत्रकारांची खूप इच्छा होती. एकदा ते दोघे आणि मी सरांना बाहेर जेवायला घेऊन गेलो आणि जेवता जेवता हा विषय दुधेनी काढला. बी.टी. सर नाही म्हणाले नाहीत. परंतु मुलाखतीपूर्वी काही तयारी करावी, प्रश्न काढावे असे त्यांनी सुचविले. दुर्दैवाने त्यानंतर सरांची प्रकृती खालावत गेली आणि मुलाखत राहून गेली.

तरुणपणी मी ज्या युवक संघटनांमध्ये राहून काही सामाजिक काम केले, त्या संघटनांना संसदीय राजकारणाचा काहीसा तिटकाराच होता. त्यामुळे आम्ही राजकीय पुढारी, प्रशासकीय अधिकारी यांच्या पासून दूर राहत होतो. मात्र बी.टी. सरांच्या सहवासात राहून पुढे २००९ ते २०१२ या दरम्यान मला एक उत्कृष्ट संसदपटू कसा असू शकतो आणि संसदीय राजकारणातूनही किती गोष्टी साध्य करता येतात, याची उशिरा उकल झाली. तेव्हापासून मला सातत्याने असे वाटत राहिले की न्यायाधीश, शासकीय अधिकारी यांची नेमणूक झाल्यानंतर त्यांच्यासाठी काही महिने प्रशिक्षण अनिवार्य असते; तसेच अनिवार्य प्रशिक्षण लोकप्रतिनिधींचे देखील निवडणुकीनंतर व्हायला हवे आणि महाराष्ट्रात जर असे प्रशिक्षण देणारी संस्था सुरु झाली तर तिचे आजीवन संचालक पद प्रा.बी.टी. देशमुख यांनाच मिळावे. दुर्दैवाने तसे घडणे नव्हते!

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन

**अमरावती**-महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन अमरावती फॉउंडर प्रेसिडेंट डॉ रुपाली गोसावी, जनरल सेक्रेटरी डॉ आरती नल्लू , स्टेट कोर कमिटी मेंबर डॉ स्वाती पडोळे यांच्या मार्गदर्शना खाली महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन अमरावती अंतर्गत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येते १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.यावेळी डॉ प्रिया मोहोड, उपाध्यक्षा डॉ मधुरा कहाळे, सचिव डॉ स्नेहा पिंजानी, सहसचिव डॉ वैशाली टेम्भे, व डॉ शितल आचार्य, सदस्य डॉ भावना रघुवंशी , डॉ कल्पना देशमुख, डॉ प्रज्ञा घाटोळ, डॉ स्नेहल खेरडे, डॉ शीतल चौधरी, डॉ माया इंगळे, डॉ रंजना पचगाडे,डॉ प्राची कुंभालकर, डॉ प्रांजली जोशी, डॉ कृष्णा अग्रवाल, डॉ नम्रता नानवानी उपस्थित होत्या.



### कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कुऱ्हा**-स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोक नगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथे जागतिक योग दिन मुख्याध्यापिका तसेच प्राचार्य आर. जी. कुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला या जागतिक योगदिना निमित्त विद्यालयाचे शारीरिक शिक्षक व्ही. आर. इंगोले यांनी योगदिनाचे महत्व विषद केले. या नंतर एन. डी. राठोड व पी. एम. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे सर्वांगीन योगासन, सूर्यनमस्कार, प्राणायाम इत्यादी चे प्रत्यक्षिक सर्व शिक्षकांसह केले.संचालन एन. डी.राठोड आभार प्रदर्शन पी. एम. राऊत यांनी केले.कार्यक्रमाला ए.बी. चांबटकर,प्रा.एस पी. ढोले,प्रा.एम. एस. शिरभाते,एस. व्ही. चौधरी,जे.पी.निमकर,के.एन. ढगे,एस. आर. इसळ,एस. ए. पारवे,प्रा. एम. एच. वाळके,प्रा. एस. पी. रवाळे उपस्थित होते.

### विधी सेवा प्राधिकरण

**अमरावती**-जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग कार्यक्रम घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उन्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि , प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा वकील संघाने कार्यक्रमात सहभाग नोंदविला. यावेळी जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश वरीष्ठस्तर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अमरावती जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी आणि सदस्य, अपर जिल्हाधिकारी, जिल्हा शासकीय अभियोक्ता आदी उपस्थित होते.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा वकिल संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी आभार मानले.

---

### तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्या धडाकेबाज कारवाईने

# अखेर सातेगाव-चिचोली पांदण रस्ता मोकळा

## पोलीस बंदोबस्तात हटवले अतिक्रमण; शेतकऱ्यांकडून आभार

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्या तत्पर आणि धडाकेबाज कारवाईमुळे अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव-चिचोली बु. या दोन गावांना जोडणारा महत्त्वाचा पांदण रस्ता अखेर अतिक्रमणमुक्त झाला आहे. दोन वर्षांपासून रखडलेले २०० मीटरचे काम आता पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. पेरणीपूर्वीच रस्ता मोकळा झाल्याने शेतकऱ्यांनी तहसीलदार सोळंके यांचे आभार मानले आहेत.

सातेगाव-चिचोली हा पांदण रस्ता शेकडो शेतकऱ्यांसाठी दळणवळणाचा मुख्य मार्ग आहे. दोन वर्षांपूर्वी या रस्त्याचे काम सुरू झाले होते. मात्र अंतिम टप्प्यातील २०० मीटरचे काम एका शेतकऱ्याने शेतीभोवती तारेचे कुंपण घातल्याने पूर्णपणे ठप्प झाले होते. पावसाळा



तोंडावर आल्याने पेरणीची कामे खोळंबण्याची भीती निर्माण झाली होती.मनोज ओळंबे, संजय बाबनेकर, राहुल ठाकरे, रघुनाथ वानखडे, सुभाष मेहरे, राजु देशमुख, ढिवर महाजन, नारायण सावरकर, अशोक मानकर यांसह परिसरातील शेतकऱ्यांनी तहसीलदार पुष्पा सोळंके यांची भेट घेऊन रस्ता मोकळा करून देण्याची विनंती केली होती. शासकीय कामाचा ताण असतानाही तहसीलदार सोळंके यांनी 'पावसाळ्यापूर्वी रस्ता झाला नाही तर शेतकऱ्यांची पेरणी अडचणीत येईल' ही बाब गांभीर्याने घेतली.

त्यांनी तात्काळ निर्णय घेत रहिमापुर व चिंचोली पोलीसांच्या बंदोबस्तात स्वतः उपस्थित राहून पांदण रस्त्यावरील तारेचे कुंपण व इतर अतिक्रमण हटवले. या कारवाईमुळे सातेगाव-चिचोली मार्गावरील शेकडो एकर शेतीसाठी दळणवळण सुरळीत होणार असून, रखडलेले २०० मीटरचे काम आता लवकरच पूर्ण होईल.

---

### संत गुलाबराव महाराज संस्थान 'ब' दर्जा असूनही विकासापासून कोसो दूर

## महाराजांच्या नावाने विकास आराखडा मंजूर करावा

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

संत गुलाबराव महाराज यांच्या जन्मभूमी असलेल्या लोणी (टाकळी) येथील संत गुलाबराव महाराज संस्थानाला शासनाचा 'ब' दर्जा प्राप्त असूनही अपेक्षित विकास झालेला नसल्याने भाविक व ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

संत गुलाबराव महाराजांचे विचार, साहित्य आणि अध्यात्मिक कार्य आजही लाखो भाविकांना प्रेरणा देत असताना त्यांच्या जन्मभूमीवरील मंदिर परिसर मात्र मूलभूत विकास कामांपासून वंचित असल्याचे चित्र आहे. मंदिराचा जीर्णोद्धार, परिसर सुशोभीकरण, भाविकांसाठी आवश्यक सुविधा तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखडा राबविण्याची



मागणी जोर धरत आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातीलवलोणी टाकळी येथील महाराजांच्या जन्मभूमीतील त्यांच्या राहत्या घराचा जीर्णोद्धार करून इतर कामाकरिता संत गुलाबराव महाराज विकास आराखडा मंजूर करण्याची मागणी गावातील नागरिकांनी केली आहे. यासोबतच संतांच्या स्मृती जतन करण्यासाठी 'गुलाब वाटिका'( गार्डन व पर्यटन) प्रकल्प उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पुढे आला असून त्यासाठी सुमारे १० एकर जमिनीची आवश्यकता असल्याचे सांगण्यात येत आहे. या माध्यमातून संत साहित्य अभ्यास केंद्र, ध्यानधारणा केंद्र, वाचनालय, उद्यान आणि भाविकांसाठी विविध सुविधा उभारण्याचा मानस आहे. या मागण्यांसाठी विनय देशमुख (अध्यक्ष), दीपक बोबडे (उपाध्यक्ष), अशोक सवाई (सचिव) तसेच सदस्य किशोर राऊत, गोरखनाथ कडू, सचिन गायगोल, जितेंद्र शिंदे आणि प्रवीण सवाई हे सातत्याने पुढाकार घेत असून शासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत.

---

## मसानगंज व तपोवन परिसरात प्लास्टिक जप्ती आणि डस्टबिन तपासणी, १४,५०० दंड वसूल

**अमरावती/वार्ताहर**

महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले झोन क्र.१ यांच्या मार्गदर्शनाखाली मसानगंज, तपोवन परिसर आणि लगतच्या व्यापारी भागात प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण २३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान काही ठिकाणी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर तसेच डस्टबिन नियमांचे उल्लंघन आढळून आल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई



करण्यात आली.प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करताना आढळून आलेल्या संतराम साहू यांना ५,००० व राजेश पंचमलाल साहू यांना ५,००० असा दंड आकारण्यात आला. तसेच डस्टबिन नसल्याबाबत अंजली किराणा यांना १,०००, जय गजानन धान्य भंडार यांना १,०००, सारिका उज्जैनकर यांना ५००, गणराज पान सेंटर यांना ५००, संजीवनी गावंडे यांना ५०० आणि जितेंद्र पाटील यांना १,००० दंड आकारण्यात आला.सदर मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजू डीक्याव, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, निखिल खंगाळे, मेघराज ढेनवाल, इमरान खान, रोहित हडाले, परिक्षीत गोरले, आशिष सहारे आणि एम. सैय्यद यांनी सहभाग घेतला.

---

### कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करा व पीक विमा योजनेत तालुक्याचा समावेश करण्याकरीता

# शिवसेनेच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांची तहसील व कृषी कार्यालयात धडक

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करा व पिक विमा योजनेतून वगळण्यात आलेल्या नांदगाव तालुक्याचा समावेश पिक विमा योजनेत करा या मागणीसाठी शिवसेना उबाठा गटाचे प्रकाश मारोटकर व बाळासाहेब राणे यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी तहसील व कृषी कार्यालयात धडक देऊन तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांना एक तास घेराव घातला.

वगळण्यात आलेल्या पिक विमा योजनेत नांदगाव तालुक्याचा समावेश करून सरसकट पिक विमा मंजूर करावा व कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी करण्यात यावी अशी मागणी करीत राज्य सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांनी प्रचंड रोष व्यक्त करून नारेबाजी केली.सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर कर्जमाफी योजनेत जाचक अटी लादल्याने पात्र असताना सुद्धा शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहे.

सन २०१४ ते २०२६ या कालावधीतील थकीत ४ लाख



### कृषी अधिकाऱ्यांना घातला घेराव

रुपये पर्यंत शेतकऱ्यांचे कर्ज सरसकट माफ करण्यात यावे तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना १ लाख रुपये प्रोत्साहनपर देण्यात यावे या मागणीसाठी शिवसेनेचा मोर्चा शेकडो शेतकऱ्यांना घेऊन तहसील व कृषी कार्यालयावर धडकला.यावेळी न.पं. चे गटनेते प्रकाश मारोटकर बाळासाहेब राणे, विष्णू तिरमारे,कृ.उ.बा.स. उपसभापती विलास पाटील सावदे, संचालक प्रमोद ठाकरे, डॉ. अरुण बेलसरे,मधुकर कोठाडे, दिलीप देवतळे, निलेश इखार, रवी ठाकूर, गोपाल बनकर, प्रकाश ब्राह्मणवाडे, नितीन दुधे,सुनील गुरमुळे, गुणवंत चांदुरकर, महिलाआघाडीच्या छाया भारती, रमाकांत मुरादे, लोकेश उडबगले, अक्षय राणे, अक्षय काकडे, लीलाधर चौधरी, भागवत लाहे, मनोज ढोके, चेतन धवणे, रवी दांडगे,दिलीप ब्राम्हणवाडे, हरिदास लिचडे, शेख महेताब, बाळा सुने, सुनिल थोरवे, सतीश मोरे, अक्षय तुपटकर, आकाश लोमटे, पंकज ठाकरे, नयन कापडे, भावेश भांबूरकर, दिनेश रघुते, विजय पेटले, सुरज सोळंके,अरुण कापडे, विजय सुने, अनिल मारोटकर, अक्षय हिवराळे,भूमेश्वर गोरे,प्रेम हिवराळे यांच्यासह अन्य शेतकरी उपस्थित होते.

सध्या राज्य सरकारचे पावसाळी अधिवेशन सुरू असून याच अधिवेशना दरम्यान कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द कराव्या व तालुका पिक विमा योजनेत समाविष्ट करावा अन्यथा ७ दिवसानंतर तहसील कार्यालयात तीव्र आंदोलन छेडू असा इशारा न.पं. गटनेते प्रकाश मारोटकर यांनी दिला.

---

# माहितीचा अधिकार कायद्यातील बदलाबाबत




१२ ऑक्टोबर, २००५ पासून माहितीचा अधिकार कायदा संपूर्ण देशामध्ये लागू झाला. जवळपास हा कायदा लागू होवून वीस वर्षे पूर्ण झालेली आहेत. या कायद्यान्वये अनेक नागरिकांना माहिती मिळाली, न्याय मिळाला तसेच प्रशासनामध्ये पारदर्शकता निर्माण झाली. प्रशासकीय कामकाज करतांना आपण करीत असलेल्या कामकाजाची माहिती जनतेला आपण देय आहोत, अशी भावना प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली. त्यामुळे प्रशासनात गतिमानता आली, गतिमानतेसोबत पारदर्शकता आली, पारदर्शकतेमुळे भ्रष्टाचाराला आळा बसला. परंतू हे जरी असले तरी माहिती अधिकार कायद्यातील काही बाबी अधिक सुस्पष्ट करण्याकरीता आणि माहिती देतांना माहिती अधिकाऱ्यांने कशाप्रकारे माहिती द्यावयाची तसेच अर्जदाराने सुद्धा अर्ज करतांना काय काळजी घ्यावी, यासोबतच फी मध्ये वाढ, आदी बाबी महाराष्ट्र शासनाने राजपत्र असाधारण भाग - चार 'अ', दिनांक १२ जून, २०२६ रोजी अधिसूचना प्रकाशित केली आहे. या राजपत्रामध्ये प्रकाशित केल्यानुसार माहिती अधिकार कायद्यामध्ये झालेले बदल सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे, याकरीता सदर लेख लिहीत आहे.

महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या अधिसूचनेमध्ये विविध व्याख्या दिल्या असून माहिती मागण्याची कार्यपद्धती यापूर्वीच्या कायद्यामध्ये कलम ६ (१) अन्वये अर्जदार साध्या कागदावर अर्ज करु शकत होता, ती कायम ठेवण्यात आली आहे. आधी त्याला १०/- रूपये फी स्वरुपात भरावे लागायचे, त्यात आता वाढ करण्यात आली असून ३०/- रूपये अर्ज शुल्क अर्जदाराला भरावे लागणार आहे. माहिती पुरविण्याच्या शुल्कामध्ये सुद्धा वाढ करण्यात आली आहे. प्रत्येक कागदावरील पृष्ठासाठी ५/- रूपये, आकारा मोठा असेल तर छायाप्रतीचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत, नमुने किंवा प्रतीकृती असतील तर त्याचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत, डिजिटल / स्कॅन प्रतीपृष्ठासाठी ५/- रूपये, प्रकाशन असेल तर निश्चित केलेली किंमत किंवा प्रत्येक पृष्ठासाठी ५/- रूपये. अभिलेखाचे निरीक्षण करावयाचे असल्यास पहिला तास विनाशुल्क आणि त्यानंतरच्या प्रत्येक तासाकरीता ५०/- रूपये शुल्क. याशिवाय टपाल आकारासाठी ५०/- किंवा जास्त माहिती असल्यास टपालाकरीता येणारा प्रत्यक्ष खर्च अर्जदाराला भरावा लागेल. हा बदल यामध्ये करण्यात आलेला आहे.

दारिद्र रेषेखालील अर्जदाराला कुठलेही शुल्क असणार नाही, परंतू त्याला अर्जासोबत शासनाने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी लागेल आणि त्याला विपुल प्रमाणात माहिती द्यावयाची झाल्यास पहिली ५० पृष्ठे विनामूल्य पुरवावी लागेल, त्यानंतरच्या प्रत्येक पृष्ठाकरीता ५/- रूपये शुल्क आकारल्या जाणार आहे. शुल्क प्रदान करण्याची पद्धत यापूर्वी ज्या पद्धतीने होती तशीच कायम ठेवली असून त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे किंवा युपीआय द्वारे आता समाविष्ट करण्यात आले आहे.

अर्जदार माहिती मागतांना एकाच अर्जामध्ये अनेक विषयांची माहिती मागतात. परंतू आता कलम ६ अन्वये माहितीसाठी लेखी स्वरुपात केलेल्या अर्जामध्ये एकाच विषयासंबंधात माहिती साधारणपणे १५० पेक्षा अधिक शब्दांची असणार नाही आणि एका पेक्षा अधिक विषयांची माहिती अर्जदाराला एका अर्जात मागता येणार नाही. अधिक विषय असल्यास प्रत्येक विषयाकरीता अर्जदाराला स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल, अशी तरतूद त्यात करण्यात आली आहे.

**नागरिकत्व सिद्ध करणाऱ्या ओळख पुराव्याची आवश्यकता**

या अधिसूचनेमध्ये बदल करण्यात आला असून यापूर्वी अर्जदार केवळ अर्ज करु शकत होता, परंतू आता अर्जदाराला अर्जासोबत छायाचित्र असलेल्या ओळख पुराव्याची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी लागणार आहे. जर अर्जदाराने अर्जासोबत ओळख पुरावा जोडला नाही, तर जनमाहिती अधिकारी तो अर्ज अर्जदाराला परत करु शकेल. हा नव्याने बदल यामध्ये करण्यात आलेला आहे.



**डॉ. विलास नांदुरकर**
(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी व नोडल अधिकारी असून माहिती अधिकार कायद्याचे तज्ज्ञ)

तसेच अर्जदार एकच माहिती वारंवार मागत असेल आणि याआधी माहिती अधिकाऱ्यांने अर्जदाराला ती माहिती दिली असेल, तर माहिती अधिकारी तो अर्ज निकालात काढू शकेल.

माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ (१) (त्र) नुसार केवळ सार्वजनिक कामकाजाशी किंवा सार्वजनिक हिताची माहिती मागू शकेल. व्यक्तीच्या खाजगी गोष्टीमध्ये विनाकारण हस्तक्षेप होईल, अशी वैयक्तिक स्वरुपाची माहिती यापूर्वी मागण्याची सुट होती. परंतू यामध्ये एक असा बदल करण्यात आला आहे की, सार्वजनिक हित आणि वैयक्तिक स्वरुपाची माहिती उघड करणे कसे समर्थनीय आहे, अशा खात्रीची लेखी स्वरुपात नोंद आणि वैयक्तिक माहिती उघड करण्यामध्ये कसे व्यापक सार्वजनिक हित आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी आता माहिती मागणाऱ्यां अर्जदारावर असणार आहे. केवळ सार्वजनिक हिताचे ठाम विधान पुरेसे असणार नाही. हा नवीन बदल माहिती अधिकारी आणि अर्जदाराने लक्षात घ्यावयाचा आहे.

**प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे करावयाचे अपील**

अर्जदाराने केलेल्या अर्जावर माहिती अधिकाऱ्यांने माहिती दिली नसेल किंवा दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान झाले नसेल, तर अर्जदार प्रथम अपील कलम १९ (१) अन्वये दाखल करु शकेल. त्याकरीता आता शुल्कामध्ये वाढ करण्यात आली आहे. आधी २०/- रूपये असलेले शुल्क आता ५०/- रूपये करण्यात आले आहे. याशिवाय प्रथम अपिलाचा अर्ज दाखल करतांना अर्जदाराने यापूर्वी माहिती अधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, त्यावर माहिती अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, अपिलामध्ये नमूद केलेल्या दस्तऐवजांची सूची व इतर बाबींचा उल्लेख त्यामध्ये केलेला आहे. याची दखल सुद्धा अपिलकत्र्याला घ्यावयाची आहे.

**राज्य माहिती आयोगाकडे अपील**

अर्जदाराने माहिती मागण्याकरीता अर्ज केला, त्यानंतर प्रथम अपील दाखल केले, यावरुनही त्याचे समाधान झाले नसेल, तर अर्जदाराला द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्याचा अधिकार कलम १९ (३) नुसार आहे. यापूर्वी असलेल्या २०/- रूपये शुल्कावरुन आता हे शुल्क १००/- रूपये करण्यात आले आहे. द्वितीय अपील दाखल करतांना अर्जदाराला स्वयंसाक्षांकित केलेले दस्तऐवज जोडावयाचे आहे. त्यामध्ये माहिती अधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत, त्यांच्याकडून मिळालेल्या उत्तराची प्रत, प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे केलेल्या अपिलाची प्रत, अपील सादर केल्याचा पुरावा, प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या आदेशाची मूळ प्रत व त्यावर विसंबून असलेल्या दस्तऐवजांची सूची आदींची माहिती तीन प्रतीमध्ये राज्य माहिती आयोगाकडे अर्जदाराला दाखल करावयाची आहे. हा बदल नव्याने करण्यात आला आहे.

राज्य माहिती आयोगाच्या अधिकाऱ्यांला जर या अपिलामध्ये त्रुटी आढळून आली, तर अपिलकत्र्यास त्रुटी दूर करण्यासाठी अपील परत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. पंधरा दिवसाच्या आत त्रुटीविरहीत अपील दाखल करण्यास मुभा दिली आहे. यात आणखी महत्वाचा बदल केला आहे, तो असा की अपिलकत्र्यास किंवा तक्रारदारास किंवा प्रतिवादीस अपिलाच्या किंवा तक्रारीच्या सुनावणीवेळी स्वत: किंवा त्याच्या यथोचित प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत आयोगाकडे उपस्थित राहण्याचा स्वेच्छाधिकार दिला आहे. याशिवाय अपिलकत्र्यास अपिलाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल आणि प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती विधी व्यवसायी असला पाहिजे, ही अट काढून टाकली आहे.

**अपील मागे घेणे किंवा रद्द करणे**

अपिलकत्र्याने आयोगास अपील मागे घेण्याबाबत लेखी विनंती केली असल्यास आयोग अपील मागे घेण्यास परवानगी देवू शकेल.परंतू आयोगाने अपिलाच्या सुनावणीची नोटीस जारी केली आणि त्यानंतर अपिलकत्र्याने अपील मागे घेण्याची लेखी विनंती केली असेल, तर आयोगाची संसाधने व खर्च वाया घालविल्याबद्दल आयोग अपिलकत्र्यावर वाजवी खर्च लादू शकेल आणि जमीन महसूलाची थकबाकी असल्यासारखी त्याची वसूली करु शकेल, ही नव्याने तरतूद अंतर्भूत केली आहे. सर्वसामान्यांना महाराष्ट्र शासनाने नव्याने केलेल्या बदलाची माहिती व्हावी, या उद्देशाने ही माहिती या लेखाद्वारे देण्याचे प्रयोजन आहे.

# वरूर येथील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण

■ प्रतिनिधी | अकोट ■

ग्रामपंचायत वरूर येथील कथित अतिक्रमण प्रकरणी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, या मागणीसाठी अनंत वसंतराव घनबहादुर यांनी पंचायत समिती कार्यालय, अकोट येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. सोमवार (दि. २२ जून) पासून सुरू झालेल्या या उपोषणामुळे परिसरात अतिक्रमणाच्या प्रश्नाला पुन्हा एकदा वाचा फुटली आहे.

ग्रामस्थांनी दि. १६ जानेवारी २०२६ रोजी अतिक्रमणाबाबत प्रशासनाकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, अद्यापही त्यावर ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमरण



उपोषणाचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. उपोषणकर्त्यांनी प्रशासनाकडे चार प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. ग्रामस्थांच्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करून अतिक्रमण हटविण्यात यावे, अतिक्रमणाची अचूक मोजणी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करून अभियंत्यामार्फत मोजणी करण्यात यावी, तसेच तक्रारदारांच्या उपस्थितीत पंचनामा तयार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, ग्रामपंचायत वरूरमार्फत अतिक्रमण धारकाच्या नावे करण्यात आलेली सरकारी जागेची नोंद रद्द करण्यात यावी व संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवून नागरिकांसाठी रस्ते मोकळे करण्यात यावेत, अशीही उपोषणकर्त्यांची भूमिका आहे. दरम्यान, या आंदोलनाकडे परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले असून प्रशासनाने प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अतिक्रमणाच्या मुद्द्यावर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# महानगरात भक्तीभावात निघाली भगवान महेश नवमीची शोभायात्रा

## भगवान महेश यांची आकर्षक ठरली पालकी



■ प्रतिनिधी | अकोला ■

सकल माहेश्वरी समाजाचे आराध्य भगवान महेश यांच्या नवमी निमित्त महानगरात माहेश्वरी समाजाच्या वतीने भगवान महेश यांची भक्तीभावात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. माहेश्वरी समाज ट्रस्टच्या वतीने मंगळवारी आयोजित ही शोभायात्रा राज राजेश्वर मंदिरापासून प्रारंभ करण्यात आली. यात भगवान महेश यांची झाकी, बालीकांची विविध रूप झाकी साकार करण्यात आली. यावेळी सामूहिक महाआरती होऊन आकर्षक सजविलेल्या भगवान महेश यांच्या पालकीला प्रमुख पाहुणे जालना येथील उद्योगपती द्वारकाप्रसाद सोनी, माहेश्वरी समाज ट्रस्ट चे माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, उत्सव प्रमुख नरेश बियाणी, प्रधानमंत्री विजयकुमार राठी आदींनी वाहुन शोभायात्रेचा प्रारंभ केला. यावेळी समाजातील महिला पुरुषांनी पारंपारिक वेषात उपस्थिती दर्शविली. ही शोभायात्रा ढोलताश्यां च्या गजरात राजेश्वर मंदिरा पासून सामूहिक महाआरती ने प्रारंभ झाली. ही शोभायात्रा जयहिंद चौक, सिटी कोतवाली, टिळक रोड, ब्रजलाल बियाणी चौक, जुने कापड बाजार, जैन मंदिर, गांधी चौक, मनपा चौक, तहसील मार्गे माहेश्वरी भवनात पोहोचून तेथे जयंती सोहळ्यात या शोभयात्रेचे रूपांतर झाले. दरम्यान या शोभायात्रेचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करून शीतपेय, मिष्टान, सरबत वितरित करण्यात आले. यात संस्कार परिवारच्या वतीने चहा वितरण, राजेश भन्साली मित्र मंडळाच्या वतीने जयहिंद चौक येथे दुधपाक वितरण करण्यात आले, रिगल टॉकीज परिसरात खा अनुप घोत्रे, माजी महापौर मदन भरगड आदींनी पालकीचे स्वागत केले. नगरसेवक सागर भारुका यांच्या वतीने शरबत, जुने कॉटन मार्केट येथे मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाने पेढे देऊन स्वागत केले. जुने कापड बाजार येथे रामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने शरबत, विजय तोष्णीवाल परिवाराच्या वतीने बदाम शेक, तहसील कार्यालय परिसरात पूनम ज्वेलर्स तर्फे मिठाई, अग्रवाल समितीच्या वतीने कुल्फी वितरण करण्यात आले. माहेश्वरी भवनात महेश नवमी समारोहात यावेळी पूजा यजमान गोपाल पनपालिया यांनी सपत्नीक पूजा करून सोहळ्यास प्रारंभ केला. यावेळी समाज ट्रस्ट चे उपाध्यक्ष शांतीलाल भाला, सहाय्यक मंत्री विनीत बियाणी, कोषाध्यक्ष देवानंद लढ्ढा, अंकेक्षक सीए मनोज चांडक, सदस्य राजेश लोहिया, प्रा डॉ महेश मुंदडा, पंकज मणियार, आर्कि पवन बंग, प्रा डॉ रमण हेडा, कुंजबिहारी चांडक, गिरीश तोष्णीवाल, राजेश भन्साली, अँड विशाल लढ्ढा, प्रदीप राठी, प्रकाश चितलांगे, दिनेश लढ्ढा समवेत माहेश्वरी समाज ट्रस्ट, महिला मंडळ, प्रगती मंडळ, नवयुवती मंडळ, वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठ, वरिष्ठ नागरिक महिला प्रकोष्ठचे सर्व पदाधिकारी व समाजाचे महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माहिती अधिकारात ग्रामसचिवाला अंतिम मुदत

## आलेगाव येथे घरकुलांची माहिती लपविल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील आलेगाव ग्रामपंचायतीचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला असून, माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागितलेल्या घरकुल योजनेच्या माहितीत टाळाटाळ केल्याप्रकरणी ग्रामसचिवाला प्रथम अपील सुनावणीत १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. आलेगाव येथील रहिवासी अब्दुल जफर अब्दुल जहीर यांनी घरकुल योजनेची सविस्तर माहिती मिळावी यासाठी माहिती अधिकाराखाली अर्ज केला होता. ग्रामपंचायतीने नियमानुसार शुल्क स्वीकारूनही अपूर्ण व तोकडी माहिती दिल्याचा आरोप करण्यात आला.




यामुळे संबंधित अर्जदाराने गटविकास अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. २३ जून रोजी झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूंची मते ऐकल्यानंतर ग्रामपंचायतीने माहिती जाणीवपूर्वक अपूर्ण दिल्याचे स्पष्ट झाले. यावर प्रथम अपील अधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित ग्रामसेवकाला कडक शब्दांत फटकारले. तसेच पुढील १५ दिवसांत संपूर्ण व अचूक माहिती तक्रारदाराला देण्याचे आदेश दिले.

# जिल्ह्यात १ २ हजार ५ ९ ६ परीक्षार्थी शिक्षक पात्रता परीक्षा देणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२६ रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी होणार असून, परीक्षेसाठी अकोला शहरात एकूण २५ परीक्षा केंद्रे निश्चित आहेत. सदर परीक्षा दोन सत्रांमध्ये घेण्यात येणार असून पेपर क्र. १ सकाळी १०.३० ते दुपारी १.०० या वेळेत, तर पेपर क्र. २ दुपारी २.३० ते सायंकाळी ५.०० या कालावधीत होणार आहे. पेपर क्र. १ साठी १९ केंद्रांवर ५ हजार ५५६ परीक्षार्थी, तर पेपर क्र. २ साठी २५ केंद्रांवर ७ हजार ४० परीक्षार्थी असे एकूण १२,५९६ परीक्षार्थी परीक्षेला बसणार आहेत. यापैकी ३१३ दिव्यांग परीक्षार्थींना नियमानुसार अनुग्रह कालावधी व लेखनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

परीक्षार्थींनी परीक्षेसाठी प्रवेशपत्रासह आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा मतदान ओळखपत्र यापैकी एक वैध फोटो ओळखपत्र सोबत बाळगणे बंधनकारक आहे.

परीक्षेच्या सुयोग्य आयोजनासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय परीक्षा आयोजन व सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प. अकोला) हे समितीचे उपाध्यक्ष असून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयात जिल्हा सनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी बि. आर. हायस्कूल, अकोला येथे जिल्हा संकलन कक्ष उभारण्यात आला असून उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची जिल्हा परिरक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय ६ झोनल अधिकारी, २५ सहायक परिरक्षक, २५ केंद्रसंचालक आणि ४९२ पर्यवेक्षक, समवेक्षक, लिपिक व सेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी बायोमेट्रिक तपासणी, फेस स्कॅनिंग व मेटल डिटेक्टरचा वापर करण्यात येणार आहे.

# कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा; शिवसेनेचा आक्रमक पवित्रा

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला-आकोट व आकोट-शेगाव या दोन्ही महामार्गांच्या निकृष्ट व रखडलेल्या कामामुळे अंदुरा नजीक रस्त्याच्या मधोमध पडलेल्या भेगेत दुचाकीचे टायर फसून बसखाली आल्याने श्रीकांत पुरुषोत्तम बायस्कर व कुणाल राजेंद्र भोरे या दोन निष्पाप युवकांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण आकोट शहरात संतापाची लाट उसळली असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची भेट घेऊन दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकर, उपजिल्हाप्रमुख दिलीप हरिश्चंद्र बोचे, जि.प. सदस्य जगन निचळ, धीरज



शिरसाट यांच्यासह मृतांचे नातेवाईक संतोष बायस्कर, सुदर्शन बायस्कर, अरुण लोणकर, दादाराव सोळुंके तसेच सोमेस इंगोले, यश चांदूरकर, कुंदन वालशिंगे, अथर्व निचळ, रोहित महल्ले, दिशांत धनद्रव्य, प्रशांत सोनटक्के, प्रशांत परनाटे, सागर हागे, विलास तवर, नितीन संगोले, प्रमोद मुरूमकर यांच्यासह शेकडो शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदन देताना संतप्त शिवसैनिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली.

उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे यांनी निवेदनात म्हटले की, दि. २१ जून २०२६ रोजी दुपारी २ च्या सुमारास अंदुरा नजीक ही हृदयद्रावक घटना घडली. अकोला-आकोट मार्गाचे विस्तारीकरणाचे काम २०१७ पासून अत्यंत मंद गतीने सुरू असून ९ वर्षे उलटूनही ते अपूर्ण आहे. करारात दुतर्फा वृक्षलागवड बंधनकारक असतानाही कंत्राटदाराने एकही झाड लावलेले नाही. खोदकामात काळी माती टाकल्याने संपूर्ण रस्त्याला मोठ्या भेगा पडल्या आहेत. आकोट-शेगाव मार्गावरून वर्षभर अनेक धार्मिक पालख्या व वारकऱ्यांचे जथे जातात, मात्र भाविकांना सावलीसाठी एकही वृक्ष उपलब्ध नाही.



## गट ग्रामपंचायात कार्यालय दिवठाणा (वाई)

**पंचायत समिती आकोट जि. अकोला**

**वाचा :** १) भारतातील मालविक्री अधिनियम १९३० कलम ६४
२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ५५

**जाहीर लिलाव सुचना**

जनतेला याद्वारे कळविण्यता येते की, गट ग्रामपंचायत कार्यालय दिवठाणा (वाई) ता. आकोट जि. अकोला यांचा मालकी हक्कातील करमणूक केंद्र साहित्याचा लिलाव दि. २५/०६/२०२६ रोजी ठिक ११ वाजता मौजे वाई येथे जूनी करमणूक केंद्राजवळ करण्यात येणार आहे.

**'जसे आहे जेथे आहे' आणि ' असे आहे तसे आहे' या तत्वानुसार करण्यात येणार आहे.**

| अ.क्र. | तपशिल | शासकीय किंमत | अनामत रक्कम | वस्तुच्या निरक्षणाचा दिनांक व वेळ | लिलाव तारिख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | करमणूक केंद्र इग्लिश, कवेलू, बतवा, विटा फरशा व इतर साहित्य | ८३४० | ५०० | २३/६/२०२६ मौजे वाई करमणूक केंद्राजवळ | दि. २५/६/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता |

**लिलावच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर लावण्यात आले आहे.**

**सरपंच**

**ग्राम पंचायत अधिकारी**
गट ग्रामपंचायत, दिवठाणा
अकोट जि. अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८८३/२०२६ प्रोसेस नं.७८३९/२०२६
चौ.ता. ३०/०७/२०२६ दिनांक : २०/०६/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती उषा अशोक टावरी रा. ४था माळा, अंजली हाइटस, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. अंशुल अशोक टावरी रा. ४था माळा, अंजली हाइटस, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. अंकिता मनमोहन दागा रा. वार्ड नं. १२, सौसर, जि. सौसर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक मोहनलाल टावरी
**पत्ता :-** रा. ४था माळा, अंजली हाइटस, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक मोहनलाल टावरी यांचे दि. २३/०४/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०६/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८९६/२०२६ प्रोसेस नं.७८२१/२०२६
चौ.ता. ३०/०७/२०२६ दिनांक : २०/०६/२०२६

**अर्जदार :** १. मदनलाल रामसिंग सिरस्वाल २. विक्की मदनलाल सिरस्वाल ३. सुरज मदनलाल सिरस्वाल सर्व रा. कैलास टेकडी, गौतम नगर, बौद्ध विहार रोड, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ८३७८०९२१२१, ९७६७५७८०९०

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सिताबाई मदनलाल सिरस्वाल
**पत्ता :-** रा. कैलास टेकडी, गौतम नगर, बौद्ध विहार रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सिताबाई मदनलाल सिरस्वाल यांचे दि. १०/११ / २०२५ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक २०/०६/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८३५/२०२६ प्रोसेस नं.७४८९/२०२६
चौ.ता. २७/०७/२०२६ दिनांक : ११/०६/२०२६

**अर्जदार :** १. अनुजा रमेश बोबडे २. सार्थक रमेश बोबडे रा. म्हातोडी, ता. जि. अकोला, मो क्र. ९३०७६२६४४९

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रमेश मुगुटराव बोबडे २. वंदना रमेश बोबडे
**पत्ता :-** रा. व्दारा अनुजा रमेश बोबडे रा. म्हातोडी, ता. जि. अकोला. मो क. ९३०७६२६४४९

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमेश मुगुटराव बोबडे यांचे दि. ०६/०८/२०२३ रोजी राहते घरी म्हातोडी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत वंदना रमेश बोबडे यांचे दि. ०७/०८/२०१५ रोजी अनकवाडी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०६/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८८०/२०२६ प्रोसेस नं.७७५३/२०२६
चौ.ता. ३१/०७/२०२६ दिनांक : १९/०६/२०२६

**अर्जदार :** १. मिरा सुभाष पालडीवाल २. शैलेश सुभाष पालडीवाल ३. राहुल सुभाष पालडीवाल सर्व रा. केडिया प्लॉट, राठी पेढेवाले च्या वर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुभाष राधाकिसन पालडीवाल
**पत्ता :-** रा. केडिया प्लॉट, राठी पेढेवाले च्या वर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुभाष राधाकिसन पालडीवाल यांचे दि. २७/०५/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ५५/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव :-** राजश्री छत्रपती शाहू महाराज स्मारक समिती खडकी बु ता.जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. माणिक गणुजी वाहुरवाघ रा.महसूल कॉलनी, खडकी, ता.जि.अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ)जंगम मिळकत (वर्णन) :- ९०९/- रुपये श्री. माणिक गणुजी वाहुरवाघ यांचे जवळ जमा. आ) स्थावर मिळकत (वर्णन) निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-२३/०६/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ६२/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव :-** श्री. कर्पूरेश्वर महादेव संस्थान ट्रस्ट शिर्ला ता. पातुर जि. अकोला

**अर्जदार : -** श्री. विनोद मारोती कढोणे रा. गुरुवार पेठ, मु.पो.ता.पातुर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ)जंगम मिळकत (वर्णन) :-५०५/- रुपये श्री. विनोद मारोती कढोणे यांचे जवळ जमा. आ) स्थावर मिळकत (वर्णन) निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-२३/०६/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ०७/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** श्री. बाळासाहेब व बालाजी संस्थान, दहीहांडा, ता. अकोट जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. निलेश नारायण संगवई रा. माणिक अपार्टमेंट, जठारपेठ, अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ)जंगम मिळकत (वर्णन) : -३००३/- रुपये श्री. निलेश नारायण संगवई यांचे जवळ जमा. (आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-२३/०६/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विदर्भाची तरुणाई ड्रग्सच्या विळख्यात; सरकार जागे होणार कधी?

**■ विधानसभेत वडेट्टीवार - राऊतांचा सत्तेला घणाघात; 'ड्रग्स माफियांविरुद्ध युद्ध छेडा'ची मागणी**

**■ मुख्यमंत्र्यांची गर्जना: 'तस्करांना सोडणार नाही; प्रत्येक पोलीस ठाण्यात उभारणार नार्कोटिक्स यंत्रणा'**

**मुंबई/ वर्धा जनमाध्यम**

महाराष्ट्रातील वाढत्या ड्रग्स संकटावर विधानसभेत मंगळवारी अभूतपूर्व खडाजंगी पाहायला मिळाली. विदर्भातील तरुणाई अमली पदार्थांच्या विळख्यात अडकत असताना सरकार केवळ मुंबईपुरतीच मोहीम राबवत असल्याचा आरोप करत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार विजय वडेट्टीवार आणि आमदार नितीन राऊत यांनी सरकारला अक्षरशः धारेवर धरले. 'ड्रग्स माफिया' महाराष्ट्राच्या भविष्यावर हल्ला करत आहेत. आता त्यांच्याविरुद्ध युद्धच छेडले पाहिजे, अशी आक्रमक भूमिका दोन्ही नेत्यांनी सभागृहात मांडली.

वडेट्टीवार यांनी ऑनलाइन माध्यमातून सुरू असलेल्या ड्रग्सच्या अवैध व्यापाराचा मुद्दा उपस्थित करत धक्कादायक वास्तव मांडले. विशिष्ट नेटवर्क आणि गुप्त साखळ्यांमार्फत तरुणांपर्यंत अमली पदार्थ सहज पोहोचत असल्याचा आरोप त्यांनी केला. अनेक ठिकाणी इंजेक्शनद्वारे नशेचे व्यसन लावले जात असून शाळा, महाविद्यालये आणि शहरांतील युवक या दलदलीत ओढले जात असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील विविध बंदरे आणि इतर राज्यांमधून महाराष्ट्रात ड्रग्सचा पूर येत आहे. ज्या बंदरांवर वारंवार अमली पदार्थ पकडले जातात, तिथे महाराष्ट्र पोलिसांची विशेष पथके तैनात करा. मुळावर घाव घातल्याशिवाय ही साखळी तुटणार नाही, असा इशाराही वडेट्टीवार यांनी दिला.



दरम्यान, आमदार नितीन राऊत यांनी सरकारच्या उत्तरावर तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री स्वतः विदर्भाचे आहेत. प्रश्न नागपूर, वर्धा, यवतमाळ आणि गडचिरोलीचा होता; पण उत्तरात फक्त मुंबईचा उल्लेख करण्यात आला. विदर्भातील वाढत्या ड्रग्स संकटाकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे का असा प्रश्न त्यांनी केला.

राऊत यांनी सभागृहात आणखी गंभीर मुद्दे उपस्थित करत सांगितले की, विदर्भात एमडीसारख्या घातक अमली पदार्थांची मागणी कोट्यवधी रुपयांच्या घरात पोहोचली आहे. ड्रग्स माफिया प्रथम तरुणांना व्यसनाधीन करतात आणि नंतर त्यांच्याच हातून ड्रग्स विक्रीचे जाळे उभे करतात. शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात हे रॅकेट झपाट्याने वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सन २०२५ मध्ये राज्यात तब्बल ५२३.१७ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. मात्र यातील नागपूर आणि विदर्भाचा हिस्सा किती विदर्भात स्वतंत्र नार्कोटिक्स युनिट किती आहेत, त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ आहे का? याची स्पष्ट माहिती सरकारने द्यावी, अशी मागणी राऊत यांनी केली. रस्त्यावरील किरकोळ विक्रेत्यांना पकडून ऑपरेशन यशस्वी झाल्याचा गवगवा करण्यात अर्थ नाही. ड्रग्सच्या मूळ साखळीवर घाव घालणे गरजेचे आहे. आधुनिक अमली पदार्थ ओळखण्यासाठी पोलिसांना तांत्रिक प्रशिक्षण दिले जाते का असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

विदर्भात प्राण्यांना शांत करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही औषधांचा 'झोंबी ड्रग्स' म्हणून गैरवापर होत असल्याचे सांगत, ही घातक औषधे मेडिकल स्टोअर्समधून तरुणांपर्यंत सहज कशी पोहोचतात, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. या सर्व आरोपांना उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकार ड्रग्सविरोधी लढाई अत्यंत गांभीर्याने लढत असल्याचे स्पष्ट केले. ड्रग्सच्या गुन्ह्यांमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळलेल्या पोलिसांना केवळ निलंबित नाही तर थेट बडतर्फ करण्यात आले आहे. या माफियांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. राज्यातील नार्कोटिक्स विरोधी यंत्रणा मोठ्या प्रमाणात विस्तारण्यात येणार असून प्रत्येक पोलिस ठाण्यापर्यंत विशेष युनिट उभारण्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. नक्षलवादविरोधी मोहिमेप्रमाणेच या विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना विशेष प्रोत्साहन देण्याचाही निर्णय घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ड्रग्सबाबत माहिती देणाऱ्या नागरिकांना बक्षीस देण्याची आणि त्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्याची यंत्रणा उभारली जाणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.

विधानसभेतील या वादळी चर्चेमुळे एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली आहे. ड्रग्सचा विळखा आता केवळ मुंबईपुरता मर्यादित राहिलेला नाही.

विदर्भातील शहरांपर्यंत त्याची मुळे खोलवर रुजली आहेत. त्यामुळे सरकारच्या घोषणा प्रत्यक्ष कृतीत किती उतरतात आणि विदर्भातील तरुणाईला या नशेच्या दलदलीतून बाहेर काढण्यासाठी किती प्रभावी पावले उचलली जातात, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# गुन्हेगारी वार्ता

## संशयित तरुण पोलिसांच्या ताब्यात

**वर्धा :** शहरातील आर्वी नाका परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका तरुणाला रामनगर पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली. परिसरात चोरी करण्याच्या उद्देशाने तो फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत संशयिताची चौकशी केली असता त्याच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. यानंतर त्याला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू करण्यात आला. अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव जयेश सुधाकर ठाकरे (२५, रा. आदिवासी कॉलनी) असे आहे. शहरात वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. नागरिकांनीही परिसरात संशयित व्यक्ती दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या प्रकरणी रामनगर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## दहशत करणारा तरुण गजाआड

**हिंगणघाट :** शास्त्री वॉर्ड परिसरात हातात गुप्ती घेऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या एका तरुणाला स्थानिक पोलिसांनी अटक केली. परिसरातील नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याच्याकडून धारदार गुप्ती जप्त करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव जगदीश अजाब तेलतुमडे (२९, रा. संत चोखोबा वॉर्ड, हिंगणघाट) असे आहे. आरोपीच्या वर्तनामुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील चौकशी सुरू केली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या कारवायांना पुढेही गती देण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा :** पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सालफळ गावात एका महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मृत महिलेचे नाव संगीता सुनील मेश्राम (४८) असे आहे. कुटुंबीयांच्या निदर्शनास ही घटना आल्यानंतर त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्याबाबत तपास सुरू आहे. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. पोलिसांकडून कुटुंबीयांची चौकशी सुरू असून सर्व बाबींचा तपास केला जात आहे.

## शेतातील विहिरीत व्यक्तीचा मृतदेह आढळला

**हिंगणघाट :** तालुक्यातील काजळसरा शिवारातील एका शेतातील विहिरीत ४० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. सकाळच्या सुमारास शेतमालक प्रकाश कांबळे यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे तसेच मृत्यूमागील कारण शोधण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. प्राथमिक तपासात कोणताही संशयास्पद प्रकार आढळून आला नसला तरी सर्व शक्यता गृहीत धरून चौकशी केली जात आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. मृतदेह आढळल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# कृषी केंद्रांनी मार्गदर्शक सूचनांनुसार निविष्ठांची विक्री करावी

**वर्धा / जनमाध्यम**

जिल्ह्यात निकृष्ठ दर्जाच्या कृषी निविष्ठांची विक्री किंवा जादा दराने विक्री करून नियमभंग करणाऱ्या कृषि केंद्रावर कडक कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे कृषि केंद्र संचालकांनी कृषि विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी, बियाणे विक्री व अनियमित्ता आढळल्यास कडक कारवाई करण्यात येणार आहे.

कृषी केंद्रात विक्री होत असलेले बियाणे, किटकनाशकांचे प्रिंसीपल सर्टीफीकेट (उगम प्रमाणपत्र) तसेच रासायनिक खताचे ओ-फॉर्म आपल्या परवान्यात समाविष्ट करुनच दुकानात विक्रीसाठी उपलब्ध ठेवावे. त्याशिवाय कृषि निविष्ठा उपलब्ध असल्याचे आढळून आल्यास संबंधित कृषि केंद्र चालकाचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. कृषि केंद्र चालकांनी आपले परवाने अमेंडमेंट करुन घ्यावे. तसेच परवाने वेळीच नुतणीकरण करुन घेणे आवश्यक आहे.

खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व किटकनाशकांचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली धडक तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. अनधिकृत बियाणेसाठा करुन विक्री करणे, बोगस खते व किटकनाशकांची विक्री, लिकींगबाबत भरारी पथकाकडून तसेच संबंधित तालुक्यातील गुण नियंत्रण निरीक्षकांकडून व कृषि अधिकारी यांच्याकडून तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. गुण नियंत्रण निरीक्षकांच्या कृषि सेवा केंद्राच्या तपासणीत ई-पॉस प्रणालीतील अनियमीतता, कंपनीकडून मिळालेल्या ॲकनॉलेजमेंटची वेळेत नोंद न करणे तसेच ई-पॉस साठ्यात तफावत आढळणे, याशिवाय दुकानामध्ये भावफलक व साठाफलक अद्यावत नसणे, दैनंदिन अभिलेख न ठेवणे, नोंदवही व बिलांमधील त्रुटी, एन फॉर्मनुसार साठा रजिस्टर न ठेवणे, एम फार्मनुसार पावत्या न देणे आणि खरेदी बिलावर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नसणे तसेच कृषि निविष्ठा विक्री परवान्यात प्रिंसीपल सर्टीफीकेट तसेच खताचे ओ-फॉर्म समाविष्ट न करता विक्री करीत असणे इत्यादी बाबी निदर्शनास येत असल्याने अशा त्रुटीप्रकरणी संबंधित कृषि केंद्र चालकांना नोटीस बजावून प्रत्यक्ष सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणी वेळेस खुलासे असमाधानकारक आढळ ल्यास व नियमाचे उल्लंघन सिध्द झाल्याने अशा कृषि सेवा केंद्र चालकांचे परवाने निलंबीत, रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश

**वर्धा/ जनमाध्यम**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्धा प्रकल्पांतर्गत ७ मुलांचे व ५ मुलींचे असे एकुण १२ वसतीगृहे कार्यरत आहे. यात जिल्हास्तरावरील ४ तर तालुकास्तरावरील ८ वसतीगृहांचा समावेश आहे. या वसतीगृहामध्ये रिक्त असलेल्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेशाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येईल. वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी प्री-मॅट्रीक, कनिष्ठ महाविद्यालय ते पदवी, पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता http://swayam.maha online .gov.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. अर्ज प्रवेशाबाबतची सुचना संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येते. प्रवेश प्रक्रिया गुणवत्ता तथा नियमानुसार करण्यात येईल. वसतीगृहात रिक्त जागेच्या अधिन राहुन प्रवेश देण्यात येणार आहे. १२ वी नंतर जिल्हास्तरावरील वसतीगृहाकरीता ऑनलाईन अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश न मिळाल्यास पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ दिला जाईल.

# स्मार्ट मीटरची कमाल

## नागपूर - वर्ध्यातील ग्राहकांना ५.७० कोटींचा आर्थिक लाभ

**वर्धा/ नागपूर जनमाध्यम**

स्मार्ट मीटर म्हणजे लूट, बिलवाढ आणि ग्राहकांची फसवणूक अशा आरोळ्या ठोकणाऱ्यांच्या दाव्यांना आता आकडेवारीनेच उत्तर मिळू लागले आहे. वाढत्या महागाईच्या काळात सामान्य माणसाच्या खिशावरचा भार कमी करण्यासाठी महावितरणने राबविलेली 'स्मार्ट टीओडी' (टाईम ऑफ डे) योजना नागपूर परिमंडलातील लाखो ग्राहकांसाठी आर्थिक दिलासा ठरत असल्याचा दावा महावितरणने केला आहे. या योजनेमुळे अवघ्या दहा महिन्यांत नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील ग्राहकांच्या खिशात तब्बल ५ कोटी ७० लाख रुपयांची बचत जमा झाली आहे.

सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर वाढविणे आणि स्वस्त वीज थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रति युनिट ८५ पैशांची थेट सवलत दिली जात आहे. विशेष म्हणजे ही सवलत भविष्यात १ रुपयापर्यंत वाढविण्याचाही विचार सुरू असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. महावितरणच्या आकडेवारीनुसार जुलै २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील ग्राहकांनी तब्बल ५ कोटी ५ लाख ५३ हजार रुपयांची बचत केली, तर वर्धा जिल्ह्यातील ग्राहकांच्या खात्यात ६५ लाख १९ हजार रुपयांची बचत जमा झाली. ही रक्कम केवळ कागदोपत्री नसून ग्राहकांच्या बिलांमध्ये थेट दिसून येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. नागपूर परिमंडलातील घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक अशा विविध प्रवर्गातील सुमारे ७.३१ लाख ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. उर्वरित ग्राहकांनाही लवकरच या डिजिटल व्यवस्थेत सामावून घेतले जाणार आहे.

स्मार्ट मीटरचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्राहकांना मिळालेले 'डिजिटल सक्षमीकरण'. 'एमसीएल महा ऊर्जा' ?पच्या माध्यमातून ग्राहकांना आता वीज वापराचा रिअल-टाईम डेटा उपलब्ध होत आहे. घरात कोणत्या वेळी किती वीज वापरली, किती युनिट खर्च झाले आणि बिल किती होणार याची माहिती मोबाईलवरच मिळत असल्याने वीज वापराचे नियोजन करणे सोपे झाले आहे. मीटर रीडिंगची प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित झाल्याने मानवी चुका आणि अंदाजे बिलिंगलाही आळा बसल्याचा दावा करण्यात आला आहे.

# बहार नेचर फाउंडेशनची नवीन कार्यकारिणी कार्यान्वित

## अध्यक्षपदी संजय इंगळे तिगावकर, उपाध्यक्ष दीपक गुढेकर, भारती गोमासे

**वर्धा/ जनमाध्यम**

निसर्ग संरक्षण, संवर्धन आणि जैवविविधता क्षेत्रांत कार्यरत बहार नेचर फाउंडेशन या संस्थेच्या नव्या कार्यकारिणीची निवड वार्षिक आमसभेत करण्यात आली. सभेत बहारच्या अध्यक्षपदी वन्यजीव अभ्यासक व साहित्यिक संजय इंगळे तिगावकर तर उपाध्यक्षपदी पक्षीमित्र दीपक गुढेकर व भारती गोमासे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



बहारचे पूर्वाध्यक्ष डॉ. बाबाजी घेवडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या वार्षिक आमसभेत आगामी पाच वर्षांकरिता नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. नवनियुक्त कार्यकारिणीत सचिवपदी युवा वैज्ञानिक दर्शन दुधाने, सहसचिव देवर्षी बोबडे, कोषाध्यक्ष आकाश जयस्वाल तसेच कार्यकारी सदस्य म्हणून माजी अध्यक्ष प्रा. किशोर वानखडे व डॉ. बाबाजी घेष्ठघेवडे यांच्यासह कीटकशास्त्रज्ञ अतुल शर्मा, जीवशास्त्रज्ञ पल्लवी बोदिले, निवास उरकुडे, याकुब शेख व शंतनू बोरवार यांचा समावेश आहे.

या वार्षिक आमसभेला जयंत सबाने, राजदीप राठौर, डॉ. आरती प्रांजळे घुसे, घनश्याम माहुरे, ॲड. पवन दरणे, आशा घेवडे, संगीता इंगळे, चित्रा इंगोले, सारिका डेहनकर, अमोल मुनेश्वर, मोनिका जयस्वाल, मनेशकुमार सज्जन, लोहित हजारे, मोहन हांडे, अमेय ठाकरे, प्रमोद इंगोले यांच्यासह बहारचे सदस्य उपस्थित होते.

**बहारची बहारदार वाटचाल**

गत अकरा वर्षात बहार नेचर फाउंडेशनने विविध महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले असून पवनार येथे यवतमाळ नागपूर मार्गावर लावण्यात आलेली नीलपंख या शहरपक्ष्याची भव्य प्रतिकृती ही बहारचीच देण होय. बहार व नगर परिषद आयोजित या आगळ्यावेगळ्या वर्धा शहरपक्षी निवडणुकीची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे. सेवाग्राम येथे विदर्भ पक्षीमित्र संमेलनाच्या आयोजनासह शेतकरी पक्षीमित्र संमेलन, विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन, जिल्हा पक्षी सूची प्रकाशन, जलसाठ्यांची स्वच्छता व प्लास्टिक निर्मूलन, लांब पल्ल्याच्या सायकल परिक्रमा, अभ्यास सहल, जंगल वाचन, प्राचीन वास्तू व वारसा स्थळांबाबत जनजागृती, जैवविविधता नोंदी, जीवाश्म, वृक्ष, पक्षी, फुलपाखरे, साप आणि विविध प्रकारच्या वन्यजीवांबाबत संरक्षण, संवर्धन व संशोधन कार्य, सातत्यपूर्वक पक्षीनिरीक्षण, आकाश निरीक्षण, खगोलीय घटनांबाबत मांडणी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निसर्ग जागर, विज्ञान व्याख्यानमाला, कार्यशाळा, पर्यावरणीय घटकांची ओळख करून देणारे ऑनलाईन परिसंवाद, अशा वैविध्यपूर्ण कार्यामुळे बहारने अल्पावधीतच नावलौकिक प्राप्त केला आहे. राज्य सरकारने शासकीय स्तरावर महाराष्ट्रात सुरू केलेल्या पक्षीसप्ताहाचे श्रेयही बहार नेचर फाउंडेशनला प्राप्त होते. बहारच्या अभिनव उपक्रमांची दखल संपूर्ण महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रा बाहेरही घेण्यात आली आहे. हीच परंपरा आगामी काळातही जोपासली जाणार असल्याचा विश्वास यावेळी नवनियुक्त कार्यकारिणीद्वारे व्यक्त करण्यात आला.

# फुकटची बस आहे, कशाला फिरता?

## एसटी वाहकाची ज्येष्ठ नागरिकाशी मुजोरी

**सेलू / जनमाध्यम**

राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून सर्वसामान्य प्रवाशांना सन्मानाची वागणूक मिळणे अपेक्षित असताना, सेलु बसस्थानकावर एका ज्येष्ठ नागरिकाशी झालेल्या गैरवर्तनाने एसटी प्रशासनाच्या संवेदनशीलतेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. नागपूर-वर्धा मार्गावरील ई-बसच्या वाहकाने एका वृद्ध प्रवाशाला अपमानास्पद शब्दांत सुनावत बसमध्ये चढण्यापासून रोखल्याची धक्कादायक घटना सोमवारी (२२ जून) घडली.

नागपूरहून वर्ध्याकडे जाणारी ई-बस (क्रमांक MH 49 BZ 4045) सकाळी १० वाजताच्या सुमारास सेलु बसस्थानकावर आली. वर्धा येथे डोळ्याच्या उपचारासाठी जाणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाने बसमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला असता, वाहकाने त्यांना अडवले. फुकटची बस आहे, कशाला फिरता अशा अपमानास्पद भाषेत बोलत त्यांचा अवमान केल्याचा आरोप आहे.

संबंधित वृद्धाने आपली वैद्यकीय अडचण सांगूनही वाहकाचा पारा उतरला नाही. जागा नाही, पुढच्या गाडीने या किंवा घरी जा, असे उद्धट उत्तर देत त्याने त्यांना बसमध्ये घेण्यास नकार दिला. अखेर एका सुशिक्षित तरुणाने मध्यस्थी केल्यानंतर त्या ज्येष्ठ नागरिकाला बसमध्ये प्रवेश मिळाला. मात्र त्यानंतरही त्यांना बसण्याची जागा न देता वाहकाने अरेरावीची भूमिका कायम ठेवली.

या प्रकाराचा जाब विचारणाऱ्या इतर प्रवाशांनाही वाहकाने अर्वाच्च भाषेत उत्तर दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यामुळे बसमधील वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले. संतप्त प्रवाशांनी तक्रार करण्यासाठी वाहतूक नियंत्रण कक्ष गाठला, मात्र तेथे संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्या संतापात अधिक भर पडली. उपस्थित कर्मचाऱ्यांनीही तक्रारीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याचा आरोप आहे.

स्थानिक विद्यार्थी आणि नियमित प्रवाशांच्या मते, संबंधित वाहकाची अशा प्रकारची मुजोरी ही नवी बाब नसून अनेकदा प्रवाशांना अशाच अनुभवांना सामोरे जावे लागते. त्यामुळे एसटी महामंडळाच्या प्रतिमेला धक्का बसत असून, दोषी वाहकावर तातडीने शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य प्रवाशांशी सौजन्याने वागण्याचे कठोर निर्देश द्यावेत, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २०७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# चांदुर रेल्वेत स्वच्छतेसाठी पाणीपुरवठा बंद

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधी:-** स्थानिक नगर परिषद तर्फे होणारा पाणीपुरवठा अत्यंत गढूळ होत असल्यामुळे नगरसेवकांतर्फे देण्यात आलेल्या सूचनेचे पालन करीत मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांनी आदेश देऊन साफसफाई स्वच्छतेचे काम सुरु केले. गेल्या तीन दिवसापासून पाणीसाठा जमा होत असलेल्या टाक्या साफसफाई चे काम चालू असताना शहराचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला होता. त्याची पाहणी करण्याकरिता चांदुर रेल्वे येथील नगरसेवक हर्षल वाघ, सुमेद सरदार, गटनेता हाजी अनिस सौदागर नगरपरिषद मधील कर्मचारी सह कॉन्ट्रॅक्टर यांनी पाहणी केली. चांदुर रेल्वे शहराला मालखेड तलावाजवळ सावंगा विठोबा या तलावातून पाणीपुरवठा होत आहे. गेल्या कितीतरी वर्षापासून गाळ त्या साठवलेल्या पाण्याच्या टाक्यांमध्ये जमा होतात. पाणी फिल्टर मध्ये गाळाचे प्रमाण हे



जास्त झाले होते. त्यामुळे पूर्ण शहरात स्वच्छ पाणी मिळत नव्हतं अनेक नागरिकांच्या तक्रारी पाण्याच्या संदर्भात होत्या. कितीतरी वर्षापासून रेती बदलवली नव्हती. पाण्याच्या टाक्या स्वच्छ केल्या नव्हत्या आणि गाळ हा भरपूर प्रमाणात होता. हे नगरसेवक यांच्या लक्षात येतातच शहराला स्वच्छ पाणी कसे मिळेल म्हणून नगरपरिषद मध्ये मीटिंग घेऊन अध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क करून पाणीपुरवठा फिल्टर व पाणीसाठा टाक्या पूर्ण स्वच्छ करण्याचे काम हाती घेण्यात आले व शहरात २२ तारखेपासून ते २५ जूनपर्यंत पाणीपुरवठा बंद करण्यात आला. याची माहिती सर्व गावकरी मंडळींना मुनादी द्वारे देण्यात आली होती व पाणीपुरवठा भरपूर प्रमाणात करण्यात आला होता .जनतेला पाणी साठा भरपूर प्रमाणात साठण्याचे आवाहन नगरपरिषद द्वारे करण्यात आले होते.

## जाहीर सूचना

सर्वत्र लोकांना या जाहीर सुचने व्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **सुनिल भाऊराव पुंड, रा.राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती** यांचे मालकीची व ताब्यातील खालील वर्णन केलेली मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला असून लवकरच खरेदीखत करुन घेणार आहे, त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीचे हददीतील **मौजे- पेठ अमरावती,** प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील नझुल शिट नं.५४-बी, नगर भूमापन क्रमांक ९९, सत्ताप्रकार -ब, एकूण क्षेत्रफळ ६८.८० चौ.मी. (७४०.५६ चौ.फुट ) यावर अंदाजे १४ वर्षे जुने बांधलेले घर याचे बांधकामाचे क्षेत्रफळ ६५.१४ चौ.मी. आहे. असे घर जमिनी पासून आकाशापर्यत आज आहे त्या स्थितीत. यामध्ये बोअर केले असून नळ कनेक्शन, इलेक्ट्रीक फिटीगसह व इले.मीटरसह, याचा मनपा मालमत्ता क्रमांक सी ६-४१४, जुना मालमत्ता क्रमांक ६२-६२-१०,झोन क्रमांक २ आहे. याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे :-

**पुर्वेस :** प्लॉट नं. १००/१ पीडीयार यांचे घर **पश्चिमेस-** प्लॉट नं. ९६ श्री देशमुख यांचे घर
**उत्तरेस**-सरकारी रस्ता , **दक्षिणेस -** प्लॉट नं. १०१ श्री पिसोळे यांचे घर

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचेही कोणतेही हितसबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण, बोझा, वारस हक्क, ताबा, कर्ज, इजमेटरी हक्क, दान, खरेदी, लिज, ॲटचमेट, रिझर्वेशन, एक्वीझीशन, कुळ वहीवाट, चोळी-बांगडी वगैरे कोणत्याही प्रकारचा बोझा, अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बॅक, सहकारी संस्था, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सूचना प्रेषित झाल्यापासून ५ दिवसाचे आत खालील पत्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही, कसलीही हरकत तक्रार,वाद ऐकला जाणार नाही, त्याचप्रमाणे नंतर कोणाचाही उजर चालणार नाही.

**अमरावती**
**दिनांक २३/०६/२०२६**

**ॲड.आशिष कृ.लांडे**
**नोटरी भारत सरकार**
२४,प्रमोद कॉलनी, राजापेठ, अमरावती
मो.नं.- ९४२१७४०२३०

## पाहिजेत

दि पूर्णा एज्युकेशन सोसायटी, पिंपरी पुर्णा द्वारा संचालित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये (कला शाखा) सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्राकरीता खालीलप्रमाणे घड्याळी तासाप्रमाणे शिक्षकांची पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पद | विषय | शैक्षणिक पात्रता | व्यावसायिक पात्रता | माध्यम |
|---|---|---|---|---|---|
| १. | तासिका तत्वावरील शिक्षक | राज्यशास्त्र | एम.ए.(राज्य.) | बी.एड. | मराठी |
| २. | तासिका तत्वावरील शिक्षक | समाजशास्त्र | एम.ए.(समाज.) | बी.एड. | मराठी |
| ३. | तासिका तत्वावरील शिक्षक | इंग्रजी | एम.ए.(इंग्रजी) | बी.एड. | मराठी |
| ४. | तासिका तत्वावरील शिक्षक | इतिहास | एम.ए.(इतिहास) | बी.एड. | मराठी |

तरी वरीलप्रमाणे पात्रताधारक ईच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने आवश्यक मूळ शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक १ जुलै २०२६ रोज बुधवारला सकाळी ११.०० ते २.०० या वेळेमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, पिंपरी थुगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती या ठिकाणी मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. तासिका तत्त्वावर मिळणारे वेतन शासन निर्णयानुसार देय राहील.

**मुख्याध्यापक / सचिव**
**शाळा समिती**
**रा.तु.म.माध्य.व उच्च माध्य.विद्यालय,**
**पिंपरी पुर्णा, ता.चांदूर बाजार**
**जि.अमरावती**

**अध्यक्ष,**
**दि पूर्णा एज्युकेशन सोसायटी,**
**पिंपरी पुर्णा, ता.चांदूर बाजार**
**जि.अमरावती**

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.२९१/२०२६ ने.ता.२१.०७.२०२६

**अर्जदार :**
१. **श्रीमती चित्रा अनिल अजमिरे,** वय ५० वर्षे, व्यवसाय- घरकाम
२. **सौ.तेजस्वीनी उमेश अजमिरे,** वय २७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. **सौ.गायत्री धनश्याम जावरे,** वय २१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४. **कु.नंदणी अनिल अजमीरे,** वय १३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
अर्जदार क्र.४ अज्ञान, अज्ञान पालनकर्ता आई अर्जदार क्र.१
अर्जदार क्र.१ व ४ रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.२ रा.चानी कामठवाडा, ता.दारव्हा, जि.यवतमाळ
अर्जदार क्र.३ रा.खोलापुरी गेट, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक अनिल शंकरसा अजमीरे** यांचा मृत्यू दिनांक २६/०१/२०२२ रोजी रा.शिरजगाव कसबा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२९१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१८.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय,**
**चांदूर बाजार**

MAHAVITARAN

## Quotation/Enquiry Notice

Separate sealed quotation in prescribe forms are invited for execution of enquiry for

1) Work contract for hiring of vehicle (Tata Sumo/Mahendra Bolero or similar) for O&M Urban Sub-Division No. I under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/1947 Dt. 19.06.2026).

2) Work contract for electricals fitting at newly established O&M Urban Sub Division No. II Amravati at Old MIDC section office under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/1948 Dt. 19.06.2026).

3) work contract for hiring of vehicle (Tata Indica (Diesel)/Tata Indigo or similar) for the Executive Engineer of Amravati Urban Division. (EE/U/Amt/T/1949 Dt. 19.06.2026).

4) Work contract for providing and fixing and repairing & maintenance of existing damaged/ nonworking LED yard lighting at various S/Stns under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/1950 Dt. 19.06.2026).

5) work contract for annual maintenance of Electrical Installation & Water Tabs, Water Pipes at Administrative Building of Urban Division office, rest house & offices under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/1951 Dt. 19.06.2026).

6) Labour contract for engaging an agency for typing, various letters Setting, editing & printing of documents and formats at division office for Technical, Audit & HR section work under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/1959 Dt. 19.06.2026).

7) Work contract for unloading of 10 MVA power transformer and its loosed materials at 33/11 KV Dasara Maidan S/stn under Urban Division, Amravati. (EE/U/Amt/T/1970 Dt. 19.06.2026).

**Last date for submission of quotation - 29.06.2026.**

**PRO 141/2026** **EXECUTIVE ENGINEER,**
**URBAN DIVISION, MSEDCL, AMRAVATI**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
नोंदणी क्रमांक **एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २८६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन्स क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०९६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर**

## वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा

आर.एम.जे.सी.क्र.११८/२०२६ ने.ता.२९.०६.२०२६

**अर्जदार :**
१. **श्री.संदीप दीपकराव देशमुख (मुलगा)**
वय ३९ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **सौ.स्वप्ना प्रसन्न टापरे, (मुलगी)**
वय ४१ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --
**निरंक**

ज्याअर्थी **मयत स्व.दीपकराव रघुपतराव देशमुख** हे **दि.२५/११/२०२५** रोजी पापळ येथे मरण पावलेले आहे. तसेच अर्जदार यांच्या आई श्रीमती सुषमा दीपक देशमुख या दि.२६/०३/२०२५ रोजी पापळ येथे मरण पावल्या. स्व.दीपकराव रघुपतराव देशमुख यांच्या आई पुष्पा रघुपतराव देशमुख बरेच वर्षी आधी मरण पावल्या आहेत. त्यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही. अर्जदार हे उपरोक्त त्यांचे मयत आई व वडिल यांचे कायदेशीर वारस आहेत. उपरोक्त मयतांचे कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.अंतर्गत दिनांक ०४.०४.२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक २९/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २२/०६/२०२६रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक, दिवाणी न्यायालय**
**नांदगाव खंडेश्वर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कटटे,३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.११६६/२०२६**
**संध्या व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.०३.०८.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sandhya Chandramani Ganvir
Aged about 57 Yrs. Occu.: Household
2. Anup Chandramani Ganvir
Aged about 34 Yrs. Occu.:
3. Pranita Chandramani Ganvir
Aged about 31 Yrs. Occu.:
All R/o. Guruchaya Colony, Sai Nagar, Amravati
Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत चंद्रमणी पांडुरंग गणविर** हे दि.**२६.०२.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार **संध्या व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संध्या व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११२१/२०२६
**एकनाथराव व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.३०.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. एकनाथराव किसनराव आवारे, वय ६० वर्षे, व्यवसाय - शेती
२. भागवतराव किसनराव आवारे मयत तर्फे वारस
२अ) छबुताई भागवतराव आवारे, वय ६७ वर्षे, व्यवसाय - निरंक
२ब) मंगेश भागवतराव आवारे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - व्यापार
२क) योगेश भागवतराव आवारे मयत तर्फे वारस
२क.१) मिनाक्षी योगेश आवारे, वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२क.२) श्रवण योगेश आवारे, वय १२ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
२क.३) रुन्मय योगेश आवारे, वय ०९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
अर्जदार नं.२क.२) २क.३) तर्फे अपाक आई नामे मिनाक्षी योगेश आवारे
सर्व रा.राजपुतपुरा, नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **किसनराव नागोजी आवारे** हे दिनांक 19.01.2007 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **एकनाथराव व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **एकनाथराव व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०१०/२०२६
**प्राजक्ता व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Prajakta Prasad Vyalekar
Age 40 Yrs. Occu.: Household
R/o Flat No.206, Saidham Apartment, A-Wing, Sai Neritage
Sai Gajanan Colony, Sai Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दत्तात्रय त्र्यंबक कठाले आणि पुष्पा दत्तात्रय कठाले** हे अनुकमे दिनांक 01.08.2023 व 24.08.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्राजक्ता विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्राजक्ता विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१०६४/२०२६**
**नसीम बानो व चार वि. निरंक**
**पुढील ता.२४.०७.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Nasim Bano Abdul Wahid, Aged 50 Yrs. Occu.: Housewife
R/o. Aman Colony, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati
2. Father Naz Rizwan Ahmad,
Aged about 30 Yrs. Occu.: Housewife
R/o. Haidar Pura, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. Rohina Naaz Abdul Waheed, Aged 26 Yrs. Occu.: Housewife
4. Abdul Naved Abdul Waheed, Aged 24 Yrs. Occu.: Labour
5. Abdul Nawaz Abdul Waheed, Aged 27 Yrs. Occu.: Nil
Applicant No.3 to 5, R/o. Aman Colony, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati.

-- विरुध्द --

**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Abdul Waheed Abdul Rafique हे दि.**३०.१०.२०२५ रोजी बडनेरा अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार **Nasim Bano Abdul Wahid + 4** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा -**Nasim Bano Abdul Wahid + 4** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे **श्री विजय भिमराव लेवटे, रा.राठी नगर, अमरावती, अमरावती** यांनी **श्री. अशोक श्रीरामजी आखरे, रा. गोराळा, मंगरुल भिलापुर, मोर्शी, अमरावती** यांच्याशी त्यांच्या मालकीची व ताब्यातील व रेकॉर्ड ऑफ राईट मध्ये त्यांच्या नावाने नोद असलेली खालील वर्णित स्थावर मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे. स्थावर मालमत्ता (शेतजमीनीचे) वर्णन :-

नोंदणी पोट तुकडी मोर्शी विभाग कचेरीचे कक्षेतील व जि.प.अमरावती चे हददीतील ग्राम पंचायत असलेले मौजे शिराळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील भुमापन क्रमांक ७३, भो. वर्ग-१ , एकूण क्षेत्रफळ १ हे ०० आर पैकी ० हे ८१ आर चा सौदा झालेला आहे. आ.रु. ५.९५ पैसे शेतजमीन यात असलेल्या झाडाझुडुपासह, खोडबारा व इतर जमीन संलग्न तदंगभूत वस्तूसह याची चर्तुःसिमा :- **पुर्वेस :** सिमेंट रोड व गणवीर यांचे शेत, **पश्चिमेस-** विजय आखरे यांचे शेत, **उत्तरेस**-अशोक आखरे यांचे शेत, **दक्षिणेस -** गणवीर यांचे शेत

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोझा, तारण, सावकारी, व्यवहार, वारसाहक्क व इतर अधिकार जे कायदेशिररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/ तक्रार नाही असे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याच प्रकारचा कसलाही उजर/अधिकार/हक्क/ तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

करिता ही नोटीस जाहीर करत आहे.

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक २३/०६/२०२६**

**ॲडव्होकेट निलेश ज. पुंड**
**१०२ गजानन अपार्टमेट, मोहन कॉलनी**
**अर्जुन नगर, अमरावती**
**मो.नं.- ८४२१७२२१११**

## जाहीर नोटीस

**नमुना नं.१**
**अमरावती येथील मा.ह.भ.शेळके, न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय यांच्या न्यायालयातील**

**पिटीशन क.ब-४८/२०२५** **पेशी दिनांक २९ जुलै २०२६**

वादी - रोहिणी मोहम्मद सादीक

--- **विरुध्द** ---

प्रतिवादी- मोहंमद सादीक मोहंमद इसा चव्हाण
प्रति,
मोहंमद सादीक मोहंमद इसा चव्हाण,
रा.अमार मस्जीद जवळ, अलीम नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

ज्याअर्थी उपरनामित अर्जदारांनी आपल्या विरुध्द वाद पत्रात नमुद केल्याप्रमाणे दावा दाखल केला आहे.

आपणास हे समन्स बजावल्यापासून ३ आठवड्याच्या आत न्यायालयाच्या परवानगीसह व्यक्तिशः आपली उपस्थिती याद्वारे आवश्यक आहे. आणि त्याअर्थी सदरहू दावा निर्देशाकरीता दिनांक २९ जुलै २०२६ दिवशी न्यायाधीशांच्या बोर्डावर ठेवण्यात येईल.

आपणास याद्वारे फर्माविण्यात येते की, आपण वादीच्या दाव्याला उत्तर देण्याकरीता न्यायाधीशांच्या समोर दिनांक २९ जुलै २०२६ या दिवशी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे. वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित पक्षकारांचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालयाचे समुपदेयक यांचे समोर सुनावणीच्या तारखेसंबंधी आणि पिटीशन संबांतील अन्य प्रकरणाबाबत निर्देश देतील याची नोंद घ्यावी.

आपणास अधिक अशीही सुचना देण्यात येते की, आपणावर निर्देश दिल्याप्रमाणे व्यक्तिगत आपली उपस्थिती दाखल करण्याकामी कसूर केल्यास किंवा वर नमुद केलेल्या दिवशी न्यायाधीशांसमोर उपस्थित राहण्यास कसूर केल्यास पिटीशन त्याच दिवशी किंवा कोणत्याही पुढील दिवशी बचाव दिलेला नाही या मथळ्याखाली बोर्डावर ठेवण्यात येईल आणि आपणा विरुध्द हुकूमनामा किंवा आदेश संमतपात्र राहाल.

मुख्य न्यायाधीश कौटुंबिक न्यायालय
अमरावती यांचे साक्षेने आज दिनांक
२२ जून २०२६ रोजी दिले.

आदेशानुसार
प्र.प्रबंधक,
कौटुंबिक न्यायालय, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०७९/२०२६
**दिवाकर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Divekar Shamrao Alias Hiraman Chandekar,
Age 70 Yrs. Occu.:Nil
2. Prabhakar Shamrao Alias Hiraman Chandekar
Age 60 Yrs. Occu.: Nil
Both R/o Shobha Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शामराव उर्फ हिरामण राघोजी चांदेकर आणि राधाबाई शामराव उर्फ हिरामण चांदेकर** हे अनुकमे दिनांक 17.11.1989 व 12.03.2006 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **दिवाकर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दिवाकर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर नोटीस

**प्रो.नं.२०४/२०२६**
**दि.२०.०६.२०२६**

**दर्यापूर येथील वि.जिल्हा न्यायाधिश-१ व अति.सत्र न्यायाधिश यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३/२०२६ दिनांक २७.०७.२०२६

**अर्जदार -** **कु. ओजस्वी सचिन अस्वार (अज्ञान) व इतर**

*विरुध्द*

**गैरअर्जदार-** मा.जिल्हाधिकारी साहेब, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

**हिंदू मायनॉरिटी आणि गार्डीयनशिप ॲक्ट कायदयाच्या कलम ८ प्रमाणे अज्ञानाचे नावाची मालमत्ता विक्रीची परवानगी मिळण्याबाबत-**

ज्याअर्थी वरील अर्जदार कु.ओजस्वी सचिन अस्वार,वय १० वर्षे, धंदा-शिक्षण हिचे अ.पा.क. वडिल नामे सचिन वासुदेव अस्वार, वय ४४ वर्षे, धंदा -शेती, रा.सत्यसाई अपार्टमेंट, बिल्डीग नं.६, सोमलवार शाळेजवळ, खामला नागपूर, ता.जि.नागपूर येथील रहिवासी असून, अर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ चे वडिल आहे. अर्जदार क्र.१ हिचे पालनपोषण व शिक्षण हे अर्जदार क्र.२ हे करतात. अनु. क्र.१ यांच्या हिश्याची खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरिता वि.जिल्हा न्यायालय-१,दर्यापूर यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे, त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे खेल बाबुजी ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती येथील वार्ड नं.२ मधील शेत स.नं. १३७ मध्ये मा.मुख्याधिकारी तथा नियोजन प्राधीकरण नगर परिषद अंजनगाव सुर्जी यांचे आदेश क्र.न.प.अ./बांधकाम/भुविप/१७६६/२०२० दि.१२/८/२०२० अन्वये तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अंजनगाव सुर्जी यांचे कार्यालयातील राजस्व मालमत्ता क्र.रा.मा.क्र.एन.ए.पी.-३४/ खेल बाबुजी/६/२०१९-२० आदेश पारित दि.१५/९/२०२० ई.चे आदेशान्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्यात आलेल्या लेआउट मंजुर झालेल्या विजय नगर या लेआउट मधील लेआउट प्लॉट नं.१९ ते ३० एकुण १२ प्लॉट.

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक २७.०७.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा न्यायाधिश -१,दर्यापूर यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निदिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दि.२०.०६.२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**दर्यापूर**
**दिनांक- २०/०६/२०२६**

शिक्का

**आदेशानुसार**
**अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय १, दर्यापूर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११३४/२०२६
**श्रीमती झाकीया अधिक आठ -वि- निरंक**
पुढील ता.०१.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Zakiya Sultana W/o Abdul Majeed, Age 80 Yrs. Occu.: Household
R/o Paradise Colony, Amravati.
2. Razia Sultana D/o Abdul Muzaf Taj, Age 65 Yrs. Occu.:Household
R/o Zakir Colony, Amravati.
3. Zahera Sultana W/o Raheem Khan, Age 66 Yrs. Occu.:Housewife
R/o Zakir Colony, Amravati.
4. Mateen Ahmad S/o Abdul Muzaf Taj, Age 63 Yrs. Occu.: Nil
R/o Noor Mohd Apartment, Aurangabad Times Colony,Aurangabad
5. Ghosia Sultana W\o Moin Ahmad, Age 62 Yrs. Occu.: Housewife
R/o Fatema Colony, Noor Nagar, Amravati.
6. Safiya Sultana W/o Mohd Abdul Kabeer (Dead) Through her Legal Heirs,
6A) Shahedabegum S/o Mohammad Abdul Kabeer,
Age 56 Yrs. Occu.: Household
R/o Junaidulla Mohammad Azam Colony,Hingoli,
Tq.Dist.Hingoli
6B) Shahnaz Parveen D/o Mohd Abdul Kabeer
Age 54 Yrs. Occu.: Household
R/o Khothalaj Road, Azam Colon, Hingoli, Tq.Dist.Hingoli
6C) Mohammad Sajid S/o Mohammad Kabir (Dead) Through his legal Heirs,
6C.1) Anjum Naz Wd/o Muhammad Sajid,
Age 63 Yrs. Occu.:Household
R/o Iqbal Nagar, Parbhani
6C.2) Ayesha Fatima D/o Mohammad Sajid,
Age 26 Yrs. Occu.: Household
R/o Iqbal Nagar, Parbhani
6C.3) Mohammad Affan S/o Mohammad Sajid,
Age 18 Yrs. Occu.: Student
R/o Iqbal Nagar, Parbhani
7. Mohammad Affan S/o Mohammad Sajid,Age 18 Yrs. Occu.:Student
R/o Iqbal Nagar, Parbhani
8. Salma W/o Mohammad Shahabuddin (Dead) through her legal heirs
8A) Mohammad Shahabuddin S/o Mohammad Sharfuddin,
Age 79 Yrs. Occu.: Nil
R/o Amin Towers, Red Hills, Hyderabad
8B) Asma Parveen W/o Jaweed Ahmed,Age 63 Yrs. Occu.:Household
R/o Syed Nagar, Asif Nagar, Hyderabad
8C) Mohammad Naimuddin S/o Mohammad Shahabuddin,
Age 52 Yrs. Occu.: Business
R/o Amin Towers, Red Hills Hyderabad
9. Manzoor Ahmed S/o Abdul Muzaf Taj (Dead) through legal heirs
9A) Sameena Wd/o Manzoor Ahmed,Age 59 Yrs. Occu.:Household
9B) Samreen Anjum D/o Manzoor Ahmed,
Age 40 Yrs. Occu.:Household
9C) Humaira Afreen D/o Manzoor Ahmed,
Age 35 Yrs. Occu.:Household
9D) Tahura Amreen D/o Manzoor Ahmed,
Age 30 Yrs. Occu.: Household
Appli.No.9A to 9D R/o Noorjahan Residency, Red Hills,Hyderabad

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Late Abdul Muzaf Taj S/o Mohammad Ismail हे दिनांक 10.01.1996 रोजी **हैद्राबाद** येथे मयत झाले. व मयत Late Khurshid Begum W/o Abdul Muzaf Taj हे दिनांक 13.01.2006 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Zakiya + 8 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Zakiya + 8 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०९८/२०२६
**श्रीमती निला अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२९.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Neela Arvind Hirudkar
Age 61 Yrs. Occu.: Housewife
2. Kanchan Arvind Hirudkar
Age 40 Yrs. Occu.: Service
Both R/o Near Garden, Ganesh Colony, Amravati-444601

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्री.अरविंद जनार्दन हिरुडकर** हे दिनांक 03.12.2014 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निला अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निला अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

बुधवार, दि. २४ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# यवतमाळात उद्धव ठाकरेंचा महाराष्ट्रव्यापी दौरा..!

## प्रलोभनांच्या राजकारणा विरोधात उबाठाचा एल्गार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ : उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यभर सुरू असलेल्या महाराष्ट्रव्यापी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्याची निवड केली असून, खासदारांच्या पक्षांतरानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीचा थेट आढावा घेण्यासाठी ते २७ जून रोजी यवतमाळ दौऱ्यावर येणार आहेत.**

ज्या भागातील खासदार दगा देऊन गेले, त्या भागातील जनतेशी आणि निष्ठावान कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधायचा अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी घेतल्याची माहिती उबाठाचे जिल्हा सहसंपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. राजेंद्र गायकवाड यांनी सांगितले की, यवतमाळ-वाशीमचे खासदार संजय देशमुख यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलू लागली आहेत. या पक्षांतरामुळे उबाठा पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असली, तरी संघटना पुन्हा नव्या जोमाने उभी करण्यासाठी पक्ष नेतृत्व सक्रिय झाले आहे. उद्धव ठाकरे यांच्यासह युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, खासदार विनायक राऊत, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि उद्धव ठाकरे यांचे स्वीय सहायक मिलिंद नार्वेकर हे देखील २७ जून रोजी यवतमाळ दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यातील मुख्य जाहीर सभा सकाळी १०.३० वाजता धामणगाव रोड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात होणार असून, २६ जूनच्या सायंकाळपर्यंत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे यवतमाळमध्ये आगमन होण्याची शक्यता आहे. या सभेकडे उबाठाच्या जिल्ह्यातील शक्तिप्रदर्शनाच्या दृष्टीने पाहिले जात आहे. पत्रकार परिषदेत बोलताना राजेंद्र गायकवाड यांनी गंभीर आरोप करत म्हटले की, खासदार संजय देशमुख यांच्या पक्षांतरानंतर आता गावपातळीवरील राजकीय समीकरणे बदलण्यासाठी नियोजित प्रयत्न सुरू आहेत. उबाठाचे सरपंच, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी दबाव टाकला जात असून, अनेक ठिकाणी आर्थिक प्रलोभने दिली जात आहेत. भविष्यात महत्त्वाची शासकीय कामे करून देण्याची आश्वासनेही दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. यापूर्वी वणीचे आमदार संजय देरकर यांच्यासह उबाठाचे अनेक पदाधिकारी मुंबई येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. या बैठकीत यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती, संघटन विस्तार, आगामी निवडणुकांची रणनीती आणि जनसंपर्क अभियानावर सविस्तर चर्चा झाली. कार्यकर्त्यांनी थेट जनतेमध्ये जाऊन पक्षाची भूमिका, विचारधारा आणि पक्षांतर मागील वास्तव मांडावे,असे स्पष्ट निर्देश उद्धव ठाकरे यांनी दिल्याचे गायकवाड यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला उबाठाचे जिल्हाप्रमुख किशोर इंगळे, चेतन शिरसाठ, तुषार देशमुख, प्रवीण शिंदे, सागरताई पुरी यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी २७ जूनच्या सभेमुळे यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, या दौऱ्याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



### संघटन कमकुवत करण्याचा प्रयत्न...

**संघटना कमकुवत करण्यासाठी फोडाफोडीचे राजकारण सुरू असले, तरी निष्ठावान कार्यकर्त्यांचा उत्साह कमी झालेला नाही. उबाठा पक्ष जमीनीवर अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्ते सज्ज आहेत,असा दावा राजेंद्र गायकवाड यांनी केला.**

# आदिवासींच्या आरोग्याचा पश्न अधांतरी..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २३ :** आदिवासीबहुल केळापूर, झरी-जामणी आणि पांढरकवडा परिसरातील हजारो नागरिकांसाठी आरोग्यसेवेचा आधार असलेल्या पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयातील विविध समस्या अद्याप कायम असून, त्यामुळे आदिवासी जनतेच्या आरोग्याचा प्रश्न अधांतरी राहिल्याची चिंता व्यक्त होत आहे. तज्ज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे, औषधांचा तुटवडा, डायलिसिस सेंटरकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था, कर्मचारी निवासस्थानांचा प्रश्न आणि अन्य मूलभूत सुविधांच्या अभावामुळे रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या समस्यांबाबत पाठपुरावा करण्यात आल्यानंतर रुग्णालय प्रशासनाने लेखी उत्तर दिले असले, तरी बहुतांश प्रश्नांवर वरिष्ठ कार्यालयाकडे पत्र पाठविणे किंवा अंदाजपत्रकाची मागणी करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे चित्र समोर आले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालय हे संपूर्ण आदिवासी पट्ट्यासाठी जीवनदायी केंद्र आहे. मात्र वर्षानुवर्षे रिक्त पदे आणि अपुऱ्या सुविधांमुळे रुग्णांना उपचारासाठी यवतमाळ, नागपूरसह इतर शहरांकडे धाव घ्यावी लागत आहे. यामुळे आर्थिक व मानसिक त्रास वाढत असून ग्रामीण आणि आदिवासी भागातील आरोग्य व्यवस्था कमकुवत होत आहे. सध्या सुरू असलेल्या राज्याच्या पावसाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करून शासनाने विशेष निधी उपलब्ध करावा, रिक्त पदे तातडीने भरावीत आणि प्रलंबित विकासकामे पूर्ण करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकारी, आरोग्य आयुक्त आणि आरोग्यमंत्री यांनी स्वतः लक्ष घालून स्वतंत्र चौकशी करून आदिवासी भागातील नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही पुढे आली आहे.

# बाभुळगाव नगर पंचायतीत 'ई-निविदा घोटाळ्या'चा आरोप..!

## अभियंत्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव, न्याय न मिळाल्यास कुटुंबासह उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. २३ :** बाभुळगाव नगर पंचायतीच्या बांधकाम विभागातील ई-निविदा प्रक्रियेत अनियमितता करून निविदा रद्द करण्यात आल्याचा तसेच जातीयवादी अन्याय झाल्याचा गंभीर आरोप सुशिक्षित बेरोजगार अभियंता निलेश मुकुंदराव दंदे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल करून अध्यक्ष, उपाध्यक्ष, बांधकाम सभापती, मुख्याधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध निःपक्ष चौकशी व फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

लोकशाही अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्रमांक १६ मध्ये राजू ठाकरे ते गजानन गोटफोडे यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता बांधकामासाठी ई-निविदा क्र. २०२६_DMA_१२९९०९०_१ दि. २९ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या निविदेत निलेश दंदे यांनी सहभाग घेतला होता. दंदे यांच्या म्हणण्यानुसार, दि. १४ मे रोजी तांत्रिक लिफाफे उघडण्यात आल्यानंतर 'प्री-बीड मिटिंगचे इतिवृत्त' जोडले नसल्याचे कारण देत त्यांना कागदपत्रे सादर करण्याची नोटीस देण्यात आली. मात्र, शासन निर्णयानुसार प्री-बीड मिटिंगची अट १.५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या कामांसाठी लागू असून संबंधित कामाची किंमत केवळ ३१ लाख रुपये असल्याने ही अट लागू होत नसल्याचा खुलासा त्यांनी लेखी स्वरूपात दिला होता. तरीही काही तासांतच "तांत्रिक अडचण" हे अस्पष्ट कारण देत संपूर्ण निविदा रद्द करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नगर पंचायत प्रशासनाने संगनमत करून जवळच्या कंत्राटदारांना ०.५० टक्के 'बिलो' दरात कामे मिळवून दिल्याचा तसेच अनुसूचित जातीतील असल्याने आपल्यावर जाणीवपूर्वक अन्याय झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. दि. १८ जून २०२६ रोजी दाखल झालेल्या या तक्रारीमुळे बाभुळगाव नगर पंचायतीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून जिल्हाधिकारी या प्रकरणात कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. न्याय न मिळाल्यास पत्नी व मुलांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा निलेश दंदे यांनी दिला आहे.

# नेर तहसीलदार व ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा वाद पेटला..!

## विदर्भ पटवारी संघाचे उमरखेड उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २३ :** नेर तालुक्यातील चार ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे (तलवाडा, नेर इत्यादी क्षेत्रातील) निलंबन विनाअट मागे घेण्यात यावे, तसेच नेरचे तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी, या मागण्यांसाठी विदर्भ पटवारी संघ नागपूर उपविभाग उमरखेडच्या वतीने उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

या पत्रकामुळे महसूल वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. विनाअट निलंबन मागे घेण्याची मागणी विदर्भ पटवारी संघाने दिलेल्या अधिकृत पत्रात नमूद केल्यानुसार, नेर तालुक्यातील चार ग्राम महसूल अधिकाऱ्यांवर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई अत्यंत अन्यायकारक आहे. हे निलंबन कोणत्याही अटीशिवाय तातडीने मागे घेण्यात यावे, अशी आक्रमक भूमिका संघटनेने घेतली आहे.या निवेदनात प्रामुख्याने नेरचे तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांच्या कामकाजावर आक्षेप घेण्यात आला असून, त्यांच्यावर कडक प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच, ग्राम महसूल अधिकारी संवर्गाच्या बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्या आणि अटी त्वरित पूर्ण कराव्यात, याकडेही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.



### संघटनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**विदर्भ पटवारी संघ (जिल्हा शाखा यवतमाळ) यांच्या वतीने यापूर्वी १८ जून २०२६ रोजी देखील या संदर्भात निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर आता उपविभाग उमरखेड अंतर्गत २२ जून २०२६ रोजी विदर्भ पटवारी संघाचे अध्यक्ष राजकुमार पी.गरूडे आणि सचिव संजयकुमार एम. धुळे यांच्या स्वाक्षरीने हे पत्र उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष सादर करण्यात आले आहे. या मागण्यांवर प्रशासनाने त्वरित सकारात्मक निर्णय न घेतल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महसूल कर्मचाऱ्यांकडून दिला जात आहे.**

## थोडक्यात

### बनावट शासन आदेशावर बंद शाळेला मान्यता..!

**यवतमाळ :** बनावट शासन आदेशाच्या आधारे बंद पडलेली अनुदानित उर्दू



माध्यमिक शाळा स्थलांतरित शाळा म्हणून पुन्हा सुरू करून तिला मान्यता देण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणामुळे शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. नागपूर रोडवरील एम. बी. खान शाळा परिसरात शमा सार्वजनिक संस्था, कळंब संचालित रियाज अहमद कुरेशी मेमोरियल उर्दू माध्यमिक शाळा, आर्वी (जि. वर्धा) स्थलांतरित करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, संबंधित स्थलांतर आदेश शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याने स्थानिक शाळांनी आक्षेप घेत तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर शासनाने २५ मार्च २०२६ रोजी संबंधित स्थलांतर आदेश शासनाकडून निर्गमितच झाला नसल्याचे स्पष्ट केले. तसेच शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी आपल्या चौकशी अहवालात आदेश बनावट असण्याची शक्यता व्यक्त केली. त्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी यू-डायस क्रमांक व आरटीई मान्यता रद्द करण्याचे आदेश दिले. मात्र, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी केवळ मान्यता रद्द करण्याची शिफारस करून प्रकरण शिक्षण उपसंचालक, अमरावती यांच्याकडे पाठविले. एक महिना उलटूनही अंतिम निर्णय न झाल्याने संस्था चालकांकडून पालकांची दिशाभूल होत असून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला. दोषींवर तातडीने फौजदारी कारवाई करून प्रकरणाचा निकाल लावावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### योगाभ्यास हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनावा- प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर.

**राळेगाव :** कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव येथे २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमाने विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना जीवनशैलीत योगाचा अंगीकार करण्याची प्रेरणा दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर हे योगशास्त्राचे गाढे अभ्यासक असून त्यांनी अष्टांग योगाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी वज्रासन, पवनमुक्तासन, उष्ट्रासन, भुजंगासन, सर्वांगासन, शवासन, सूर्यनमस्कार यांसारख्या आसनांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. त्याचबरोबर अनुलोम-विलोम, कपालभाती व उज्जयी प्राणायामाचे फायदे समजावून सांगितले. डॉ. सावरकर यांनी अधोरेखित केले की योग व ध्यानामुळे मानसिक व शारीरिक विकास साध्य होतो. मन निरोगी असेल तर बुद्धीचा विकास होतो आणि जीवनात सकारात्मकता वाढते. त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की योगाला केवळ एका दिवसापुरते मर्यादित न ठेवता तो दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा. योग दिनाचा हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम न राहता, जीवनशैलीत बदल घडविण्याची प्रेरणा ठरला. निरोगी शरीर, शांत मन आणि जागरूक बुद्धी याचाच संदेश या योग दिनाने दिला.

यावेळी प्रा.अविनाश फाळके, प्रा.विनोद गौरकार, डॉ.सुरेश फुलकर, डॉ.विशाल दौलतकर, डॉ.रुपेश पवार, प्रा. विशाल वाघमारे, राजेंद्र इटाळे प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महादेव राऊत, शंकर ढोरे व नारायण बुरबुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# उष्ण लाटेचा कहर,७० टक्के संत्रा बागा उद्ध्वस्त..!

## शेतकऱ्यांची तातडीच्या मदतीची आर्त हाक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २३ :** मार्च ते मे दरम्यान पडलेल्या भीषण उष्ण लाटेचा आणि त्यानंतर झालेल्या अवकाळी पावसाचा फटका दिग्रस तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसला असून तालुक्यातील अनेक गावांतील सुमारे ७० टक्क्यांहून अधिक संत्रा बागा उद्ध्वस्त झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



यामुळे बागायतदार शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. कलगाव, डेहणी, कांदळी, आडगाव, वडगाव, टाकळी, महागाव यासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये तीव्र उष्णतेमुळे संत्रा झाडांची पाने गळून पडली, फळे करपली आणि अनेक झाडे पूर्णपणे सुकून गेली. अब्या बहारची फळधारणा झालेली संत्री मोठ्या प्रमाणात जमिनीवर गळून पडली असून उरलेली फळेही निरुपयोगी ठरली आहेत. शेतकऱ्यांनी सांगितले की, मुलाबाळांप्रमाणे सहा ते सात वर्षे जपून वाढविलेल्या संत्रा बागा एका झटक्यात नष्ट झाल्या आहेत. पाण्याची उपलब्धता असूनही तीव्र उष्ण लाटेमुळे झाडे तग धरू शकली नाहीत. गेल्या दोन-तीन वर्षांपासून हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागत असल्याने शेती सातत्याने तोट्यात जात आहे. यावर्षीच्या नुकसानीमुळे अनेक शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी तहसीलदार मयुर राऊत यांच्याकडे लेखी निवेदन देऊन तातडीने पंचनामे करून शासनाकडून आर्थिक मदत व नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. निवेदनाच्या प्रती पालकमंत्री संजय राठोड, खासदार संजय देशमुख, जिल्हाधिकारी यवतमाळ आणि तालुका कृषी अधिकारी दिग्रस यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.यावेळी फारुक अहमद, गजानन आंबेकर, प्रमोद बनगीनवार, सुभाष काटेकर, सचिन अटल, रविंद्र देशट्टीवार, देवेंद्र राऊत, रामेश्वर पवार, हाजी अब्दुल मजीद, विवेक आंबेकर, शेख जावेद, शेख जलील, सचिन राऊत, राजपाल बनसोड, शेख हारून, दानिश सौदागर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# न.प. नगररचनाकार यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई सह निलंबनाची मागणी..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २३ :** नगरपरिषद मधील बांधकाम विभागातील नगर रचनाकार कार्तिक पुजारी हे कर्तव्यात कसूर,अपमानास्पद वर्तन, माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध चौकशी करून निलंबन व शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी डॉ.अरुण राऊत यांनी तक्रार दाखल केली आहे.



तक्रारकर्ते डॉ.अरुण राऊत, रा. पुसद, यांनी रामनगर परिसरातील संबंधित बांधकामाबाबत यापुर्वी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यावरील कार्यवाहीची माहिती जाणून घेण्यासाठी नगर परिषद पुसद येथे प्रत्यक्ष भेटून संबंधित नगर रचनाकार कार्तिक पुजारी यांच्याकडे सदर तक्रारीबाबत विचारणा केली असता, त्यांनी कोणतीही माहिती न देता अचानक संताप व्यक्त करुन.हे आमचं काम नाही, तुम्ही मुख्याधिकाऱ्यांना भेटा" असे सांगून केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले. आणि कोणतीही समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीचे उत्तरे दिली तसेच तक्रारकर्ते डॉ.अरुण राऊत यांच्याशी अत्यंत उद्धट,असभ्य व अपमानास्पद भाषेत वर्तन केल्याचे तक्रारी मध्ये नमूद केले आहे. एका जबाबदार शासकीय अधिकाऱ्यास अशा प्रकारचे वर्तन निश्चितच न शोभणारे आहे.सदर प्रकरण हे नागरिकांच्या जीवित व सुरक्षेशी संबंधित अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे. अशा परिस्थितीत संबंधित नगर रचनाकार अभियंत्याने जबाबदारीने माहिती देणे अपेक्षित असतांना माहिती देण्यास टाळाटाळ करून कर्तव्यात कसूर केले व माहिती देण्याऐवजी माहिती लपविण्याचा प्रयत्न करण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांचे हे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचे उल्लंघन करणारे असून नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणारे आहे. अशा प्रकारच्या वर्तनामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास कमी होईल व शासनाची प्रतिमाही मलिन होईल. त्यामुळे संबंधित नगर रचनाकार कार्तिक पुजारी यांच्या वर्तनाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून तात्काळ निलंबित करण्यात यावे तसेच शिस्तभंगाची कठोर कारवाई सुद्धा करण्यात यावी. अशा विषयाची तक्रार मुख्याधिकारी नगरपरिषद पुसद यांच्याकडे दाखल केली आहे.

# टीबी रुग्णालयाच्या जमिनीचा '९५ कोटींचा भाडेपट्टा' की २०० कोटींचा चुराडा..!

## उच्चस्तरीय चौकशीची संतोष बोरले यांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** यवतमाळ नगरपालिकेच्या मालकीच्या मौल्यवान टीबी रुग्णालयाच्या जमिनीचा ९० वर्षांसाठी केवळ ९५ कोटी रुपयांच्या भाडेपट्ट्यावर देण्यात आलेल्या निर्णयावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नगर परिषदेचे सदस्य संतोष बोरले यांनी या प्रकरणाला 'जमीन घोटाळा' संबोधत उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.



त्यांच्या दाव्यानुसार, सुमारे ३०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेली जमीन कमी किमतीत भाडेपट्ट्यावर देण्यात आल्याने नगरपालिकेचे २०० कोटी रुपयांहून अधिक नुकसान होत आहे. बोरले यांनी आरोप केला की, प्रकल्पात जमिनीचे क्षेत्रफळ कमी दाखवून पार्किंग क्षेत्राचा समावेश करण्यात आला आणि त्यामुळे खासगी कंत्राटदाराला अतिरिक्त एफएसआय (फ्लोअर स्पेस इंडेक्स) चा लाभ देण्यात आला. प्रत्यक्षात ९,४९७.१८ चौरस मीटर वापर क्षेत्र असताना एकूण १६,५७४.४०८ चौरस मीटरचा लाभ देण्यात आल्याने बांधकाम क्षमता लक्षणीयरीत्या वाढल्याचा दावा त्यांनी केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, बांधकाम खर्च, व्याजदर, थकबाकी आणि इतर तांत्रिक बाबींचा आधार घेत जमिनीचे मूल्यांकन कृत्रिमरीत्या कमी करून ते ८९.८२ कोटी रुपयांपर्यंत आणण्यात आले. तसेच, २० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकामासाठी आवश्यक पर्यावरणविषयक ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) आणि २०१९ मध्ये एडीटीपीने मागितलेली तांत्रिक मंजुरीही प्राप्त करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, एका विशिष्ट कंत्राटदाराला लाभ मिळावा यासाठी निविदांच्या अटींमध्ये बदल करत अनेक वेळा निविदा काढण्यात आल्याचा आरोपही बोरले यांनी केला. या प्रकल्पामुळे १०० हून अधिक दुकानदार आणि सुमारे २५ कुटुंबांच्या उपजीविकेवर परिणाम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.


# ठेकेदार विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २३ :** महागाव तालुक्यातील लोअर जलाशयात कथित रित्या सुरू असलेल्या अवैध मासेमारी प्रकरणी संबंधित ठेकेदारा विरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तुळजा भवानी मच्छीमार सहकारी संस्था, वेणी (बु.)च्या सदस्यांनी महागाव पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे केली आहे.

या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून मत्स्य संपदा व पर्यावरण धोक्यात आल्याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे.संस्थेचे सदस्य संभाजी सखाराम भुरके व इतरांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लोअर जलाशयातील मासेमारीचा अधिकृत ठेका संस्थेकडे असताना काही व्यक्ती बेकायदेशीररित्या मासेमारी करीत आहेत. याबाबत अनेक वेळा तक्रारी करूनही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदना नुसार, यापूर्वीही संबंधित ठेकेदारांना विषारी औषधांचा वापर करून मासेमारी करताना ग्रामस्थांनी पकडल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच २१ जून रोजी ही संबंधितांना अवैध मासेमारी करताना रंगेहात पकडण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही त्यांच्याविरोधात कोणतीही कठोर कारवाई झाली नसल्याने बेकायदेशीर प्रकारांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळत असल्याची भावना मच्छीमारा मध्ये आहे. संस्थेच्या सदस्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधितांविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संस्थेने दिला आहे. सदर निवेदनाच्या प्रती पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड आणि मत्स्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

### पोलिसांचा इशारा – दोषींना कोणतीही सवलत नाही



**"लोअर जलाशयात अवैध मासेमारी होत असल्याच्या तक्रारी अत्यंत गंभीर आहेत. कोणताही व्यक्ती कायद्यापेक्षा मोठा नाही. चौकशीत आरोप सिद्ध झाल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. विषारी औषधांचा वापर, बेकायदेशीर मासेमारी किंवा अन्य कोणतेही अवैध प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. अशा कृत्यांवर पोलीस प्रशासनाची करडी नजर असून दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नाही."**

**– सुनिल अंबुरे, ठाणेदार, पोलीस स्टेशन महागाव, जि. यवतमाळ**

# आंतरराष्ट्रीय सायबर टोळीचा भंडाफोड, गोव्यातून 12 जण अटकेत





## आलिशान सोसायटीवर अमरावती ग्रामीण पोलिसांचा छापा
## आंतरराष्ट्रीय सायबर फसवणूक आणि ऑनलाइन गेमिंग रॅकेटचा पर्दाफाश

**अमरावती /प्रतिनिधी :** अमरावती ग्रामीण पोलिसांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या सायबर फसवणूक आणि अवैध ऑनलाइन गेमिंग रॅकेटचा मोठा पर्दाफाश केला आहे. दक्षिण गोव्यातील एका आलिशान निवासी संकुलावर धाड टाकत पोलिसांनी एका महिलेसह १२ आरोपींना अटक केली. या कारवाईत सुमारे १० लाख ८५ हजार रु पयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तपासात ६ कोटी २५ लाख रु पयांहून अधिकच्या संशयास्पद आर्थिक व्यवहारांचा उलगडा झाला आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींनुसार, जिल्ह्यातील गरीब व मजूर वर्गातील नागरिकांना विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्या नावावर बँक खाती उघडण्यात येत होती. त्यानंतर संबंधितांकडून एटीएम कार्ड, पासबुक आणि बँक खात्याशी संलग्न मोबाईल सिमकार्ड ताब्यात घेतले जात होते. या खात्यांचा वापर देश-विदेशातील ऑनलाइन गेमिंग, सायबर फसवणूक आणि आर्थिक गैरव्यवहारांमधील पैशांच्या देवाणघेवाणीसाठी करण्यात येत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी शिरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सायबर पोलिसांच्या तांत्रिक तपासादरम्यान आरोपींचा माग काढण्यात आला. तपासाची सूत्रे दक्षिण गोव्यातील प्रोव्हिडंट अडोरा या आलिशान निवासी संकुलापर्यंत पोहोचली. त्यानंतर अमरावती ग्रामीण पोलिसांच्या तीन विशेष पथकांनी तेथे सापळा रचून छापा टाकला आणि १२ आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये देवचंद मेश्राम, प्रेम खिलारे, अनिकेत मस्के, योगेश इरपाते, प्रीतम इंगळे, आशीषकुमार चौरसिया, सत्यम मौर्या, शुभम झारिया, वैभव सूर्यवंशी, आदित्य माळी, सुशील बर्मन यांच्यासह एका महिला आरोपीचा समावेश आहे. दरम्यान, अमरावतीचा रहिवासी राकेशकुमार झामनानी याच्यासह आणखी दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम व अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक लांडे, विलासकुमार सानप, अमोल पुरी, संतोष गुर्जर, सुनील बनसोड, प्रवीण वानखडे, पंकज गोळीईतकर, प्रवीण आंबाडकर, रितेश गोस्वामी, अजित राठोड, संदीप जुगनाके, पवन ढोके, अंकित अढाउ, मयूर नरोकार, आशीष मुडें, सुमित चव्हाण, रोशन आठवले, सरिता चौधरी, रुपाली इंगोले, पूनम कान्होलीकर, कल्पना सोनोत्रे, आचल मेटे आणि योगिता शेळके यांनी पार पाडली.

### 64 बँक खाती गोठविली

छाप्यामध्ये पोलिसांनी आरोपींकडून मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक व बँकिंग साहित्य जप्त केले. यात १९८ सिमकार्ड, १४७ एटीएम कार्ड, ६४ बँक पासबुक, १९ चेकबुक, ५२ मोबाईल फोन, ९ लॅपटाप आणि ३ टॅबलेट यांचा समावेश आहे. तपासात या ६४ बँक खात्यांमधून तब्बल ६ कोटी २५ लाख रु पयांचे व्यवहार झाल्याचे समोर आले. या सर्व खात्यांवर तात्काळ स्थगिती (फ्रीज) आणण्यात आली असून, देशातील विविध राज्यांमधून या खात्यांविरोधात ऑनलाइन तक्रारी नोंद असल्याचेही उघड झाले आहे.

### नागरिकांनी सावध राहावे : निकेतन कदम

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, अल्प आर्थिक मोबदल्याच्या आमिषाला बळी पडून कोणालाही आपले बँक खाते, एटीएम कार्ड, आधार कार्ड किंवा मोबाईल क्रमांक वापरण्यास देउ नये. कोणत्याही परिस्थितीत ओटीपी शेअर करू नये. अशा खात्यांचा वापर ऑनलाइन गेमिंग, शेअर ट्रेडिंग, डिजिटल अरेस्ट सारख्या सायबर गुन्ह्यांमधील पैशांच्या व्यवहारासाठी केला जातो. जर कोणी आपले खाते इतरांच्या वापरासाठी दिले असेल, तर ते त्वरित परत घेउन सायबर हेल्पलाइनकडे माहिती द्यावी.

# शिवभोजन थाळी योजनेत आवश्यक बदल करण्याची गरज-आ.खोडके

### अनुदान वाढविण्याची विधानपरिषदेत मागणी

### हॉस्पिटल व बाजार समितीत शिवभोजन केंद्र वाढविण्यास प्राधान्य : ना.भुजबळ

**मुंबई/प्रतिनिधी-**महाराष्ट्र शासनाची शिवभोजन थाळी योजना गरीब आणि गरजू लोकांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. कोरोनाकाळात या योजनेचे महत्व अधोरेखित झाले असून आज गरीब ,गरजू व श्रमजीवी वर्गाला या थाळी योजनेमुळे पोट भरण्याची सोय मिळाली आहे. बाजार समिती , सरकारी हॉस्पिटल अशा ठिकाणी लाभार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने आज शिवभोजन योजनेचा विस्तार करून आवश्यक बदल करून योजनेचा निष्ठांक व अनुदान वाढविण्याची मागणी आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून केली आहे.



राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून आज मंगळवार दिनांक २३ जून २०२६ रोजी वरिष्ठ सभागृहातील दुस-या दिवसाच्या कामकाजादरम्यान अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण विभागाच्या संबंधित प्रश्नावर चर्चा सुरु असतांना आ.संजय खोडके यांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. आ. संजय खोडके यांनी सांगितले कि, कोरोना काळापासून शिव भोजन थाळी योजना सुरु करण्यात आली असून गरीब व गरजू घटकांकरिता हि योजना अत्यंत फायदेशीर आहे. या योजनेअंतर्गत अवघ्या १० रु पयांमध्ये २ चपात्या, १ वाटी भाजी, १ वाटी वरण आणि १ मूद भात दिला जातो. ख-या अर्थाने रु ग्णालय परिसर व बाजार समिती भागात या योजना सुरु असल्याने गरीब , गरजू व श्रमजीवी वर्गाला जेवणाची सोय मिळाली असल्याने हि एक शासनाची अत्यंत चांगली योजना आहे. पुढेही हि योजना अशीच सुरु राहण्यासाठी व जास्तीतजास्त गरजूंना याचा लाभ मिळण्यासाठी आणखीन नवीन शिव भोजन केंद्र वाढविण्याची गरज आहे. तसेच शिवभोजन थाळीतील पदार्थामध्ये काही पौष्टिक व पोषणयुक्त पदार्थांचा समावेश करण्यात यावा. आजच्या महागाईप्रमाणे शिव भोजन केंद्र चालकांना अनुदान देण्यात यावे, हि योजना बंद होउ नये म्हणून नियमित अनुदान देणे सुद्धा आवश्यक आहे. याकरिता योजनेचा विस्तार करण्यास आवश्यक बदल करण्याची मागणी करीत आ.संजय खोडके यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

यावर उत्तर देतांना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना.छगनराव भुजबळ यांनी सांगितले कि, सुरवातीच्या काळात शिव भोजन केंद्रांचे अनुदान हे साधारणतः सहा महिने प्रलंबित राहत होते. यासंदर्भात शासनाचे सर्व अडचणीचे निराकरण करून आता मात्र योजनेचे शासकीय अनुदान दर महिन्याला नियमित दिले जात आहे. अनेक हॉस्पिटल व बाजार समिती परिसरात शिव भोजन थाळी योजना सुरळीतपणे कार्यान्वित असून आणखीन नव्याने केंद्र वाढविण्यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले. हॉस्पिटल व बाजार समिती सारख्या परिसरात योजनेचा निष्ठांक वाढविणे व नवीन केंद्र सुरु करण्यास प्राधान्याने परवानगी देणार असल्याचे सुद्धा ना. छगन भुजबळ यांनी सभागृहासमक्ष सांगितले.

### मध्यरात्री पार्किंगमधील तीन दुचाकींना जाळल्या

**भूमीपुत्र कॉलनीतील घटना**

**अमरावती :** शहरातील भूमीपुत्र कालनी परिसरात अज्ञात व्यक्तींनी दुचाकींना आग लावल्याची घटना समोर आली असून, यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घराच्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या तीन दुचाकींना लागलेल्या आगीत दोन वाहने पूर्णपणे जळून खाक झाली, तर तिस-या वाहनाचे मोठे नुकसान झाले. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील या घटनेत मोठे आर्थिक नुकसान झाले असून, अज्ञात व्यक्तींच्या कृत्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पियुष प्रवीण कडू (वय १८) हे भूमीपुत्र कालनीत भाड्याने वास्तव्यास आहेत. सोमवारी सकाळी घरमालक तेजस रंगारी यांनी पार्किंग परिसरातून धूर निघत असल्याचे पाहून पियुष यांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली असता पार्किंगमधील दुचाकी जळालेल्या अवस्थेत आढळून आल्या. या आगीत एमएच-२७/डीके-४३३० आणि एमएच-२७/ईडी-३५२३ क्रमांकाच्या दोन मोपेड पूर्णतः जळून नष्ट झाल्या. तर एमएच-२७/एवाय-३३१३ क्रमांकाच्या दुचाकीच्या समोरील भागाचे (पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी बँक ऑफ महाराष्ट्र शाखेतील कर्मचा-यांची मुजोरी

### ग्राहकासोबत असभ्य वर्तन नित्याची बाब



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनीधी-** अंजनगाव येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत कर्मचा-यांच्या असभ्य वर्तनाने कळस गाठला आहे.खातेदार, शेतकरी, निराधार, पेंशनधारक, लाडकी बहीण योजनेचे लाभार्थी आणि बचत गटातील महिलांना कर्मचा-यांकडून सातत्याने अपमानास्पद वागणूक मिळत आहे. विनाकारण तिष्ठत ठेवणे, हीन बोलणे आणि जाणीवपूर्वक संयम सुटेल असे वर्तन करणे, हा येथील कर्मचा-यांचा नित्यक्रम झाला आहे. येथील बँक ऑफ महाराष्ट्र येथे बँकेत कामा निमीत्य येणा-या ग्राहकांशी बॅकेतील कर्मचारी हेतुपुरस्परपने ग्राहकांचा संयम सुटेल असे वर्तन करीत असल्याचे आढळले आहे, काही कर्मचारी कामाची वेळ धाब्यावर बसवुन बँकेचे कामकाज सकाळी १० वाजता सुरू होणे बंधनकारक असताना कर्मचारी ११वाजेपर्यंत आपले आयडी जनरेट करत नाहीत. त्यामुळे सकाळपासून रांगेत उभ्या असलेल्या वृद्ध, निराधार महिला, पेंशनधारकांचे अक्षरशः हाल होतात.बँकेमध्ये विड्रॉल स्लिपने पैसे देणे जवळपास बंद केले आहे. 'एटीएमला जा, मिनी बँकेत जा' असे तोंडी आदेश (पान २ वर)

### व्यवस्थापक हतबल, कारवाई शून्य

शाखा व्यवस्थापक कर्मचा-यांवर कोणताही वचक ठेवू शकलेले नाहीत. तक्रारी करूनही परिस्थिती 'जैसे थे' आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये प्रचंड रोष खदखदत आहे. हा रोष कधीही उद्रेकात बदलेल आणि बँकेत मोठा वाद निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### बँक जनतेची सेवक की जनता बँकेची?

बक ऑफ महाराष्ट्रसारखी शासकीय बँक जनतेसाठी आहे. मात्र येथील कर्मचारी स्वत?ला 'साहेब' समजून वागू लागले आहेत. बँकेची सेवा घेणे हा ग्राहकांचा हक्क आहे, उपकार नाही, हे कर्मचा-यांनी लक्षात घ्यावे. वरिष्ठ व्यवस्थापनाने आणि बँकेच्या विभागीय कार्यालयाने या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी. अंजनगावसह परिसरातील हजारो ग्राहक या शाखेवर अवलंबून आहेत. महाराष्ट्र बँकेतील कामचुकारपणा आणि असभ्य वर्तन ही नित्याचिच समस्या असून दिवसेंदिवस वाढती समस्या झाली आहे. वरिष्ठ व्यवस्थापनाने तातडीने हस्तक्षेप करून कर्मचा-यांच्या प्रशिक्षणासह शिस्त लावण्याची गरज निर्माण झाली आहे. या बाबत बँक शाखा व्यवस्थापक सुरज सातपुते यांना समक्ष विचारणा केली असता त्यांनी वरिष्ठकडून प्रतिक्रीया देण्यास मज्जाव केला आहे.असे सांगुन प्रतीक्रीया देण्यास नकार दिला.

### मोटारसायकल चोरटा जेरबंद

**अमरावती :** चोरीची मोटारसायकल विक्री करण्यासाठी आलेल्या एका युवकाला गाडगेनगर पोलिसांच्या डीबी पथकाने सापळा रचून अटक केली. आरोपीकडून चोरीची मोटारसायकल आणि मोबाईल असा एकूण ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**चोरीची दुचाकी व मोबाईलसह ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त**

गाडगेनगर पोलीस ठाण्यात १२ जून रोजी ऋषीकेश साहेबराव घाटे (वय २७, रा. भीमनगर, अमरावती) यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या मालकीची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस (एमएच-२७ सीजी-९६२८) ही मोटारसायकल आणि त्यामध्ये ठेवलेला व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन भीमनगर येथील सार्वजनिक शौचालयाजवळून चोरीला गेला होता. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. दरम्यान, गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाला गुप्त माहिती मिळाली की, एक युवक चोरीची मोटारसायकल विक्री करण्यासाठी तहसील कार्यालय परिसरात(पान २ वर)

### मनरेगा कायदा पुन्हा लागू करण्याची मागणी

# लाल बावटा शेतमजूर युनियनचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन संलग्न भारतीय खेत मजदूर युनियन (अमरावती जिल्हा कौन्सिल)च्या वतीने दिनांक १५ ते २२ जून २०२६ दरम्यान मनरेगा बचाव जनजागरण अभियान राबविण्यात आले. देशव्यापी आंदोलनांतर्गत दिनांक २३ जून २०२६ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत महा धरणे आंदोलन करण्यात आले.

शेतीच्या यांत्रिकीकरणाबरोबर विस्थापित झालेल्या शेतमजूरांना सरकार वा-यावर सोडत आहे. शेतीमध्ये काम कमी झाले आहे. मजुरी अत्यल्प आहे. महागाई प्रचंड वाढत आहे. अन्न वस्त्र निवारा आरोग्य शिक्षण ह्या प्राथमिक गरजा पूर्ण करणे अत्यंत कठीण झाले आहे. महिला मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जात पूर्णपणे बुडालेल्या आहेत. सरकारी कर्ज मिळत नाही. प्रकल्पात सर्वाधिक विस्थापित शेतमजूर होत आहेत. सरकारी धान्य दुकानात अत्यंत निकृष्ट धान्य मिळत आहे. घरकुलाला मिळणारी रक्कम अत्यंत तुटपुंजी आहे. घरकुल बांधल्यानंतर पुन्हा कर्जाचा डोंगर वाढत आहे. शेतक-यांप्रमाणे किमान सवलती आणि सन्मानधन मिळत नाही. शिक्षणापासून सर्वाधिक वंचित शेतमजुरांची मुले मुली राहत आहेत. अनेक जिल्हा परिषद शाळा बंद होत आहे. खेड्यांची अवस्था हिन दीन होत आहे. सरकार महासत्तेच्या बाता करत आहे आणि गाव खेडे व शेतमजूरांना रानटी अवस्थेत ढकलत आहे. प्रचंड श्रीमंती एकीकडे वाढत आहेत तर गरीब आणखी गरीब होत आहे.या पार्श्वभूमीवर शेतमजुरांच्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आंदोलन करण्यात आले. व्हिबी जिग्रामजी कायदा रद्द करून मनरेगा कायदा पुन्हा कायम ठेवण्यात यावा. मनरेगा अंतर्गत वर्षातून २०० दिवस काम व ७०० रुपये किमान वेतन देण्यात यावे. भूमिहीनांना पाच एकर शासकीय जमीन उपजीविकेसाठी देण्यात यावी. दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत शासनाने खाजगी जमीन अधिग्रहण करून आणि शासकीय गायरान जमीन भूमिहीनांना देण्यात यावी. सर्व अतिक्रमणधारक,गायरान धारक, वन जमीन धारक यांना जमिनीचे पट्टे तात्काळ वितरित करण्यात यावे. सर्व(पान २ वर)

### मोझरी, कौंडण्यपूर व वलगाव विकास आराखड्यासाठी

# 72 कोटींचा निधी मंजूर

**अमरावती/प्रतिनिधी-**वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी विकास आराखडा, श्री. क्षेत्र कौंडण्यपूर विकास आराखडा व संत गाडगेबाबाब निर्वाणभूमी, वलगाव विकास आराखडा अंतर्गत बांधण्यात आलेल्या अनेक इमारतींचे तत्कालीन लोकप्रतिनिधींच्या निहित राजकीय स्वार्थांपायी संबंधित संस्थांना हस्तांतरित होउ न शकल्यामुळे वर्षानुवर्षे देखभाली अभावी या इमारतींची मोठी दुरावस्था झालेली होती. प्रामुख्याने मोझरी विकास आराखडा अंतर्गत मोठ्या प्रमाणात इमारतींचे निर्माण करण्यात आलेले होते. यामध्ये राष्ट्रसंतांचे आध्यात्मिक संकुल, ग्रामविकास प्रबोधिनी, भक्तनिवास व्यवस्था, अतिविशिष्ट व्यक्तींच्या १२ डारमेट्री यासह अन्य इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले होते. परंतु उपरोक्तइमारती वर्षानुवर्षे हस्तांतरण न केल्यामुळे देखभाली अभावी या इमारती अत्यंत दुरावस्थेमध्ये आल्या होत्या. अत्यंत सुरुवातीच्या काळापासून या तीनही विकास आराखड्यांमधील नादुरुस्त इमारतींची दुरुस्ती करूनच या इमारती श्री.गुरु देव सेवा मंडळ, कौंडण्यपूर देवस्थान समिती व तत्सम संस्थान यांना हस्तांतरित करण्यात याव्यात अशी आग्रही भूमिका आमदार राजेश वानखडे यांनी घेतलेली होती. त्या दिशेने सातत्याने ते प्रयत्नशील सुद्धा होते. विधिमंडळामध्ये या इमारतींच्या दुरावस्थे बद्दल लक्षवेधी सूचनांच्या माध्यमातून सातत्याने चर्चा घडवून आणली होती. परंतु या इमारतींच्या दुरुस्ती करिता मोठ्या प्रमाणात लागणारा निधी उपलब्ध करून घेण्याचा मुख्य अडसर होता. त्या अनुषंगाने या संपूर्ण इमारतींच्या दुरुस्तीचे आराखडे व विकास आराखडा अंतर्गत नव्याने प्रस्तावित करण्यात येणा-या(पान २ वर)



**आ.राजेश वानखडे यांचे सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश**

### ओएलएक्सवर ट्रायलच्या बहाण्याने मोटारसायकल लंपास करणारा अट्टल चोर जेरबंद



**अमरावती :** ओएलएक्स ॲपवर विक्रीसाठी ठेवलेल्या मोटारसायकलींची माहिती घेउन ट्रायलच्या बहाण्याने दुचाकी पळविणा-या अट्टल वाहनचोराला अमरावती शहर गुन्हे शाखेने अटक केली आहे. या आरोपीकडून अमरावती शहर व ग्रामीण हद्दीतील चार मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून तब्बल १ लाख ६० हजार रु पयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी वाहन चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांतील सराईत आरोपींवर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश दिल्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. २० जून रोजी गुप्त माहितीच्या आधारे(पान २ वर)

**गुन्हे शाखेची कारवाई; 4 चोरीच्या दुचाकींसह 1.60 लाखांचा मुद्देमाल जप्त**

### प्रांजली सोनवणे अमरावती शहराच्या नव्या पोलीस उपायुक्त

### रमेश धुमाळ यांची नागपुरात बदली

**अमरावती :** राज्य शासनाच्या गृह विभागाने भारतीय पोलीस सेवा तसेच राज्य पोलीस सेवेतील अधिका-यांच्या प्रशासकीय बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. या बदल्यांअंतर्गत अमरावती शहर पोलीस दलातही महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले आहेत. सध्या अमरावती येथील गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या प्रांजली सोनवणे यांची अमरावती शहराच्या पोलीस उपायुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे शहर पोलीस दलाला अनुभवी आणि कर्तव्यदक्ष नेतृत्व लाभणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, अमरावती शहराचे विद्यमान पोलीस उपायुक्त रमेश धुमाल यांची नागपूर शहर पोलीस दलात पोलीस उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. त्यांनी अमरावतीत कार्यकाळात कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच विविध गुन्ह्यांच्या तपासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. राज्यभरातील पोलीस प्रशासन अधिक सक्षम व कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने शासनाने हा बदली आदेश जारी केला असून, संबंधित अधिका-यांनी लवकरच नव्या पदांचा कार्यभार स्वीकारण्याची शक्यता आहे.

# पुसदमध्ये गोळीबार, तिघे जखमी

- दोन गटात सुरू असलेल्या वादाचे पडसाद
- पाच संशयित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल



**यवतमाळ/प्रतिनिधी-** पुसद येथे दोन गटांमध्ये अनेक दिवसांपासून वाद सुरू आहे. खुनाचा वचपा काढण्याच्या उद्देशाने तीन वाहनातून आलेल्या दहा ते बारा जणांनी सार्वजनिक बांधकाम कार्यालयासमोर टपरीवर उभ्या असलेल्या अंजूम लाला याच्या सह पाच जणांवर गोळीबार करीत चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात टपरी चालकासह दोघेजण जखमी झाले. ही घटना आज मंगळवार २३ जूनच्या सायंकाळी ५.३० वाजता वर्दळीच्या वेळी घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. पुसद मध्ये अंजूम उर्फ वजाहत अली खान व सरदार खान(पान २ वर)

### मेळघाटातील डोहात बुडालेल्या तरूणाचा मृतदेह सापडला

**9 तास चालले रेस्क्यू ऑपरेशन**



**धारणी/प्रतिनिधी-**मेळघाट येथील काटकून डोहात बुडून सोमवारी अमरावती येथील हैदरपुरा निवासी शेख कलीम (वय २३) यांचा मृत्यू झाला होता. शेख कलीम यांच्या बुडून गेल्याची माहिती पोलीस, रेस्क्यू पथक व प्रशासनाला मिळताच सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले. नउ तासाच्या अथक प्रयत्ना नंतर शेख कलीम यांचा मृतदेह पाण्याच्या बाहेर काढण्यात आला. माहिती नुसार शेख कलीम सोमवारी आपल्या मित्रांसह काटकूंन परिसरात फिरण्यासाठी आला होता. दुपारच्या वेळी तो आंघोळीसाठी पाण्यात उतरला आणि पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडाला. त्याच्या सोबत आलेल्या मित्रांनी आणि गावक-यांनी त्याला वाचवण्याचे प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही. प्रशासन आणि रेस्क्यू पथकालाही याची माहिती देण्यात आली. नउ तासाच्या अथक प्रयत्नानंतर त्याचा मृतदेह पाण्याच्या बाहेर काढण्यात आला. मृतदेह पोस्टमार्टम नंतर कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. त्याच्या आकस्मिक मृत्यूने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.